पुणे, मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 21 • वर्ष ४ थे, अंक २१ • किंमत ₹ ६ • पाने : १२



# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com | Beyond The News





**निर्मला सीतारामन यांचा काँग्रेसवर हल्लाबोल**
भारतीयांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काँग्रेसचा घाला
P८


**रात्रीस 'महाखेळ' चाले...!**
ग्राहकांची संख्या वाढतेय; पण कार्यालयांची नाही P३





**श्री क्षेत्र नारायणपूर येथे श्रीदत्त जयंती साजरी** १०





**पावसाचा लंपडाव अन् टीम इंडियाची दैना...!** १२


## At a Glance

### पोटच्या सहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार

**ठाणे :** ठाण्यात बाप लेकीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली. एका व्यक्तीने पोटच्या सहा वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याची तक्रार पीडिताच्या आईने जवळच्या पोलीस ठाण्यात दिली. जवळपास सहा महिन्यापासून हा प्रकार सुरू होता. याप्रकरणातील आरोपीला अद्याप अटक झाली मुलीची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर पोलीस पुढील कारवाईला सुरुवात करणार आहेत.

### राज्यात थंडीची लाट!

**मुंबई :** राज्यात आता हाडे गोठवणाऱ्या थंडीला सुरुवात झाली आहे. अनेक जिल्ह्यातील तापमान मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. या वर्षी सर्वाधिक कमी तापमान होण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यात थंडीची लाट येणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. १९ तारखेला काही जिल्ह्यात पाऊस तर आज आणि उद्या चारही विभागातील काही जिल्ह्यात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

# खातेवाटपासाठी खलबते

## रस्सीखेच सुरु : शपथ विधीवरुन नाराजीचा सूर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** महायुती सरकारचा बहुचर्चित मंत्रिमंडळ विस्तार अखेर रविवारी पार पडला. महायुतीतील तिन्ही पक्षांच्या अनेक माजी मंत्र्यांना डच्चू देण्यात आला आहे. तर काही इच्छुक आमदारांना डावलण्यात आले आहे. नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे मंत्रिमंडळात ४ महिला आमदारांची मंत्रिपदी वर्णी लागली आहे. दरम्यान, मंत्रीपद न मिळाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

आता खातेवाटपाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी खलबते झाली असून कोणाला कोणते खाते मिळणार?, महत्त्वाच्या खातेवाटपासाठी रस्सीखेच सुरू झाली असून खातेवाटप तरी लवकर होणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यातील महायुती सरकारने आपल्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात अनेक दिग्गजांना बाहेरचा रस्ता दाखवून नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सर्वाधिक पाच, भाजपने चार आणि शिवसेनेने तीन अशा एकूण बारा मंत्र्यांना नव्या मंत्रिमंडळातून वगळले आहे.


तरुण नेतृत्वाला संधी देण्यासाठी, काही नेत्यांवरील गैरव्यवहाराचे आरोप, तर कुणाला पक्षसंघटनेतील जबाबदारीच्या निमित्ताने मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे.

भाजपने सुधीर मुनगंटीवार, रवींद्र चव्हाण, विजयकुमार गावित आणि सुरेश खाडे या चारजणांना वगळले आहे. मुनगंटीवार यांचा लोकसभा निवडणुकीतील पराभव आणि विधानसभा निवडणुकीतही विजयासाठी झालेली दमछाक मंत्रिपदाच्या विरोधात गेली. त्यामुळे विदर्भात नवीन नेतृत्वाला संधी देण्याच्या निमित्ताने चंद्रशेखर बावनकुळे, आकाश फुंडकर आणि पंकज भोयर यांना पुढे आणण्यात आले आहे. यातून जातीय समीकरणांचेही संतुलन साधले गेले. शिवाय, मुनगंटीवारांनी विधानसभा अध्यक्षपदाला दिलेला नकारही त्यांना भोवल्याचे सांगितले जाते. आदिवासी खात्यातील गैरव्यवहारांचे शिंतोडे दीर्घकाळ विजयकुमार गावितांवर उडत होते. त्यातच, त्यांची मुलगी हिना गावित यांनी लोकसभेतील पराभवानंतर बंडखोरी करत विधानसभा लढविली. पक्षाने कमी वयात दोनदा खासदारकी आणि घरात मंत्रिपद दिले असताना बंडखोरी झाली. » पान ७ वर

> नवनियुक्त मंत्र्यांचे खातेवाटप आगामी २ दिवसात पूर्ण करणार आहे.मंत्रिमंडळामध्ये सर्व समाजाला स्थान दिले आहे. काही नाराज असून त्यांची समजूत काढू. हिवाळी अधिवेशनात अभिभाषणावरील चर्चा आणि २० बिले मांडणार आहोत. मी व माझे सहकारी चांगलं काम करुन दाखवू, ईव्हीएम म्हणजे "एव्हरी व्होट फॉर महाराष्ट्र" आहे. विरोधक ईव्हीएम संदर्भात ते एक नेरेटिव्ह पसरवत आहेत. आता त्यांच्याकडे कोणताही मुद्दा राहिलेला नाही.
>
> — **देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री)**

# जहाँ नहीं चैना, वहा नही रहना : छगन भुजबळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळं ज्येष्ठ नेते छगन भुजबळ कमालीचे नाराज झाले आहेत. पक्षाने दिलेली राज्यसभेची ऑफर स्पष्ट शब्दांत नाकारतानाच त्यांनी पक्ष सोडण्याचे संकेतही दिले आहे. 'जहाँ नही चैना, वहा नही रहना..' असे सूचक विधान त्यांनी केले आहे.नागपूरमध्ये सुरू झालेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशी महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. या विस्तारात अजित पवारांच्या पक्षानं छगन भुजबळ व दिलीप वळसे-पाटील यांना स्थान दिले नाही. हा खरंतर सर्वांसाठीच धक्का होता. वळसे-पाटील यांची यावरची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही. मात्र, छगन भुजबळ यांनी आपल्या नेहमीच्या स्टाइलने यावर भाष्य केले आहे.पक्षाच्या नेत्यांनी मला राज्यसभेची ऑफर दिली होती. पण ती घ्यायची तर मला राजीनामा द्यावा लागेल. मी आताच निवडून आलो आहे. त्यामुळे लगेच राजीनामा देणे ही माझ्या मतदारांशी प्रतारणा ठरेल, असे छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले.

**जरांगे यांच्या विरोधात लढल्याचे बक्षीस**

• मराठा-ओबीसी आरक्षणाचा वाद सुरू असताना छगन भुजबळ यांनी ओबीसी समाजाची बाजू लावून धरली होती. त्याचेच हे बक्षीस आहे का असे पत्रकारांनी विचारले असताना भुजबळ यांनी होकारार्थी उत्तर दिले. मला डावलले जाईल हे मला अपेक्षित नव्हते. महायुती सरकार येण्यामध्ये लाडकी बहीण आणि ओबीसी समाजाचा मोठा वाटा होता. सभागृहात दोन्ही बाजूंचे सदस्य अंगावर येत असतानाही ओबीसींची बाजू मी कायदेशीरपणे मांडली होती. थेट लढ्यात उतरलो होतो. जरांगे पाटील यांना अंगावर घेतलं होतं. या सगळ्याचा महायुतीला फायदा झाला असं निवडून आलेले आमदारही मान्य करतात, असे भुजबळ म्हणाले.

# ३५,७८८ कोटींच्या पुरवणी मागण्या

## हिवाळी अधिवेशन : लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशनाची सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून ३५,७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये १४०० कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही यापुढेही कायम सुरू राहणार असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. ही रक्कम नेमकी कशासाठी मंजूर करण्यात आली हे देखील स्पष्ट झाले आहे.



**३५,७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या**

- १४०० कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आली.
- मुंबई मेट्रो ३ साठी ६५५ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे.
- ७ हजार ४९०.२४ कोटी रुपयांचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाला.


३ हजार ५० कोटी रुपयांचा निधी हा मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज अतंर्गत वापरण्यात येणार आहे.

याशिवाय, मुंबई मेट्रो ३ साठी ६५५ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. राजकोटवरच्या शिवरायांच्या पुतळ्यासाठी राज्य सरकारकडून ३६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत.तर या पुतळ्याचे कंत्राट सुप्रसिद्ध मूर्तीकार राम सुतार यांना देण्यात आले आहे.

एकूण पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक म्हणजेच ७ हजार ४९०.२४ कोटी रुपयांचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येणार आहे. त्यापैकी ३ हजार १९५ कोटी रुपये हे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला बिनव्याजी देण्यात आले आहेत. हा निधी इमारती, रस्ते आणि पूल बांधण्यासाठी होणार आहे. पुरवणी मागण्यांपैकी २ हजार ५० कोटी रुपयांचा निधी हा मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज अतंर्गत वापरण्यात येणार आहे. तर साखर कारखान्यांना कर्ज देण्यासाठी १२०४ कोटी तर दुध उत्पादक शेतकऱ्यांना ७५८ कोटी रुपये कर्ज देण्यासाठी वापरले जाणार आहेत. राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत.

# उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** प्रसिद्ध तबलावादक आणि पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन झाले. मिळालेल्या माहितीनुसार, झाकीर हुसेन हे अनेक दिवसांपासून आरोग्यासंबंधीत विविध समस्यांनी त्रस्त होते. पण रविवारी १५ डिसेंबर रोजी त्यांची प्रकृती खालावली आणि त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उस्ताद झाकीर हुसेन यांच्यावर अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथे उपचार सुरू होते. रविवारी त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते, झाकीर हुसैन यांनी वयाच्या ७३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

# दोन वर्षात ३२ लोकांचे खून; न्यायमूर्तींमार्फत चौकशी करावी !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नागपूर :** परभणी व बीड जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. परभणीत संविधानाची विटंबना करण्यात आल्यानंतर झालेल्या घटनेत पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. बीडमध्ये एका सरपंचाची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणी वाल्मिकी कराड या व्यक्तीचे नाव चर्चेत आहे, त्याचा मुख्यमंत्री फडणवीसांबरोबर फोटोही आहे, तो भाजपाचा कार्यकर्ता आहे का हे स्पष्ट करावे. बीड जिल्ह्यात मागील दोन वर्षात ३२ हत्या झालेल्या आहेत. या सर्व हत्यांची चौकशी उच्च न्यायालयातील विद्यमान न्यायमूर्तींमार्फत केली जावी अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

नाना पटोले म्हणाले, 'भारतीय जनता पक्ष युतीने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आता सरकारने सरसकट ३ लाख रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा करावी.

सोयाबीनला » पान ७ वर

**राज्यात नोकर भरती सुरू करावी**

• राज्यातील विविध विभागात दोन लाखांपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत, ही पदे भरण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करावा. कंत्राटी पद्धतीने भरती करणार नाही असा निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला होता पण त्याची अंमलबजावणी केली जात नाही. सरकार आजही कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करत आहे. कोणत्याही प्रकारे कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करु नये. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नोकर भरती करावी असे नाना पटोले म्हणाले.

# आप ने जाहीर केली उमेदवारांची अंतिम यादी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पक्षाने (आप) ३८ उमेदवारांची चौथी आणि अंतिम यादी जाहीर केली आहे. आपचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल नवी दिल्ली मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. तर मुख्यमंत्री आतिशी पुन्हा एकदा कालकाजी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. आप ने कस्तुरबा नगरमधील विद्यमान आमदार मदन लाल यांच्या जागी रमेश पहेलवान यांना उमेदवारी दिली आहे. रमेश पहेलवान आणि त्यांच्या पत्नी नगरसेवक कुसुम लता यांनी आज भाजपला सोडचिठ्ठी दिल्यानंतर 'आप'मध्ये प्रवेश केला होता. यादीतील इतर » पान ७ वर

# रिपब्लिकन पक्षाचे आंदोलन:

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे:** परभणी येथे संविधानाच्या अवमानानंतर घडलेल्या घटने संदर्भात पोलिसांनी केलेल्या कॉबिंग ऑपरेशनमध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महिला यांना घरातून उचलून अटक करण्यात आली. रविवारी यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीत दुर्दैवी मृत्यू झाला. शहिद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशीला न्याय मिळालाच पाहिजे; दोषी पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा आदी मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशासना विरोधात पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र आंदोलन करीत निदर्शने करण्यात आली.

# महाराष्ट्र बंदला संमिश्र प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**परभणी :** परभणी दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा मृत्यू झाला असून या प्रकरणी परभणीसह महाराष्ट्र बंदची हाक दलित संघटनांनी दिली होती. परभणीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. या प्रकरणी पोलिसांनी ५० जणांना अटक केली होती. यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली हे. आनंदराज आंबेडकर यांनी परभणीसह महाराष्ट्र बंदची हाक दिली असून या पार्श्वभूमीवर परभणीत चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# एसटी विभागात नव्याने १३४ ई- बस दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसटी महामंडळाकडून डिझेलच्या गाडीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे. सध्या विविध सवलतीमुळे एसटीचे प्रवासी वाढले आहेत. त्यामुळे एसटीच्या दैनंदिन प्रवासी संख्येत वाढ झाली आहे, तसेच वातानूकुलित इलेक्ट्रिक बस असल्यामुळे प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. पुणे एसटी विभागात नव्याने १३४ ई- बस दाखल होणार असून, प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. एसटीच्या ताफ्यातून लालपरी कमी झाल्याने गाड्यांची संख्या कमी झाली होती. त्यामुळे नव्या इलेक्ट्रिक बसची मागणी करण्यात आली असून, त्या पुढील दोन महिन्यांत येतील, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.पुण्यातून सोलापूर, कोल्हापूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या मार्गांवर इलेक्ट्रिक बस धावत आहेत.

> कोल्हापूर, नाशिक, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर या मार्गांवरील इलेक्ट्रिक बसला चांगला प्रतिसाद मिळत आहे. लवकरच १३४ इलेक्ट्रिक बस पुणे विभागात दाखल होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना तात्काळ, आरामदायी आणि वातानुकूलीत प्रवास उपलब्ध होणार आहे.
>
> — **प्रमोद नेहूल,** विभाग नियंत्रक, पुणे विभाग

# आरोग्य केंद्रांवर वीज बिल भरण्यासाठी पैसेच नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांमध्ये पाच रुपयांमध्ये केस पेपर निघत होता. या पैशांतून आरोग्य केंद्रे वीज बिलाचा भरणा करत होते. पण आता हे पैसे बंद झाल्यानंतर आरोग्य विभागाकडून निधीची तरतूद करण्याची गरज होती, ती अद्याप केलेली नाही. परिणामी स्थानिक पातळीवर केंद्रांमधील अधिकाऱ्यांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांकडे आतापर्यंत ५२ लाख ६७ हजार ९९५ रुपये वीजबिल थकीत आहे. सध्या उपचारच मोफत केल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रांना उत्पन्नाचा आर्थिक स्रोत बंद झाला. यामुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर वीज बिल भरण्यासाठी पैसेच नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे आरोग्य केंद्राकडे वीजबिल कसे भरायचा, असा प्रश्न भेडसावत आहे. सध्या जिल्हा परिषदेकडे प्राथमिक उपकेंद्रांतील वीज पुरवठा खंडीत करू नये म्हणून निधीची अधिकाऱ्यांकडून सातत्याने मागणी होत आहे. जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या १०८ आहे, तर उपकेंद्राची संख्या ५३९ इतकी आहे. बाह्यरुग्ण नोंदणी १० रुपये, आंतररुग्ण शुल्क २० रुपये, आहार शुल्क १० रुपये, हिमोग्लोबिन चाचणी २० रुपये, » पान ७ वर

**» बिले थकली**

# शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन पुण्यात...

**पुणे मराठी भाषा संवर्धन समिती, पुणे महानगरपालिका आणि संवाद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिल्या राज्यस्तरीय शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनाचे शुक्रवार, दि. २० ते रविवार, दि. २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत पुण्यात बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रासह विविध राज्यांमध्ये कार्यरत असलेले वरिष्ठ अधिकारी विविध परिसंवाद, चर्चासत्रे, कविसंमेलनातून व्यक्त होणार आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्याला साहित्यिक व सांस्कृतिक परंपरेचा मोठा वारसा लाभला आहे. गेल्या शतकामध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मराठी साहित्यात अतिशय मोलाची भर टाकली आहे. सध्या राज्याच्या प्रशासनात जवळपास १८ लाख अधिकारी-कर्मचारी कार्यरत आहेत. हे राज्यस्तरीय अधिकाऱ्यांचे साहित्य संमेलन पुणे महानगरपालिकेच्या मराठी भाषा संवर्धन समिती व संवाद पुणे मार्फत आयोजित करण्यात आले आहे. काही अधिकारी-कर्मचारी हे त्यांचे शासकीय कामकाज सांभाळून साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने योगदान देत आहेत. तसेच अनेक शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना या क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवरील मानाचे पुरस्कार सुध्दा मिळालेले आहेत. मराठी भाषेला नुकताच केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच राज्य शासनाने मराठी भाषा धोरण देखील नुकतेच जाहीर केले आहे.



**यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड संमेलनाध्यक्ष तर पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले स्वागताध्यक्ष !**

प्रशासनात व लोकव्यवहारात मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन व संवर्धन होण्यासाठी पुढील काळात सर्वच स्तरावर व्यापक व विस्तृत प्रयत्न होणे आवश्यक आहे. प्रशासकीय अधिकारी यांचे लेखन साहित्य समाजापुढे यावे, त्यांना लेखनासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे तसेच मराठी भाषेच्या विकासात व संवर्धनात प्रशासनातील अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग वाढावा अशी उदिष्टे विचारात आहे.

पुणे महानगरपालिकेकडून या साहित्य संमेलनाची पूर्व तयारी सुरू करण्यात आली असून त्या अनुषंगाने कामकाजाच्या सूचना संबंधित विभागास देण्यात आल्या आहेत. तसेच या संमेलनसाठी मराठी भाषा संवर्धन समिति अंतर्गत संमेलन समन्वय समिती तयार करण्यात आली असून या समन्वय समितीमध्ये पुणे महानगरपालिका प्रशिक्षण प्रबोधिनीचे उपायुक्त राजीव नंदकर, » पान ७ वर

### नामांकीत शिक्षण संस्थाचाही समावेश; नियमांची पूर्तता करण्याच्या सूचना

# नियमांचे उल्लंघन; १०५ बांधकामांना 'स्टॉप ऑर्डर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रदूषण नियंत्रण मंडळाची नियमावली सर्व बांधकामांसाठी बंधनकारक आहे. या नियमावलीची पूर्तता न करणाऱ्या व्यावसायिकांच्या प्रकल्पांची कामे थांबविण्यात आली आहेत. या प्रकल्पांनी पर्यावरणविषयक नियमांची पूर्तता केल्यानंतर त्याची पाहणी करून त्यांना पुन्हा काम सुरू करण्याची मान्यता देण्यात येईल, असे पुणे महापालिकेच्या विभागाचे अधीक्षक अभियंता श्रीधर येवलेकर यांनी स्पष्ट केले आहे.

शहरात बांधकामे करत असताना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) ठरवून दिलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या १०५ बांधकाम प्रकल्पांची कामे महापालिकेने थांबविली आहेत. यामध्ये अनेक मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या तसेच काही नामांकित शिक्षण संस्थांच्या बांधकाम प्रकल्पांचाही समावेश आहे.

शहराच्या मध्यवर्ती पेठांसह, विविध उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणांवर बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. एरंडवणा, सहकारनगर, कोथरूड, बिबवेवाडी, बाणेर, बालेवाडी, औंध, कर्वेनगर, खराडी या भागात अनेक मोठे प्रकल्प सुरू आहेत. यातील अनेक ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात 'सीपीसीबी'च्या नियमावलीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले होते. बांधकाम करताना 'सीपीसीबी'ने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे, अशा सूचना गेल्या वर्षी महपालिकेने शहरातील सर्व बांधकाम व्यावसायिकांना दिलेल्या आहेत. बांधकामे करताना आवश्यक ती काळजी घेतली जात नसल्याने या बांधकामामुळे निर्माण होणाऱ्या सूक्ष्म व अतिसूक्ष्म धुलिकणांमुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचेही समोर आले होते.




**या नियमांचे पालन करणे बंधनकारक...!**

- प्रकल्पाच्या बाजूला विशिष्ट उंचीचे पत्रे लावणे
- ही जाळी ओलसर ठेवणे
- बांधकामाचे साहित्याचे उतरविताना आणि गाडीत भरताना त्यावर पाणी मारणे
- हिरवी जाळी लावणे

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या बांधकाम विभागाने गेल्या आठवड्यात 'सीपीसीबी'ने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून बांधकामे करावीत, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा दिला होता. मात्र, त्यानंतरही यामध्ये सुधारणा न झाल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत आढळून आले होते. त्यामुळे बांधकाम विभागाने गेल्या दोन दिवसांत शहरातील १०५ बांधकाम प्रकल्पांचे काम थांबविण्याची कारवाई केली आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने बांधकाम विभागाने शहरातील बांधकाम व्यावसायिक आणि त्यांच्या संघटनेला नियमांचे पालन करण्याच्या सूचना केल्या होत्या.

महापालिकेने सूचना केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी केली जात नसल्याने बांधकाम विभागाने पहिल्या दिवशी ९१ तर दुसऱ्या दिवशी १४ बांधकामांचे काम थांबविण्याची कारवाई केली आहे. याबरोबरच परिमंडळ पाचमध्ये ६७ बांधकाम प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने केलेल्या या कारवाईमुळे बांधकाम व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. ही कारवाई रद्द करण्यासाठी महापालिकेवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू झाला असल्याचे बोलले जात आहे.

> "बांधकाम करताना महापालिका प्रशासनाच्या वतीने काही नियमावली ठरविण्यात आली आहे, हे वास्तव असतानाही बहुतांशी बांधकाम व्यवसायिक त्याचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळेच महापालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे, त्यामुळे त्यांनी या नियमांची पूर्तता केल्यानंतरच त्यांना बांधकामाची परवानगी देण्यात येणार आहे."
>
> — श्रीधर येवले, अधीक्षक अभियंता, पुणे महापालिका

## 'आदिअष्टकम्' नृत्य कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'आदी अष्टकम' या आदि शंकराचार्यांच्या रचनांवर आधारित कथक नृत्य सादरीकरण कार्यक्रम पुण्यात आयोजित करण्यात आला होता,उपस्थित रसिक बहारदार सादरीकरणाने मंत्रमुग्ध झाले. ज्येष्ठ नृत्य गुरू शमा भाटे, अरूंधती पटवर्धन ,रसिका गुमास्ते आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

हा कार्यक्रम 'नाद रूप',शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था आणि डॉ.उषा आर.के. (मॉस्को ) यांनी प्रस्तुत केला. वर्षा दासगुप्ता,अस्मिता ठाकूर,मुकेश गंगाणी,अमीरा पाटणकर,अवनी गद्रे हे देशभरातील नामवंत कथक नृत्य कलाकार या सादरीकरणात सहभागी झाले. त्यांना चारूदत्त फडके (तबला), शुभम खंडाळकर (गायन), यशवंत थिटे (हार्मोनिअम), पार्थ भूमकर (पखवाज), आर्य ताडफळे (सतार), ईशा नानल, श्रेया, श्रध्दा, वैष्णवी (पढंत) यांनी साथसंगत केली.

अवनी गद्रे यांनी 'शारदा भुजंगाष्टकम् ' ने कार्यक्रमाची सुरुवात केली. या मध्ये शारदा मातेचे स्तवन करण्यात आले.आमिरा पाटणकर यांनी 'यमुनाष्टकम् ' सादर केले. हिंदू धर्मामध्ये यमुना नदी आस्था आणि विश्वासाचे प्रतिक आहे. यमुना नदीला जीवनदायिनी असेही म्हणतात. वर्षा दासगुप्ता (दिल्ली ) यांनी 'गंगाष्टकम् ' प्रस्तुत केले. श्रीमद् शंकराचार्यांचे गंगा नदीच्या स्तुतीपर रचलेले हे स्तोत्र अत्यंत रसाळ व भक्तिपूर्ण आहे. ' कालभैरवाष्टकम् ' श्रीमत् आदि शंकराचार्यांनी रचलेले कालभैरवाष्टक शंकराच्या भगवान कालभैरव या विक्राळ आणि उग्र रूपाचे स्तुतीपर स्तोत्र आहे. रूप रौद्र असले तरी त्याचा स्वभाव अत्यंत सरळ व भक्तांविषयी कणव असणारा आहे.

» सांस्कृतिक

मुकेश गंगाणी यांनी कालभैरवाष्टकम् प्रस्तुत केले.गुरु अष्टकम् या अष्टकमध्ये आपल्या आयुष्यात गुरूंचे महत्व काय आहे हे नृत्यातून सादर करण्यात आले. अस्मिता ठाकूर यांनी हे नृत्य सादर केले.भारतीय विद्या भवनचे सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी प्रास्ताविक केले. समृद्धी चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. कलाकारांचा सत्कार ज्येष्ठ नृत्य गुरू शमा भाटे यांच्या हस्ते करण्यात आला.

## नरेंद्र मोदी जागतिक पातळीवरील मुत्सद्दी राजकारणी : प्रकाश जावडेकर

### रोटरी क्लब ऑफ पुणे युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित 'मोदी 3.0' कार्यक्रमात उलगडले विविध पैलू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अफाट कार्यक्षमता, कामकाजातील पारदर्शकता, सूत्रबद्ध नियोजन, दूरदृष्टी, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, कल्पक विचारसरणी आणि विकसित भारताचे स्वप्न उराशी बाळगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाटचाल सुरू आहे. गेल्या दहा वर्षात तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सर्वसामान्य व्यक्तींच्या आयुष्यातही अमूलाग्र बदल झाला आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये काही काळासाठी युद्धविराम करून भारतीय विद्यार्थ्यांना सुखरूप मायदेशी आणले आहे. या मुळेच नरेंद्र मोदी हे केवळ देश पातळीवरील नेते नसून जागतिक पातळीवरील मुत्सद्दी राजकारणी आहेत हे सिद्ध होते, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी केले.



रोटरी क्लब ऑफ पुणे युनिव्हर्सिटीतर्फे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू उलगडून दाखविणाऱ्या 'मोदी 3.0' या कार्यक्रमाचे रविवारी (दि. 15) आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी प्रकाश जावडेकर बोलत होते. रोटरी क्लब ऑफ पुणे युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉ. शंतनू देशपांडे, सचिव अमृता कुलकर्णी, माजी अध्यक्ष दीपक शिकारपूर मंचावर होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कार्यपद्धती, विचारप्रणाली, दूरदृष्टी, निर्णय क्षमता, समन्वयाची भूमिका आदी वैशिष्ट्यांसह व्हिजन 2047 या विषयी प्रकाश जावडेकर यांनी मते मांडली.

> "मोदी यांच्या आवडीनिवडी सांगताना जावडेकर म्हणाले, योगासने, व्यायाम, सतत कार्यमग्नता, शुद्ध शाकाहारी जेवण आवडीचे आहे. मोदी यांना गुजराती पद्धतीचे जेवण अधिक पसंत असून महाराष्ट्रातील मेतकुटही मनापासून आवडते. "
>
> — प्रकाश जावडेकर, माजी केंद्रिय मंत्री

## पीएमआरडीए'ने हटविली अनधिकृत बांधकामे अन् होर्डिंग; ९५ बांधकामे, होर्डिंगवर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीएमआरडीएकडून यंदा वर्षभरात सुमारे साडेतीनशे बांधकामांचे सर्वेक्षण झाले आहे. आत्तापर्यंत जवळपास ९५ बांधकाम, होर्डिंग हटवण्यात आलेले आहे. महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पथकाकडून निष्कासनाची कारवाई केली सुरू करण्यात आली.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी लोणीकंदमध्ये अनुराधा पब्लीसिटी यांच्या अनधिकृत होर्डिंगवर निष्कासनाची कारवाई करुन ते जप्त करण्यात आले. यासह केसनंद येथे ऑप्टीमा हाईटस सोसायटीतील जतिन खलसे, पुनम होळे, कुलदीप पाटील, शशद्री गुप्ते, विवेक अंबेकर, अभिजीत संन्याल, विश्वजीत कुंभार, अमिर शिंदे या सदनिकाधारकांनी अनधिकृतपणे केलेले पत्राशेडच्या बांधकामांवर पीएमआरडीएच्या पथकाने निष्कासनाची कारवाई केली. लोणीकंदमधील संबंधित अनधिकृत होर्डिंगचे साधारणपणे २० बाय २५ चौ. फुट क्षेत्रावरील अनधिकृत होर्डिग क्रेन, गॅस कटर आणि मनुष्यबळाच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले. त्यावेळी उपस्थित पीएमआरडीएच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागातील अधिकारी यांचेमार्फत सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम करू नये, असे आवाहन करण्यात आले.



जून महिन्यापर्यंत प्राधिकरणाच्या या पथकाने साडेतीनशे ठिकाणांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. त्यापैकी ९५ अनधिकृत बांधकामे, धोकादायक होर्डिंग हटवण्यात आले. त्यापैकी २४ होर्डिंग आहेत. दरम्यान, नोटीस देवूनही बांधकाम सुरू ठेवून नियमभंग करणाऱ्या ५ जणांवर फौजदारी कारवाई करण्यात आली आहे.

## हडपसर-हिसार व दौंड-अजमेर या रेल्वे गाड्यांच्या फेऱ्यात वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाताळ व हिवाळी सुट्ट्या लक्षात घेता प्रवाशांच्या सोईसाठी आणि प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे शासनाने महत्त्वाचा निर्णय घतला आहे. या निर्णयानुसार, हडपसर-हिसार व दौंड-अजमेर या रेल्वे गाड्याच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहे. रेल्वेच्या या निर्णयामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

०४७२७ हडपसर-हिसार ही साप्ताहिक विशेष रेल्वे १६ डिसेंबर २०२४ म्हणजे आजपर्यंत धावणार होती. मात्र, आता या गाडीच्या सेवेत वाढ करण्यात आली असून, आता ही रेल्वे २३ व ३० डिसेंबर रोजी देखील हडपसरहून धावणार आहे. तसेच हिसार-हडपसर साप्ताहिक विशेष रेल्वे (०४७२३ ) ही रेल्वे गाडी पूर्वी १५ डिसेंबरपर्यंत धावणार होती, आता या गाडीच्या सेवेत देखील वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार, ही गाडी आता २२व २९ डिसेंबर २०२४ रोजी देखील धावणार आहे.




गाडी क्रमांक ०९६२६ दौंड-अजमेर साप्ताहिक विशेष ही रेल्वे पूर्वी १३ डिसेंबर २०२४ पर्यंत धावणार होती, मात्र, आता या गाडीच्या सेवेत वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार ही गाडी आता २० व २७ डिसेंबर २०२४ ला धावणार आहे. तसेच अजमेर-दौंड साप्ताहिक विशेष रेल्वे गाडी क्रमांक ०९६२५ ही रेल्वे पूर्वी १२डिसेंबरपर्यंत धावणार होती. या गाडीच्या सेवेत वाढ करत आता ही गाडी १९ आणि २६ डिसेंबर २०२४ रोजी देखील धावणार आहे. दरम्यान रेल्वेच्या थांब्यात व वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. फक्त सेवा वाढवण्यात आल्या आहे. प्रवाशांसाठी रेल्वे प्रशासनाचा हा निर्णय दिलासा देणारा आहे.

दरम्यान, नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर या मार्गावर विशेष गाड्या देखील चालवण्यात येणार आहे. नाताळ सण, ३१ डिसेंबर आणि हिवाळी सुट्ट्या लक्षात घेता प्रवाशाची संख्या वाढली आहे. बहुतांश प्रवाशी हे रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे या प्रवाशांच्या सुविधेसाठी या गाड्यांच्या सेवा वाढवण्यात आल्या आहे.

## पुण्यात काय घडतंय...

### एस.एम. जोशी पुरस्कार वितरण सोहळा



- **पुरस्कारार्थी :** "एस.एम.जोशी पुरस्कार: सिताराम कोंडीबा न्यायनिरगुणे, ठाणे, आदर्श निवृत्त सेवक संघ पुरस्कार: पुणे महानगर पालिका निवृत्त सेवक संघ, पुणे
- **प्रमुख उपस्थिती :** ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. न. म. जोशी, ज्येष्ठ अभियंता प्रा. डॉ. गितांजली वैद्य
- **कार्यक्रमाचे अध्यक्ष :** ज्येष्ठ विचारवंत डॉ. अभिजित वैद्य
- **कुठे :** विशाल ट्रस्टचे सभागृह, सदाशिव पेठ, टिळक रोड
- **कधी :** मंगळवार १७ डिसेंबर, सांयकाळी ४ वा.

### १९७१ युद्ध विजय दिवस



- रक्तदान शिबीर व उत्कृष्ट छात्र सैनिक पुरस्कार वितरण कार्यक्रम
- **आयोजक :** एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त)
- **कुठे :** स. प. महाविद्यालय, टिळक रोड
- **कधी :** मंगळवार १७ डिसेंबर रोजी, सकाळी ११.००

### जय गणेश रुग्णसेवा अभियान



- मोफत महाआरोग्य शिबीर
- **आयोजक :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट
- २३ प्रकारच्या विविध तपासण्या मोफत
- **सहकार्य :** सुवर्णयुग तरुण मंडळ
- **कुठे :** स. प. महाविद्यालय मैदान, टिळक रोड
- **कधी :** १९ ते २२ डिसेंबर, सकाळी ९ ते सांय ६

» Selected


## भाजपाने हिंदू असलेल्या मातंग समाजाला डावलले

**पुणे :** अनुसूचित जाती मध्ये असलेल्या महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या दृष्टीने तृतीय क्रमांक चा समाज म्हणजे मातंग समाज आत्ताच झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीला हा समाज संपूर्णपणे भारतीय जनता पार्टी बरोबर नाही का परंतु भारतीय जनता पार्टी समाजातील दोनच उमेदवारांना तिकीट दिले, ते दोन्ही उमेदवार निवडून आले, काँग्रेस व शरद पवार गट यांनी अनुक्रमे दोन व एक अशा मातंग समाजातील उमेदवारांना तिकीट दिले व त्यांचा एकही उमेदवार येऊ शकला नाही शिवसेना व अजित दादा गटाने तर या समाजाला स्थानच दिले नाही..

भाजपने इतिहासात पहिल्यांदा मातंग समाजाला विधानपरिषद दिली यामुळे समाजामध्ये भाजप विषय प्रेम निर्माण झाले होते परंतु मंत्रिमंडळ विस्तारात एवढा मोठा असलेल्या मातंग समजाला भाजपाने व इतर पक्षांने संधी न देता डावलले आहे,त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील मातृभूमी संभाजीच्या वतीने महायुती सरकारच्या विरोधात नाराज व्यक्त होत आहे. भाजपाच्या वतीने आमदार सुनील कांबळे, आमदार अंतापुरकर व विधान परिषद आमदार अमित गोरखे आहेत, अमित गोरखे यांच्या बहुजन समाज यात्रे ची चर्चा सर्व महाराष्ट्रभर होती. यापैकी एकाला संधी मिळेल असे वाटत होते परंतु तसे घडले नसल्यामुळे मातंग समाजामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे.

## पद्मश्री सुरेश वाडकर यांना 'पंचमरत्न' पुरस्कार जाहीर

**पुणे :** सुप्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन (पंचमदा) यांचे चाहते असलेल्या पुण्यातील कलावंतांच्या एका समूहातार्फे दरवर्षी बर्मन यांच्याशी संबंधित कलाकारांचा 'पंचमरत्न' पुरस्कार देवून गौरव करण्यात येतो. यंदाचा हा पुरस्कार पद्मश्री सुरेश वाडकर यांना जाहीर करण्यात आला आहे.



४ जानेवारी रोजी आर. डी. बर्मन यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधत आयोजित करण्यात येत असलेल्या 'री-डिस्कव्हरींग पंचम' या विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. सदर कार्यक्रम स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा मंच येथे सायंकाळी ६:०० वाजता संपन्न होईल.मानचिन्ह, पुणेरी पगडी, शाल आणि श्रीफळ असे 'पंचमरत्न' या पुरस्काराचे स्वरूप आहे. याआधी हा पुरस्कार कर्सी लॉर्ड, मनोहरी सिंघ (मनोहरीदा), शैलेंद्र सिंग, तौफिक कुरेशी, नितीन शंकर अशा पंचमदां सोबत काम केलेल्या अनेक कलाकारांना प्रदान करण्यात आला आहे.

या विशेष कार्यक्रमाची संकल्पना पुण्यातील सुरज दोशी, आनंद घोगरे आणि गौरव प्रभुणे या कलाकारांची असून कार्यक्रमात व्हायोलिन सेक्शन, ब्रास सेक्शन, गिटार सेक्शन अशी विविध वाद्ये वाजवणाऱ्या सुमारे ६० हून अधिक कलाकारांचा संच रंगमंचावर असेल. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय पुरस्कार विजेती प्रसिद्ध गायिका सावनी रवींद्र यांचा विशेष सहभाग असणार असून जितेंद्र भूरूक, रुपाली आनंद, विवेक पांडे, विजय जोशी हे सहगायक असतील. कार्यक्रमाचे निवेदन संकर्षण कऱ्हाडे आणि योगिनी पोफळे करतील.

### 'द एम्पॉवर हर फाउंडेशन'चा शुभारंभ'; हिरकणी'योजनेत तीन मुलींचे स्विकारले पालकत्व

## नव भारतासाठी स्त्रियांना सक्षम करण्याची गरज- डॉ. रघुनाथ माशेलकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "नव भारत एका पायावर धावू शकत नाही, तर तो दोन पायावरच चालवायला लागेल. त्यासाठी स्त्रीयांना सक्षम करणे आवश्यक आहे. त्या अधिक संयमी व संवेदनशील असतात. त्यामुळेच स्त्रीयां व मुलींना केवळ शिक्षण नाही तर भरपूर शिक्षण द्या पण त्यांच्या लग्नाची घाई करू नका. शिक्षण म्हणजेच भविष्य हे सूत्र सतत लक्षात ठेवावे." असा सल्ला जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी दिला.

'द एम्पॉवर हर फाउंडेशन'या संस्थेच्या वतिने आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी योजनेच्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम सीओईपी च्या किर्लोस्कर सभागृहात संपन्न झाला.

यावेळी द एम्पॉवर हर फाउंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष संदीप नुलकर, सचिव प्रसिद्ध सिने दिग्दर्शक निपूण धर्माधिकारी, कोषाध्यक्ष ऋषिकेश अत्रे व संचालिका रूपाली शिंदे-आगाशे उपस्थित होते.

संस्थेच्या हिरकणी योजने अंतर्गत या वर्षी गायत्री रावडे, दिया दिघे आणि पियुषा पांडव या तीन मुलींना कायम स्वरूपी शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली जाणार असून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होई पर्यंत त्यांच्या सर्वांगीण विकासावर काम केले जाणार आहे. या मुलींना डॉ.माशेलकर यांच्या हस्ते स्वीकृती देण्यात आली.




बासमती तांदूळ व हळद पेटंट करू पहाणाऱ्या अमेरिकन कंपन्यांच्या विरोधात त्यांनी उभारलेल्या लढ्यासाठी याप्रसंगी डॉ. माशेलकर यांना बासमती तांदूळ आणि हळदीची प्रतीकात्मक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. माशेलकर म्हणाले, "वस्तूस्थिती पाहता भारताच्या वर्कफोर्स मध्ये केवळ २४ टक्केच महिला आहेत. ही टक्केवारी चीनमध्ये ६० टक्के, व्हिएतनामा ७० टक्के आणि बांग्लादेश ही आपल्यापेक्षा अधिक पुढे आहे. चीनने कित्येक वर्षापुर्वीच बौद्धिक आणि शारीरिक बळावर चालणाऱ्या नोकऱ्या महिलांना दिल्या आहेत.

"सृष्टीवरील सर्वात मोठे सूत्र एज्यूकेशन इक्वल टू फ्यूचर हे आहे. आज भविष्याचा वेध घेतांना पुण्यात असे कार्य सुरू होणे हे महत्वाचे आहे. या कार्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि अनुभवा बरोबरच पैसा आणि वेळ ही महत्वाची आहे. ज्या प्रकारे सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांनी क्रांती आणली, त्याचप्रमाणे हिरकणी योजना ही मोठी चळवळ म्हणून पुढे येईल."

> आपल्या देशात बेटी बचाव बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, सेविंग स्कीम, कन्या श्री प्रकल्प व शिक्षणाच्या योजना आहेत. त्याला अधिक विस्तृत स्वरूप देणे कालानुरूप गरजेचे आहे. देशात आजही अंधश्रध्दा दिसून येते. चंद्रावर मंगळ यान पोहोचले परंतू देशात अजून मंगळ असल्या कारणेने मुलींची लग्न ठरत नाहीत. ही विचारणीय बाब आहे. "
>
> — पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ

संदीप नुलकर म्हणाले, "महिलांची व्यथा जवळून पाहिल्यामुळे त्यांच्यासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. वंचित मुलींना दर्जात्मक शिक्षणाबरोबरच योग्य रोजगार मिळावा आणि त्यांचे व कुटुंबाचे उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी' द एम्पॉवर हर फाउंडेशन'या संस्थेची स्थापना केली. यातील हिरकणी योजने अंतर्गत मुलींना कायम स्वरूपी शैक्षणिक शिष्यवृत्ती दिली जाऊन त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाईल.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संहिता चांदोरकर यांनी केले.

#रा

# रात्रीस 'महाखेळ' चाले...!

## ग्राहकांची संख्या वाढतेय; पण कार्यालयांची नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पुणे शहराच्या नागरीकरणात मोठी वाढ झाली आहे, त्यातूनच शहराच्या हद्दीलगतच्या गावांमध्ये बांधकामे वाढल्याने ग्राहकांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यातच कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने ग्राहकांच्या मागण्या आणि कामांचा वाढता जोर याचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत असून त्याचा जबरदस्त फटका ग्राहकांनाच सहन करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे कामाला 'गती' देण्यासाठी काही कार्यालयात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा रात्रीस 'महाखेळ' सुरु झाला आहे.

ग्राहकांना दर्जेदार आणि उत्तम सेवा मिळावी यासाठी राज्य शासन आणि महावितरण प्रशासनाच्या वतीने युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येत आहेत, तरीही ग्राहकांची वाढती संख्या आणि कमी असणारा कर्मचारीवर्ग यांचा ताळमेळ बसविताना प्रशासनाला नाकीनऊ आले आहे. वास्तविक २५ हजार ग्राहकसंख्य असलेल्या भागासाठी किमान एक विभाग असावा, असा महावितरण प्रशासनाचा नियम आहे. मात्र; बहुतांशी ठिकाणी हा नियमच बासनात गुंडाळल्याचे आतापर्यंत स्पष्ट झाले आहे. त्याचा जोरदार फटका ग्राहकांना बसत असून या ग्राहकांना दर्जेदार सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

शहर आणि विशेषत: महावितरणसाठी सर्वाधिक महसूल देत असलेल्या वाघोली, खराडी, वडगावशेरी या भागामध्ये सध्या एक लाखांच्याही वरती ग्राहक आहेत. हे वास्तव असले तरी यातील तीनही भागासाठी प्रत्येकी एक विभाग कार्यालय आहे, याठिकाणी अतिरिक्त विभाग कार्यालये सुरु करावीत यासाठी स्थानिक नागरिकांनी पाठपुरावा केला होता. त्याबाबत वारंवार पाठपुरावा केल्यानंतर केवळ खराडी आणि वडगावशेरी या विभागांना मान्यता देण्यात आली. मात्र; ही मंजूरी मिळून काही महिन्यांचा कालावधी लोटला आहे. तरीही ही कार्यालये अद्याप प्रत्यक्षात सुरु झालेले नाहीत, विशेष म्हणजे ग्राहकांचा सर्वाधिक 'भार' असलेल्या वाघोली विभागासाठी अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही.

त्यामुळे ग्राहकांची कामे उरकण्यासाठी उपलब्ध अधिकारी आणि कर्मचारी वर्गावर मोठ्या प्रमाणावर ताण येत आहे, त्यातूनच ग्राहकांची नाराजी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. त्यामुळे त्यांची ही नाराजी दूर करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने आता नवी शक्कल लढविली आहे, त्यासाठी सर्वाधिक 'महत्वाची' असलेली कामे उरकण्यासाठी त्यांनी आता रात्रीची वेळ निवडली आहे. त्यातूनच गेल्या काही दिवसांपासून महावितरणच्या महत्वाच्या कार्यालयांमध्ये आता रात्रीस 'महाखेळ' सुरु झाला असून त्याची चविष्ठ चर्चा ग्राहकांमध्ये सुरु आहे.




### याचा पडतोय प्रशासनावर 'महाताण'

- अपेक्षित साहित्याचीही वाणवा
- ग्राहकांना सुविधा देण्यात अडचणी
- कर्मचारी, वायरमनही अपुरेच
- अपेक्षेपेक्षा ग्राहकांची संख्या चौपट
- ठेकेदार मात्र ढीगभर



"पुणे शहराची गणना सध्या 'स्मार्ट' शहर म्हणून होत आहे, तरीही कोणत्याच कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी 'स्मार्ट' काम करत नसल्याचे आतापर्यंत स्पष्ट झाले आहे. ग्राहकांना दर्जेदार सुविधा मिळविण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, हे विभाग वाढवावेत यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. मात्र; दुर्दैवाने त्यामध्ये यश येत नाही. त्यामुळे नाईलाजाने आता आंदोलनाचा मार्ग स्विकारावा लागणार आहे."

— योगेश घोरपडे देशमुख
प्रदेशाध्यक्ष,
महाउर्जा इलेक्ट्रिकल असोसिएशन

## At a Glance

### डॉ. मोहन भागवत यांचे गुरुवारी व्याख्यान



**पुणे :** भारतीय स्वातंत्र्याची अमृतमहोत्सव पूर्ती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शंभराव्या वर्षात पदार्पण आणि सहजीवन व्याख्यानमालेची रौप्यमहोत्सवाकडे वाटचाल असा त्रिवेणी संगम साधत गुरुवारी (१९ डिसेंबर) राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.सहकारनगर परिसरातील दशभुजा गणपती मंदिराजवळील फुलोरा मैदान येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या सहजीवन व्याख्यानमालेत 'विश्वगुरु भारत' या विषयावर मोहन भागवत संवाद साधणार आहेत, अशी माहिती सहजीवन व्याख्यानमालेचे अध्यक्ष विनय कुलकर्णी आणि रवींद्र खरे यांनी सोमवारी दिली. यंदाची नियमित व्याख्यानमाला जानेवारीमध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

### पादचाऱ्याने प्रतिकार केल्याने चोरटे पसार



**पुणे :** पादचाऱ्याला धमकावून त्याच्याकडील मोबाइल चोरण्यात आल्याची घटना लष्कर भागातील महात्मा गांधी पीएमपी स्थानक परिसरात घडली. पादचाऱ्याने प्रतिकार केल्याने चोरटे दुचाकी सोडून पसार झाले. लष्कर पोलिसांकडून पसार झालेल्या चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे.याप्रकरणी तीन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत फिरोज रशीद शेख (वय २४) याने लष्कर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## सुधीर मुनगंटीवारांना भाजपामध्ये मोठी जबाबदारी मिळू शकते..?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काल महायुतीकडून मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला असून अनेक नेत्यांची नागपूर येथे शपथविधी पार पडली या शपथविधीत अनेक नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली तर काही जुने चेहऱ्याला डावलण्यात आल्याचा पाहायला मिळालं. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते सुधीर मनगंटीवार यांना देखील डावलण्यात आल्याने ते नाराज असल्याच बोलल जात आहे. याबाबत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तसेच महायुती सरकारचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारल असता ते म्हणाले की ते पक्षाचे नेते असून ते अध्यक्ष देखील राहिलेले आहे आणि त्यांनी संघटनेत देखील काम केलं आहे. त्यांच्यावर मोठी जबाबदारी येऊ शकते. पक्ष योग्य व्यक्तीच योग्य निर्णय करत असतो अस यावेळी बावनकुळे म्हणाले.

पुण्यात होत असलेल्या पुस्तक महोत्सवाला भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तसेच महायुतीचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी याबाबत वक्तव्य केल. यावेळी ते म्हणाले की पुणे शहरात पुस्तक महोत्सव होत आहे आणि या पुस्तक महोत्सवातून काही शिकण्यासाठी मी आलो आहे.देशात कुठेही एवढं मोठं आयोजन करण्यात आलं नाही अस आयोजन पुस्तक महोत्सवात करण्यात आलं असून देशातील काण्याकोपऱ्यातून लोक या पुस्तक महोत्सवाला भेट देण्यासाठी येत आहे.आणि हे पाहण्यासाठी मी येत असल्याचं यावेळी बावनकुळे म्हणाले.

काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर अनेक नेते हे नाराज असल्याचं सांगितलं जातं आहे. पक्षामध्ये जो काही निर्णय होत असतो तो मान्य करावं लागतो.त्यामुळे सुधीर भाऊ मानले असून भुजबळ साहेब देखील मानतील असे यावेळी बावनकुळे म्हणाले.

## छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करा- हाके



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीत ओबीसी समाजाने राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीला मतदान केले आहे, त्यामुळेच राज्यात त्यांची सत्ता आली आहे. मात्र; हे वास्तव असतानाही ओबीसी नेते छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळात स्थान न देता सरकारने त्यांचाच नव्हे तर संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान केला आहे अशी जहरी टीका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली. राष्ट्रवादी काँग्रेसला ओबीसी समाजाच्या बद्दल एवढीच आत्मीयता असेल तर त्यांनी भुजबळ यांना अडीच वर्षे उपमुख्यमंत्री करावे असे आव्हानही त्यांनी दिले.

जहरी टीका

अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार छगन भुजबळ आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे राज्यातील ओबीसी समाज नाराज झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये अनेक नव्या चेहऱ्याना संधी देण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी आक्रमक भूमिका मांडली असून अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री करावे आणि छगन भुजबळ यांना मंत्रिपदापासून डावलून ओबीसी समाजाच्या मतांचा अजित पवार यांनी अपमान केला असल्याचा आरोप देखील लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

नागपूर येथे काल मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यामध्ये धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांना स्थान दिले. यामुळे ओबीसी समाजातील प्रत्येक व्यक्तीला आनंद झाला. पण दुसऱ्या बाजूला मागील कित्येक वर्षांपासून ओबीसी समाजाला न्याय मिळावा, यासाठी छगन भुजबळ हे कायम संघर्ष करीत राहिले असून त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. तसेच दुसऱ्या बाजूला गोपीचंद पडळकर यांना देखील मंत्री मंडळात स्थान देण्यात आले नाही. यामुळे ओबीसी समाजात प्रचंड नाराजी आहे.

"विधिमंडळातील सर्वात ज्येष्ठ सभासद म्हणून छगन भुजबळ असून त्यांना मंत्रिमंडळातून का डावलण्यात आले. त्यामागे नेमकी कोणती कारणे होती. याबाबत अजित पवार यांनी समोर येऊन उत्तर द्यावे, अडीच वर्षाच्या मंत्रिपदाचा पायंडा पाडणारे अजित पवार यांनी छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री देणार असल्याचे पुढे सांगावे, आम्ही सर्व शांत बसू आणि छगन भुजबळ यांना अडीच वर्ष उपमुख्यमंत्री पद द्यावे."

— लक्ष्मण हाके,
ओबीसी नेते

# पुणे रेल्वे स्थानक परिसरातील 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा पुन्हा सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रवासी सेवा संघाचा करार संपुष्टात आल्यानंतर तीन महिन्यांपासून प्रीपेड ऑटो रिक्षा केंद्र सुविधा बंद करण्यात आली होती. परंतु आता पुणे रेल्वे स्थानक परिसरातील 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. ही सुविधा सुरू झाल्यापासून प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत १८ हजारांहून अधिक प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घेतला असून ३१ लाखांपेक्षा जास्त व्यवहार या सुविधेमार्फत झाले आहेत.

रेल्वे स्थानकातील परिसरात मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला प्रीपेड ऑटो रिक्षा केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आतापर्यंत एक हजार २४९ रिक्षाचालकांनी नोंदणी केली आहे. प्रवाशांना नियोजित ठिकाणी जाण्यासाठी अगोदरच ऑनलाइन शुल्क घेतले जात आहे. त्यामुळे तक्रारी, वादविवाद या घटनांना पूर्णत: आळा घालता येणे शक्य झाले आहे. पुणे रेल्वे स्थानकात रिक्षाचालकांकडून बेकायदा पद्धतीने प्रवाशांकडून प्रवासी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आरटीओ, पुणे शहर वाहतूक पोलीस, रेल्वे प्रशासन, पुणे महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीने रिक्षाचालकांसाठी स्वतंत्र नियमावली तयार केली आहे. त्यामुळे प्रवासी वाहतूक संघटनेच्या सदस्यांवर या समितीने दिलेले निकष बंधनकारक आहेत. तसेच खटुआ समितीच्या निर्देशानुसार पाच किलोमीटर अंतर असल्यास नियमित दरापेक्षा १० टक्के जास्त शुल्क आणि त्यापेक्षा जास्त अंतर असल्यास १५ टक्के जास्त शुल्क आकारले जात आहे, अशी माहिती पुणे आरटीओचे अधिकारी स्पप्रील भोसले यांनी दिली.

"जुलै २०२४ मध्ये वाहतूक संघटनेसोबत असलेला करार संपुष्टात आल्याने, तसेच नोंदणीकृत सदस्यांपैकी काही सदस्यांच्या कागदपत्रांमध्ये अपूर्तता आढळून आल्याने ही सेवा बंद करण्यात आली होती. मात्र, संघटनेने ही प्रक्रिया पूर्ण केल्याने रेल्वे स्थानकातील 'प्रीपेड ऑटो रिक्षा' सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे."

— डॉ. केशव क्षीरसागर,
अध्यक्ष,
भारतीय गिग कामगार मंच

## पिस्तूल बाळगल्याप्रकरणी दोघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पिस्तूल बाळगल्याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली. त्याच्याकडून दोन पिस्तुले, तसेच काडतुसे जप्त करण्यात आली. साजन विनोद शहा (वय १९), कुणाल शिवाजी पुरी (वय १८, दोघे रा. धायरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम गुन्ला यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शहा आणि पुरी यांच्याविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल आहेत. . पिस्तूल आणि काडतूल जप्त करण्यात आले. सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव तपास करत आहेत.

# महापालिका व ग्राहक यांच्यामधील वाद तडजोडीने निकाली

## मिळकतदाराला दोन लाखांची रक्कमही मिळाली परत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्राहक व मनपा यांच्यातील दावा पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाद्वारे लोकन्यायालयात तडजोडीतून निकाली काढण्यात आला. मिळकत कर भरलेला असतानाही महापालिकेकडून अतिरिक्त विलंब शुल्क व दंडाचे नोटीस शुल्क बजावण्यात आले. त्यामुळे करदात्याने महापालिकेविरोधात येथील ग्राहक आयोगात दावा दाखल केला.

करदाते जीजो मॅथ्यू यांनी नियमितपणे मिळकत कर आपल्या बचत खात्यातून भरला होता. मात्र त्यांनी भरलेला कर पुणे मनपाच्या नोंदीत आला नाही. त्यामुळे महापालिकेकडून मॅथ्यू यांना कर न भरल्यामुळे अतिरिक्त विलंब शुल्क व दंड नोटीस शुल्क बजावण्यात आले. ही बाब मॅथ्यू यांनी व्यक्तिशः ग्राहक आयोगाच्या निदर्शनास आणून दिली.

आयोगाचे अध्यक्ष अनिल जवळेकर, सदस्या शुभांगी दुनाखे व सरिता पाटील यांच्यापुढे हे प्रकरण दाखल करण्यात आले. हे प्रकरण प्रलंबित असताना पुणे जिल्हा आयोगाने सामंजस्याने प्रकरण मिटविण्यासाठी प्रयत्न केले. त्यानुसार शनिवारी झालेल्या लोक न्यायालयामध्ये हे प्रकरण निशांत अर्धापुरे व निरेश भरते यांच्यासमोर वर्ग करण्यात आले. लोकन्यायालयात पॅनेलमधील सदस्यांनी दोन्ही पक्षकारांत तडजोड घडवून आणली. त्यामुळे प्रलंबित असलेले हे प्रकरण लोक न्यायालयाद्वारे मिटले. या प्रकरणात महापालिकेतर्फे पॅनेल वकील ऋषिकेश गानू यांनी कामकाज पाहिले. तसेच पुणे महापालिका विधी खात्याचे मुख्य सल्लागार म्हणून ॲड. निशा चव्हाण यांनी बाजू मांडली. महापालिकेच्या कर खात्याने बारकाईने पडताळणी केली असता मॅथ्यू यांनी मिळकत कर भरल्याचे आढळून आले. तसेच त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेली एक लाख ९५ हजार ६९२ रुपयांची रक्कम त्यांना धनादेशाद्वारे देण्यात आली.

# एमओसी कम्युनिटी कॅन्सर सेंटरचे लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एम. ओ. सी. कॅन्सर केयर एंड रिसर्च सेंटर या कर्करोगग्रस्तांचा प्रयास सुखकर करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या संस्थेने डिसेंबर महिन्यात आपले नवे कम्यूनिटी कॅन्सर सेंटर कल्याणी नगर, पुणे येथे रुग्णसेवेसाठी रुजू केले आहे. पुणे शहर, जिल्हा तसेच महाराष्ट्रात कॅन्सरचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे.

उपचारांसाठी फक्त शासकीय व खाजगी इस्पितळांवर विसंबून राहणे तेथील महागडे उपचार, सेवा सुविधा मिळण्यास होणारा विलंब रुग्णांच्या समस्यांमध्ये भर पाडणारे आहे. अशा परिस्थितीत कम्यूनिटी कॅन्सर सेंटर्स रूग्णांना अतिशय उपयोगी पडतात जिथे मोठ्या इस्पितळांइतकेच योग्य निदान, योग्य उपचार, अनुभवी कर्करोग तज्ज्ञांकरवी, रुग्णांच्या जवळच्या परिसरात आणि वाजवी दरात दिले जातात अशी माहिती एम. ओ. सी. चे कर्करोगतज्ज्ञ डॉ. तुषार पाटील आणि डॉ. रेश्मा पुराणिक यांनी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

एम. ओ. सी कल्याणी नगर हे ३० बेड्सने सज्ज सेमी आय.सी.यू. युक्त कॅन्सर सेंटर असून इथे सर्व प्राइवेट मेडिकल इन्शुरन्स आणि पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य योजनेच्या लाभार्थींना उपचार घेता येणार आहेत अशी माहिती एम. ओ. सी.चे कर्करोगतज्ज्ञ डॉ. अश्विन राजभोज आणि डॉ. आस्मा पठाण यांनी दिली. रुग्णांचे त्रास कमी करण्याच्या दृष्टीने अशी सेंटर पर्यायी व्यवस्था म्हणून आपले महत्व प्रस्थापित करीत आहेत.

## वृत्तपत्र छायाचित्रकारांचे प्रदर्शन...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**पुणे :** पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यातील वर्षभरातील घडामोडींचे विविध वृत्तपत्रांतील छायाचित्रकारांनी काढलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन पुणेकरांना पुणे पुस्तक महोत्सवात पाहता येणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले.

# खरेदीच्या बहाण्याने चोरी; भामटा जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खरेदीच्या बहाण्याने सराफी पेढीतून सोनसाखळी चोरून पसार झालेल्या चोरट्याला सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक केली. चोरट्याने सराफी पेढीतून सोनसाखळी चोरीचे चार गुन्हे केल्याचे उघडकीस आले असून, त्याच्याकडून तीन लाख ६४ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. कपिल जयराम चव्हाण (वय ३९, रा. शास्त्रीनगर, कोथरुड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. सिंहगड रस्ता भागातील धायरी परिसरातील एका सराफी पेढीतून खरेदीच्या बहाण्याने चोरट्याने सोनसाखळी चोरून नेल्याची घटना घडली होती. चव्हाण वाढदिवसानिमित्त सोनसाखळी खरेदी करायची आहे, अशी बतावणी करुन सराफी पेढीत शिरायचा.पेढीतील आरशासमोर थांबून तो सोनसाखळी परिधान करायचा.

महिनाभरात अशा प्रकारच्या तीन ते चार घटना घडल्या होत्या. सिंहगड रस्ता पोलिसांकडून या गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. चव्हाणने खरेदीच्या बहाण्याने सराफी पेढीतून सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा माग काढण्यास सुरुवात केली. चव्हाण कोथरूड भागात येणार असल्याची माहिती तपास पथकाला मिळाली. पोलिसांनी सापळा लावून त्याला पकडले. पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, संजय शिंदे, अण्णा केकाण, उत्तम तारू, पंकज देशमुख, देवा चव्हाण यांनी ही कारवाई केली.

# जिल्हा न्यायालयात 'टिफिन हॉल' चे उदघाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील वकिलांना जेवण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'टिफीन हॉल'चे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. अल्पोपाहार व जेवण करून हॉलचा उदघाटन समारंभ पार पडला. पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष संतोष खामकर, उपाध्यक्ष कुमार पायगुडे, पवन कुलकर्णी, सचिव चेतन हरपळे यांसह असोसिएशनचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

उदघाटन

न्यायालयाच्या विस्तारासाठी येथील अग्रवाल कॅन्टीन पाडण्यात आले आहे. आवारात असलेल्या तीनपैकी दोन कॅन्टीन पाडण्यात आल्याने वकीलवर्गासह पक्षकारांना जेवणाचा डबा खाण्याची अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे जेवणासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी वकिलांकडून करण्यात येत होती. याबाबत येथील न्यायालय प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा केल्यानंतर नवीन इमारतीच्या गच्चीवर 'टिफीन हॉल' उभारण्यात आला आहे, अशी माहिती ॲड. खामकर यांनी दिली.

# पुण्याच्या ओबडधोबड रस्त्यांची घेतली 'सर्वोच्च' दखल

### रस्ते

विकास आराखड्यात प्रस्तावित असलेल्या धायरी येथील सावित्री गार्डन ते सिंहगड रोड या रस्त्यावर गेल्या चार ते पाच वर्षांत कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहे. एवढा खर्च करूनही मध्यभागी जेमतेम चारशे मीटर इतकेच काम करण्यात आले आहे. उर्वरित काम अनेक वर्षे प्रलंबित आहे. वाहतूक नियंत्रित करण्यासाठी येथे पुरेसे पोलीस कर्मचारी, होमगार्ड, वाहतूक वॉर्डन नसतात. अनेकदा वाहतूक नियंत्रक दिवे बंद असतात. त्यामुळे धायरीगाव रस्त्यासह धायरी, नऱ्हे, नांदेड फाट्यापासून नांदेड सिटी, लगड मळा ते धायरी फाटा या रस्त्यावर वाहतूककोंडीची गंभीर समस्या बनली आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या ओबडधोबड रस्त्यांची किर्ती जागतिक पातळीवर जाऊन पोचली आहे, यासाठी सामाजिक संघटना आणि काही कार्यकर्त्यांनी महापालिकेसह केंद्र तसेच राज्य शासनाचेही दरवाजे ठोठावले. मात्र; गेल्या काही वर्षांच्या कालावधीत त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. त्यातूनच मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे; त्यामुळे संतप्त झालेल्या एका कार्यकर्त्याने थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या दरबारी पुण्याची समस्या मांडली आहे. या कार्यालयानेही या तक्रारीची 'सर्वोच्च' दखल घेत प्रलबिंत रस्त्यांच्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत.



पुणे शहराचा चारही बाजूंना होणारा विस्तार आणि वाढत असलेली लोकसंख्या या तुलनेत वाहतुकीसाठी कमी पडणारे रस्ते यामुळे शहरातील अनेक भागात सदा सर्वदा वाहतूक कोंडीचा त्रास पुणेकरांना सहन करावा लागतो. धायरी भागातील नागरिकांनाही गेल्या अनेक वर्षांपासून या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात (डी पी) मध्ये प्रस्तावित करण्यात आलेले रस्ते तयार करून ते वाहतुकीसाठी उपलब्ध करून द्यावेत. यामुळे वाहतुकीची समस्या कमी होईल, नागरिकांना दिलासा मिळेल यासाठी धायरी परिसरातील प्रस्तावित चार डीपी रस्ते सुरू करावेत, यासाठी येथील नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे अनेकदा पाठपुरावा केला.

"२८ वर्षांपूर्वी या चार डीपी रस्त्यांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, महापालिका, राज्य सरकार यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करूनही केवळ दुर्लक्ष केले जाते. नागरिकांच्या समस्येची दखल घेतली जात नसल्याने राष्ट्रपती मुर्मू यांना निवेदन देण्यात आले होते. त्यांनी याची दखल घेत मुख्य सचिवांना सूचना केल्या आहेत."

—धनंजय बेनकर,
शहराध्यक्ष, आप

राज्य सरकारचे दरवाजे ठोठावले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांनी हा प्रश्न राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दरबारात मांडण्याचा निर्णय घेतला. धायरी भागात होत असलेली वाहतूक कोंडी आणि त्यामुळे नागरिकांना होत असलेल्या मनस्तापाची तक्रार या भागातील नागरिकांनी राष्ट्रपतींकडे केली. आपल्या त्रासाची माहिती टपाल कार्यालयाच्या माध्यमातून पत्राद्वारे राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आली. या पत्राची दखल घेत राज्याच्या मुख्य सचिवांना राष्ट्रपतींनी सूचना देखील केल्या आहेत.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ 'रिपाइं'ची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** परभणी येथे संविधानाच्या अवमानानंतर घडलेल्या घटने संदर्भात पोलिसांनी केलेल्या कॉबिंग ओपारेशन मध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महिला यांना घरातून उचलून अटक करण्यात आली. रविवारी यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीत दुर्दैवी मृत्यू झाला. शहिद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशीला न्याय मिळालाच पाहिजे; दोषी पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा; कोंबींग ऑपरेशनचे आदेश देणाऱ्या पोलिसांचे निलंबन करा, जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि आंबेडकरी वसाहतीमध्ये वाहनाची तोडफोड करणाऱ्या पोलिसांना निलंबित करा, सदर प्रकारणाची सीबीआय चौकशी करा आदी मागण्यांसाठी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशासना विरोधात पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे तीव्र आंदोलन करीत निदर्शने करण्यात आली.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयसमोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या अवरामध्ये संविधानाची तोडफोड करून विटंबना करण्यात आली. त्यातील मुख्य आरोपी व त्या मागील कटकारस्थान करणारे यांना कठोर शिक्षा करावी त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा या हेतुने मोठे जनअंदोलन केले गेले. त्यावेळी पोलिसांनी केलेल्या कॉबिंग ओपारेशन मध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, महिला यांना घरातून उचलून अटक करण्यात आली. रविवारी यातील मूळचा पुणे जिल्ह्यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा पोलिस कोठडीत दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेच्या निषेधार्थ आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने प्रशासना विरोधात पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे शहराध्यक्ष संजय सोनावणे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र निदर्शने करण्यात आली.

यावेळी राज्य सचिव बाळासाहेब जानराव, राज्य संघटक सचिव परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, माजी नगरसेवक अशोक कांबळे, माजी शहराध्यक्ष महेंद्र कांबळे, संगीता आठवले, विशाल शेवाळे, माजी नगरसेविका हिमाली कांबळे, बसवराज गायकवाड, शाम सदाफुले, राहुल डंबाळे, निलेश अल्हाट, बापूसाहेब भोसले, यशवंत नडगम, मिना मालटे, संदीप धांडोरे, अविनाश कदम, चांदणी गायकवाड, मिनाज मेनन, माहादेव कांबळे, संतोष खरात, मुन्ना बक्षशेख, मंगल रासगे, राजेश गाडे, एस. बी. गायकवाड, भारत भोसले, विनोद टोपे, आशीष भोसले, विरेन साठे, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, अमित सोनवणे, सुन्नाबी शेख, संतोष गायकवाड, सुरज गायकवाड, रामभाऊ कर्वे, शंशाक माने, करण सोरटे, रविन्द्र कांबळे, सुशील मंडल, रोहित कांबळे, युवक आघाडीचे महाराष्ट्र राज्य संघटक उमेश कांबळे आदी यावेळी उपस्थित होते.

> "कॉबिंग ऑपरेशन दरम्यान जखमी झालेल्या लोकांना पोलिसांनी रुग्णालयात न नेता पोलिस ठाण्यात डांबून ठेवले. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू हा हृदयविकाराच्या झटक्याने न होता पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळे पोलिस कोठडीत झाला. मात्र सरकार हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करीत आहे."
>
> — परशुराम वाडेकर, प्रदेश संघटक सचिव, रिपाइं, आठवले गट

परशुराम वाडेकर म्हणाले, परभणी येथे झालेल्या पोलिसांच्या कॉबिंग ऑपरेशन मध्ये पुण्यातील सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी जे कॉबिंग ऑपरेशन केले ते केवळ दलित व बौद्ध वस्ती असलेल्या ठिकाणी ठरवून केलेले आहे. जय भीम लिहिलेल्या गाड्या पोलिसांनी फोडलेल्या आहेत. सध्या हिवाळी अधिवेशन सुरू आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाला कोण जबाबदार आहे हे सांगावे. तसेच अशा प्रकारे कायदे हातात घेणाऱ्या पोलिसांवर कारवाई व्हावी, सदर प्रकारणाची सीबीआय चौकशी करावी अशी आमची मागणी आहे. अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन करू, असा इशारा वाडेकर यांनी दिला.

# म्हाडाच्या घरांसाठी आता आणखी मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** म्हाडाच्या घरांसाठी अर्ज करण्यास दि. १० ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात झाली. दिवाळी आणि विधानसभा निवडणुकीमुळे अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी नागरिकांतून करण्यात आली होती. ती मान्य करीत म्हाडाने या सोडतीस दि. 10 डिसेंबर 2024 पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र, नागरिकांकडून कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी आणखी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. ती मान्य करत म्हाडाने येत्या 31 डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज भरण्याची नागरिकांना संधी दिली आहे.म्हाडाच्या पुणे विभागाकडील घरांच्या सोडतीसाठी मुदतवाढ देण्यात आली असून, त्यानुसार येत्या ३१ डिसेंबरपर्यंत नागरिकांना अर्ज करता येणार आहे. दरम्यान, म्हाडा ६ हजार २९४ घरांसाठी आतापर्यंत सुमारे ६८ हजारांपेक्षा अधिक अर्ज आले आहेत, अशी माहिती म्हाडा पुणे विभागाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

म्हाडाने काढलेल्या सोडतीमध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्यामधील २ हजार ३४० घरे आहेत. म्हाडाच्या विविध योजनेतील घरांची संख्या ९३ आहे, प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांची संख्या ४१८, तर २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील सदनिकांची संख्या ही ३हजार ३१२ आहे. १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील घरांची संख्या १३१ आहे. या घरांसाठीऑनलाइन अर्जासाठी नोंदणीची मुदत दि. 31 डिसेंबरपर्यंत आहे, तर ऑनलाईन पेमेंट, अनामत रक्कम स्वीकृती अंतिम मुदत दि. २ जानेवारी २०२५ पर्यंत आणि सोडत दि. २८ जानेवारी २०२५ रोजी काढण्यात येणार आहे.

म्हाडाच्या घरांसाठीची सोडतीपूर्वीची अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया, सोडत, तसेच सोडतीनंतरची ताबा प्रक्रिया संपूर्णपणे संगणकीकरणाद्वारे ऑनलाइन पार पाडण्यात येणार असल्याने सोडतीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आहे, अशी माहिती साकोरे यांनी दिली.

म्हाडाच्या घरांच्या सोडतीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी अर्जदारांनी प्रथम www.mhada.gov.in अथवा https://mhada.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी, तर प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्त्वावरील योजनांच्या सदनिकांसाठी lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे, अशी माहिती साकोरे यांनी दिली.

## Selected



# रुग्ण हक्क परिषद शहराध्यक्षपदी अपर्णा मारणे-साठ्ये

**पुणे :** रुग्ण हक्क परिषद, पुणे शहर कार्यकारिणीची बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी पोलीस आयुक्त तथा पृथ्वी मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष मिलिंद गायकवाड होते. यावेळी मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. बैठकीस प्रमुख मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी केले तर परिषदेचे महा. प्रदेश उपाध्यक्ष अजय विरकर, पश्चिम महा. समन्वयक के. सी. पवार, विदर्भ विभागाचे समन्वयक एकनाथ पातुरकर प्रमुख उपस्थित होते.पदाधिकारी खालील प्रमाणे- राहुल हुलावळे:पुणे शहर कार्याध्यक्ष (पूर्व विभाग), राजेश अडसूळ - पुणे शहर कार्याध्यक्ष (प. विभाग),. प्रभा अवलेलू - प्रमुख संघटक, पुणे शहर, रेश्माताई जांभळे( संघटक, पुणे शहर),. फारुक सोलापूरे ( पुणे शहर सल्लागार), डॉ. सुनील साळवे ( उपाध्यक्ष), बुद्धभूषण निकम ( उपाध्यक्ष), रेखाताई वाघमारे ( उपाध्यक्ष), उमर शेख- संपर्कप्रमुख (राजकीय विभाग), श्याम पुणेकर - पुणे शहर संपर्कप्रमुख (जनरल), शारदाताई लडकत - सरचिटणीस चित्राताई साळवे ( सचिव),गौरव चव्हाण ( निमंत्रक, ), मल्हार कदम( निमंत्रक, ), अनिल पुटगे ( युवा समन्वयक, ), दिलीप साळुंखे (कार्यालयीन सचिव), अमृता जाधव कार्यालयीन उपसचिव), मंदाताई साठे - विभाग अध्यक्ष ( कसबा विधानसभा ), दिलीप ओव्हाळ - सदस्य.




# येरवड्यात सावली प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबीर

**पुणे :** सावली प्रतिष्ठानच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये तब्बल साठ रक्तदात्यांनी रक्तदान केले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते सुरेंद्र पठारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर युवक अध्यक्ष किशोर कांबळे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी,लष्कर- ए -भीमा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन धिवार , नगरसेवक संजय भोसले , स्वीकृत नगरसेवक राकेश चौरे ,सामाजिक कार्यकर्ते शंकर चव्हाण ,मुकेश धनगेकर , राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वडगाव शेरी मतदार संघाचे कार्याध्यक्ष शैलेश राजगुरू ,भाजप पुणे शहर उपाध्यक्ष संतोष राजगुरू, भाजपा चिटणीस मयूर शिंदे ,खुसगावचे सरपंच मयूर मांजरे , हैदर अली मोगले , अमोल् डुबे ,अरुण लोकम् ,प्रकाश माने, संतोष भोसले ,प्रशांत मोरे तोसिफ कुरेशी, किशोर वाघमारे, दत्ता भालशंकर ,अनिल झेंडे रोहित गायकवाड महेश भोसले, विनोद जाधव अशा विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी या शिबिरास उपस्थिती लावली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष निरंजन कांबळे ,सचिव दत्तात्रय शिंदे खजिनदार राजेश जाधव, कार्याध्यक्ष गौरव जवंजाळ ,उपाध्यक्ष रत्नेश जाधव खजिनदार राजेश जाधव यांच्या सह खजिनदार गोपाळ सुतार, सहसचिव राकेश ढेबे ,संदेश मोरे, सदस्य साहिल कांबळे या यांनी प्रयत्न केले.

# कारवाईची भीती दाखवून तरुणाला २१ लाखांना गंडा

**पुणे :** अमली पदार्थ विरोधी विभागाकडून (एनसीबी) कारवाई करण्यात येणार असल्याची बतावणी करुन सायबर चोरट्यांनी भारती विद्यापीठ परिसरातील एका तरुणाची २० लाख ९० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला.याबाबत एका तरुणाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण कात्रज भागात राहायला आहे. सायबर चोरट्यांनी तरुणाच्या मोबाइल क्रमांकावर २९ ऑक्टोबर रोजी संपर्क साधला. अमली पदार्थ विक्री प्रकरणात अमली पदार्थ विरोधी पथकाकडून (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो-एनसीबी) कारवाई करण्यात येणार आहे.

# 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४' स्पर्धा संपन्न

## आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अव्वल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (एआयटी) विद्यार्थ्यांनी अभिमानास्पद कामगिरी करत 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४' स्पर्धेत दोन विभागांत प्रथम क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांच्या चमूने कल्पकता, बुद्धीवैभव आणि नवकल्पनांचे दर्शन घडवत राष्ट्रीय स्तरावरील निर्भेळ यश मिळवत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

देशभरात अत्यंत प्रतिष्ठेची असलेल्या 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन' स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच देशभरातील ५१ नोडल केंद्रांवर पार पडली. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमधील नवकल्पनांचे जागरण आणि नागरी समस्या निवारणाच्या उपाययोजना यांचे नाते जोडणारा केंद्र सरकारचा विशेष पुढाकार आहे. या स्पर्धेत 'एआयटी'च्या 'टीम ब्लॅक सिंडिकेट' व 'टीम कार्बन डेटर्स' हे दोन संघ सहभागी झाले होते. दोन्ही संघानी प्रथम क्रमांक पटकवला आहे.

न्यायवैद्यकीय संगणकीय पुराव्यांचे महत्त्व आणि विश्लेषण अधोरेखित करण्यासाठी साह्यभूत ठरणारी संगणकीय प्रणाली विकसित करणाऱ्या 'टीम ब्लॅक सिंडिकेट' या संघात चेतन सिंग, यश पाठक, धरिंदरसिंग, रोशनी गौडा, आदित्य प्रताप, रजत सिंग यांचा समावेश होता. नोएडा इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, ग्रेटर नोएडा येथील स्पर्धेत या टीमने एक लाख रुपयांचा प्रथम पुरस्कार विभागून मिळवला. 'क्रिएटिंग अ सायबर ट्रिंज टूल टू स्ट्रीमलाईन डिजिटल फॉरेन्सिक इन्व्हेस्टिगेशन' या समस्येवर उपाय शोधणारी प्रणाली या टीमने विकसित केली असून, त्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी-एनआयए) टीमला अर्थसहाय्य पुरवले होते.

टीम कार्बन डेटर्सने कौशल व्यासच्या नेतृत्वाखाली निखिल धारिवाल, रिया कुमारी, शुभम कुमार, एच. आयुष आणि केबीव्ही किशोर यांच्या संघाने आयआयटी तिरुपती येथे विभागून प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक विभागून मिळवले. 'पोर्टल फॉर इनोव्हेशन एक्सलन्स इंडिकेटर्स' या पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांमधील नवकल्पनांच्या गुणवत्तेचे मोजमाप प्रदर्शित करणारी प्रणाली त्यांनी विकसित केली असून, यासाठी आयुष मंत्रालयाअंतर्गत ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद यांनी अर्थसाहाय्य दिले होते.

प्रा. वैशाली इंगळे आणि प्रा. कुलदीप हुले यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. एआयटीचे अध्यक्ष मेजर जनरल के. के. चक्रवर्ती, एआयटीचे संचालक ब्रिगेडियर अभय भट, एआयटीचे प्राचार्य डॉ. बी. पी. पाटील यांनी पुरस्काप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शिवगौरवगाथा महानाट्य, बालिकांचे आणि आचार्यांचे कन्यावंदन

## हिंदू सेवा महोत्सवात घडणार हिंदू सेवा व संस्कृतीचे दर्शन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** शिव गौरवगाथा महानाट्य, शिख समाजाच्या चार शहजादे बलिदानावर आधारित लाईव्ह शो, १ हजार बालिकांचे कन्यावंदन, १ हजार आचार्य वंदन, १ हजार वादकांद्वारे मृदुंग वादन, १ हजार मातृ-पितृ वंदन, शेकडो महिलांद्वारे अथर्वशीर्ष, श्रीसुक्त पठण, विष्णू सहस्त्रनाम व सौंदर्य लहरी पठण, देशभक्ती जागरण आधारित अनेक कार्यक्रम, वीरमाता व वीरपत्नी सन्मान सोहळा,दगडूशेठ गणपती मंदिरा द्वारे मोफत आरोग्य शिबीर, संत संमेलन अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून हिंदू सेवा महोत्सवात सेवा आणि संस्कृतीचे दर्शन घडणार आहे.

हिंदू आध्यात्मिक सेवा संस्थेतर्फे हिंदू सेवा महोत्सवाचे आयोजन पुण्यामध्ये करण्यात आले आहे. यामध्ये हिंदू संस्कृती, संस्कार आणि सामाजिक सेवा कार्याचे विराट दर्शन पुणेकरांना घडणार आहे. दिनांक १९ ते २२ डिसेंबर २०२४ दरम्यान स.प.महाविद्यालय मैदान येथे हा भव्य महोत्सव होत असून यामध्ये महाराष्ट्रातील अनेक महत्वपूर्ण देवस्थाने, सामाजिक व धार्मिक संस्थांनी सक्रिय सहभाग घेतला आहे, अशी माहिती हिंदू अध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला हिंदू सेवा महोत्सवाचे अध्यक्ष व कोहिनूर ग्रुपचे कृष्णकुमार गोयल, संस्थेचे महामंत्री किशोर येनपुरे, उपाध्यक्ष पंडित शिवकुमार श्री, इस्कॉनचे संजय भोसले, स्वामीनारायण मंदिरचे राधेश्याम अग्रवाल, चरणजितसिंग सहानी, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे महेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

>> सांस्कृतिक

महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार, १९ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता रा.स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, प.पू.स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज, इस्कॉन चे गौरांग प्रभू, ज्योतिषरत्न जैन मुनी लाभेश विजय म.सा. यांच्या हस्ते होणार आहे. मठ-मंदिरांच्या सेवाकार्याचे प्रदर्शन, जैन तत्वज्ञानावर आधारित भव्य पॅव्हेलियन, संत संमेलन असे असंख्य कार्यक्रम होणार आहेत. महोत्सवाला देशभरातील साधूसंत, राज्यपाल, केंद्रीय मंत्री व मुख्यमंत्री यांची उपस्थिती देखील असणार आहे. १९ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता १ हजार बालिकांचे कन्यावंदन आणि सायंकाळी ७.३० वाजता सफर-ए-शहादत हा पंजाबी कलाकारांचा साऊंड व लाईट शो हे प्रमुख आकर्षण असणार आहे. २० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सामूहिक वंदे मातरम कार्यक्रमांतर्गत वीरमाता, वीर पत्नी सन्मान सोहळा होणार आहे. तर, सायंकाळी ७ वाजता शिव गौरव गाथा हे महानाट्य सादर होईल.

२१ डिसेंबर रोजी तब्बल ३ हजार पुणेकरांच्या उपस्थितीत मातृ-पितृ वंदनाचा कार्यक्रम सकाळी १० वाजता होणार आहे. तर, दिवसभरात चेंदा मेलम, केरळी वाद्यवादन, भरतनाट्यम नृत्यप्रकार सादरीकरण कार्यक्रम होईल. शेवटच्या दिवशी २२ डिसेंबर रोजी १ हजार वादकांचे मृदुंग वादन हा दुपारी ४ वाजता उपक्रम होणार आहे. तर, सायंकाळी ७ वाजता संत संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

पुण्यातील प्रमुख संस्था, मंदिरे यांसह राज्यातून अनेक संस्था, प्रमुख देवस्थाने, संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. केवळ हिंदू शक्तीचे दर्शन घडविणे हा महोत्सवाचा उद्देश नसून हिंदू संस्कृतीतील संस्कार, सृष्टी संवर्धन, देशभक्ति जागरण, नारी सन्मानमध्ये अभिवृद्धी, पर्यावरण संरक्षण, इकॉलोजी संतुलन याचे महत्व सर्वांपर्यंत पोहोचविणे हा आहे.

> "एकविसाव्या शतकात धार्मिक - सामाजिक संस्थांनी कशा प्रकारे वाटचाल करावी, समाजातील गरजूंसाठी कशा प्रकारे उभे रहावे, याचे मार्गदर्शन देखील महोत्सवात केले जाणार आहे. संत संमेलनासारख्या प्रमुख कार्यक्रमाद्वारे संत महंतांचे विचार ऐकण्याची आणि नाटक व सादरीकरणाद्वारे हिंदू संस्कृतीचा इतिहास जाणून घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. चार दिवसीय महोत्सवाला विनामूल्य प्रवेश असून पुणेकरांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे."
>
> — कृष्णकुमार गोयल, अध्यक्ष, हिंदू सेवा महोत्सव

# राजकीयदृष्ट्या पुणे झाले आणखी पॉवरफुल्ल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी काळात शहराच्या विकासाला मोठा बूस्ट मिळू शकणार आहे.राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारात पुणे शहराला एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्री, अशी तब्बल दोन मंत्रिपदाची लॉटरी लागली आहे. त्यामुळे केंद्रातील मंत्रिपदापासून राज्यात दोन मंत्रिपदे, राज्यसभा खासदार, विधानपरिषद अशी महत्त्वाची पदे शहरात असल्याने राजकीयदृष्ट्या पुणे आणखी पॉवरफुल्ल बनले आहे.

विधानसभा निवडणुकीत शहरातील आठपैकी सात जागा जिंकून महायुतीने घवघवीत यश मिळविले. त्यामुळे शहरातील किमान दोन आमदारांची मंत्रिमंडळात वर्णी लागेल, अशी शक्यता होती. त्यानुसार कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील आणि पर्वती मतदारसंघाच्या आमदार माधुरी मिसाळ या दोन आमदारांना भाजपने मंत्रिपदाची संधी दिली आहे. यापूर्वी लोकसभा निवडणुकीत विजयी झालेले पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांना पहिल्याच टर्ममध्ये भाजपने केंद्रीय राज्यमंत्रिपदाची संधी दिली. त्यांच्याकडे विमान उड्डाण नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री, अशा दोन महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी दिली. त्यामुळे केंद्रात एक आणि राज्यात दोन, अशी तब्बल तीन मंत्रिपदे पुणेकरांच्या वाट्याला आली आहेत. याशिवाय लोकसभा निवडणुकीच्या आधी माजी आमदार मेधा कुलकर्णी यांची राज्यसभा सदस्यपदी निवड झाली. याशिवाय माजी आमदार योगेश टिळेकर यांनाही विधानपरिषदेवर संधी मिळाली आहे. शिवसेनेच्या नेत्या व विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे ह्याही पुण्याच्या आहेत. केंद्रापासून राज्यापर्यंत आणि दोन्ही सभागृहांत पुणेकरांचे प्रतिनिधी आहेत. त्याचा थेट फायदा आता आगामी पुणे शहरातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी होणार आहे.

>> राजकीय

एकीकडे शहराच्या वाट्याला दोन मंत्रिपदे असतानाच जिल्ह्यातील आमदार दत्तात्रय भरणे यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळाले. याशिवाय, स्वत: उपमुख्यमंत्री अजित पवार हे पुणे जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे शहर आणि जिल्ह्याची राजकीय ताकद वाढली आहे.

# विकासक्षम नागरिकांमुळेच राष्ट्राची प्रगती - सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारताच्या विकासासाठी समाजातील सर्व घटकांना सक्षम करणे आवश्यक आहे. देशाचा विकास हा फक्त सेवेपुरता मर्यादित नाही. तर सेवेतून नागरिकांना विकासक्षम बनवायला हवे. अशा विकासक्षम नागरिकांमुळेच राष्ट्राची प्रगती होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

खराडी येथील ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी येथे आयोजित 'भारत विकास परिषद विकलांग केंद्रा'च्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्त राज्यस्तरीय मोफत दिव्यांग शिबीर आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये तब्बल १२०० दिव्यांगांना मॉड्युलर कृत्रिम हात व पाय बसविण्यासाठी मोजमाप घेण्यात येत आहे. सरसंघचालक पुढे म्हणाले, "काही अंशी अहंकार ही माणसाला कार्य प्रवृत्त करण्यास आवश्यक प्रेरणा ठरते. परंतू, त्या पलीकडे येते ती शाश्वत प्रेरणा. ती चिरंतन असते. त्यातून निर्माण होणारा सेवाभाव म्हणजे सेवानिष्ठांची मांदियाळी होय. आपलेपणाचा स्त्रोत



एकसारखाच असतो त्यातून लोकोत्तर प्रेरणेने सेवा घडते. सेवा करण्याची प्रवृत्ती सेवितात सुद्धा निर्माण होते. सेवित सुद्धा सेवा करणारे बनतात. हृदयस्थ नारायण आहे तो हे घडवून आणतो."

कार्यक्रमाला फाउंडेशनचे अध्यक्ष दत्ता चितळे, सचिव राजेंद्र जोग, केंद्र प्रमुख विनय खटावकर, ढोलेपाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात निता ढेकणे, शशिकांत बोरसे, अर्जुन सोनावणे, अनिकेत गाडेकर, वैजनाथ गोरख आणि नासिर शेख या दिव्यांगांना अत्याधुनिक मॉड्यूलर पाय प्रातिनिधीक स्वरूपात प्रदान करण्यात आले. मॉड्यूलर फूटबद्दल सुमित भौमिक यांनी तांत्रिक माहिती दिली

> "समाजात सर्वकाही वाईट चालल्याची भावना निर्माण झाली आहे. पण प्रत्यक्ष वाईटाहून ४० पट अधिक चांगले सेवाकार्य समाजात चालू आहे. त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे. कारण सेवेमुळेच समाजात शाश्वत विश्वास निर्माण होतो."
>
> — डॉ. मोहन भागवत, सरसंघचालक, राष्ट्रीय स्वंयसेवक संघ

## दिगंबरा दिगबंरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा...!

# श्री दत्त जयंती निमित्त घुमला दत्तनामाचा जयघोष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा... च्या गजरात आणि शेकडो भाविकांच्या गर्दीने फुललेल्या दत्तमंदिरामध्ये दत्तजन्म सोहळा उत्साहात पार पडला. कीर्तनकार ह.भ.प.तेजस्विनी कुलकर्णी यांच्या कीर्तनानंतर झालेला नेत्रदीपक दत्तजन्म सोहळा डोळ्यात साठविण्याकरीता भाविकांनी मोठी गर्दी केली. दत्तगुरुंच्या जयघोषाने दुमदुमलेला बुधवार पेठेतील श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिराचा



परिसर भक्तीमय झाला होता. मंदिरात १२७ व्या वर्षी साज-या झालेल्या दत्तजन्म सोहळ्यानिमित्त आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली होती. दत्तमहाराजांच्या विलोभनीय मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली. शनिवारी सायंकाळी ५ वाजून ५७ मिनिटांनी श्री दत्तजन्म सोहळा झाला. पाळण्यावर पुष्पवृष्टी करुन दिगंबरा, दिगंबरा... असा जयघोष करण्यात आला. त्यानंतर दत्तगुरुंच्या पादुकांची भव्य पालखी नगरप्रदक्षिणा मंदिरातून वाजत-गाजत निघाली. वैभवशाली सुवर्णरथ, पारंपरिक दिंडी, अश्व बग्गी, नगारा वादन व वाद्यपथकांच्या जल्लोषात भाविक देखील सहभागी झाले होते.

दत्तमंदिरापासून निघालेली पालखी रामेश्वर चौक, टिळक पुतळा मंडई, शनिपार, अप्पा बळवंत चौक, बुधवार पेठ मार्गे मंदिरात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र बलकवडे, कार्यकारी विश्वस्त अॅड. प्रताप परदेशी, खजिनदार अॅड. रजनी उकरंडे, उत्सव प्रमुख सुनिल रुकारी, उत्सव उप प्रमुख अक्षय हलवाई, विश्वस्त महेंद्र पिसाळ, अॅड. शिवराज कदम जहागिरदार, डॉ. पराग काळकर, युवराज गाडवे उपस्थित होते.

शनिवारी सकाळी ६ वाजता ट्रस्टचे माजी विश्वस्त चंद्रशेखर व नूतन हलवाई यांच्या हस्ते लघुरुद्र, त्यानंतर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र व हेमलता बलकवडे यांच्या हस्ते श्री दत्तयाग झाला. सकाळी ८ वाजता प्रात: आरती आमदार हेमंत रासने व मृणालिनी रासने यांच्या हस्ते तसेच दुपारी १२.३० वाजता सह धर्मादाय आयुक्त रजनी क्षीरसागर, जिल्हा न्यायाधिश किरण क्षीरसागर व सुहाना मसालेचे राजकुमार चोरडिया यांच्या हस्ते माध्यान्ह आरती करण्यात आली. दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दत्तमहाराजांचे दर्शन घेतले.

दत्तजन्म सोहळ्यानंतर सायंकाळी ७ वाजता सायं आरती सारथीच्या व्यवस्थापकीय संचालक स्मिता व अशोक काकडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी कांचन व संजीव जाधव, पोलीस उपायुक्त डॉ. संदीपसिंह गिल्ल यांच्या हस्ते झाली. भक्तांसाठी सकाळी ६ पासून मंदिर खुले करण्यात आले असले तरी रात्री उशीरापर्यंत दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. भाविकांनी स्वहस्ते अभिषेकाचा देखील लाभ घेतला.

#रा

## At a Glance

### गुगल-पे वर घेतली खंडणी




**चऱ्होली :** सफाई कंत्राटी कामासाठी वर्षाला एक लाख 80 हजार रुपये खंडणी द्यावी लागेल, अशी मागणी करत दोघांनी एकाकडून जबरदस्तीने पाच हजार रुपयांची खंडणी गुगल-पेवर घेतली. याप्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### जनगणनेच्या हालचाली सुरू



**पिंपरी :** एकूण १८१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात वसलेल्या पिंपरी-चिंचवड शहराची जनगणना तब्बल १३ वर्षांनंतर होणार आहे. त्यासंदर्भात आगामी वर्षाच्या जानेवारीपासून प्रत्यक्ष कामकाज सुरू होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### एमआयडीसी परिसर अतिक्रमणच्या विळख्यात




**पिंपरी :** चिंचवड आणि भोसरी एमआयडीसी परिसरामध्ये पदपथांवर, रस्त्यांवर विविध ठिकाणी अतिक्रमणे झाली असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे. शहरात एमआयडीसी परिसरामध्ये सुमारे 10 हजारावर छोटेमोठे लघुउद्योग आहेत. कारवाईसाठी टाळाटाळ होत आहे.

# पिंपळे निलखमध्ये आठवडे बाजार सुरू

## पिंपळे निलख येथिल नागरिकांनी आठवडे बाजारचा लाभ घ्यावा -सचिन साठे फाऊंडेशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे निलख :** सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने विशाल नगर, पिंपळे निलख येथे सुरू केलेला आठवडे बाजार हा एक स्तुत्य उपक्रम आहे. येथे शेतकरी ते थेट ग्राहक विक्री सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. येथे नागरिकांच्या सुविधेसाठी प्रशस्त पार्किंग देखिल उपलब्ध करून देण्यात आले आहे. खाजगी जागेत आठवडे बाजार भरणारा हा शहरातील पहिलाच प्रयोग आहे. याचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आमदार तथा भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले. आठवडे बाजारचे आयोजक सचिन साठे यांनी सांगितले की, स्व. आमदार विनायक निम्हण यांच्या स्मरणार्थ पिंपळे निलख, विशालनगर, हॉटेल रंगीला पंजाब शेजारील जागेत शेतकरी राजा कष्टकरी संघटनेचे नवनाथ गरुड आणि त्यांचे सहकारी यांनी या ठिकाणी जुन्नर, लोणी काळभोर, शिरूर येथील शेतकऱ्यांचे सेंद्रिय शेती उत्पादनाचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. येथे स्वच्छ, ताजा भाजीपाला व फळे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. दर शुक्रवारी या ठिकाणी दुपारी तीन ते रात्री नऊ वाजेपर्यंत विक्री सुविधा आहे. या परिसरात वाढलेल्या सोसायटीतील नागरिकांना कमीत कमी अंतरावर खरेदीचा लाभ घेता येईल. प्रशस्त पार्किंग उपलब्ध करून दिल्यामुळे वाहतुकीला देखील अडथळा होणार नाही.

» सोई-सुविधा

यावेळी पोलीस पाटील भुलेश्वर नांदगुडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष वृषालीताई मरळ, शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष चेतन भुजबळ, काळूराम महाराज इंगवले, काळूशेठ नांदगुडे, विजय जगताप, बाळासाहेब जगताप, नितीन इंगवले, अनंत कुंभार, अशोक बालवडकर, अनिल संचेती, शिवाजी दळवी आदींसह शेकडो ग्राहक उपस्थित होते.



“ स्व. आमदार विनायक निम्हण यांच्या स्मरणार्थ पिंपळे निलख, विशालनगर, हॉटेल रंगीला पंजाब शेजारील जागेत शेतकरी राजा कष्टकरी संघटनेचे नवनाथ गरुड आणि त्यांचे सहकारी यांनी या ठिकाणी जुन्नर, लोणी काळभोर, शिरूर येथील शेतकऱ्यांचे सेंद्रिय शेती उत्पादनाचे स्टॉल्स लावण्यात आले आहेत. येथे स्वच्छ, ताजा भाजीपाला व फळे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. दर शुक्रवारी या ठिकाणी दुपारी तीन ते रात्री नऊ वाजेपर्यंत विक्री सुविधा आहे.

— **सचिन साठे** आठवडे बाजारचे आयोजक

# गझल मैफलीने श्रोते मंत्रमुग्ध




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** कशिश प्रस्तुत “गझल संध्या - चुपके चुपके” या हिंदी - मराठी गझलांच्या सुरेल मैफलीने निगडी प्राधिकरणातील पेठ क्रमांक २७अ, संत तुकाराम उद्यानाच्या मागे असलेल्या आय. आय. सी. एम. आर. ऑडिटोरियममधील गझलप्रेमी रसिकांना मंत्रमुग्ध केले. पं. किरण परळीकर, शर्मिला शिंदे आणि प्रतीक म्हाळस्कर यांच्या स्वरातील काही लोकप्रिय तर काही नव्या ताज्या गझलांचा उपस्थित रसिकांनी रसास्वाद घेतला.

मूळ फारसी काव्यप्रकार असलेली गझल ही लिखित विधा गायनाच्या माध्यमातून जेव्हा रसिकांच्या काळजापर्यंत पोहोचून उत्स्फूर्त दाद मिळवते तेव्हाच ती पूर्णत्वाला जाते, असे म्हटले जाते. याचा पुरेपूर प्रत्यय या मैफलीत आला.

» मंत्रमुग्ध

मैफलीची सुरुवात उर्दू आणि मराठी शायरीचे दीपस्तंभ असलेल्या गालिब आणि सुरेश भट यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर नव्या दमाचे तरुण संगीतकार - गायक प्रतीक म्हाळस्कर यांनी “आहिस्ता-आहिस्ता” ही लोकप्रिय गझल आपल्या मखमली आवाजात सादर करून रसिकांची मने जिंकली. नंतर तरुण गझलकार अभिजित काळे यांनी लिहिलेल्या आणि स्वतः प्रतीक म्हाळस्कर यांनी स्वरबद्ध केलेल्या “तुला पाहून सुचल्या दोन ओळी” ही गझल सादर केली. या गझललाही रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाची शेवटची गजल - “वफा के शम्मे बुझाओ”-साद करण्याआधी पंडितजींनी प्रेक्षागृहातील सर्व दिवे बंद करण्यास सांगितले आणि केवळ एका मेणबत्तीच्या प्रकाशात ही गझल सादर झाली व मैफलीची सांगता झाली.

### अशी रंगली मैफील

● मैफलीतील प्रचलित आणि अप्रचलित उर्दू, हिंदी, मराठी गझलांची निवड ही मुळातच वैविध्यपूर्ण भावनांचा परिपोष करणारी होती. ताना, मुरक्या, पलटे अथवा गायकीतील चमत्कृतींच्या आहारी न जाता स्वच्छ अन् स्पष्ट शब्दोच्चार आणि तरीही सुरेलता सांभाळून तीनही गायकांनी सर्व गझलरचना परिणामकारकरीत्या सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. नीलेश शिंदे यांची तबला आणि प्रतीक म्हाळस्कर यांची संवादिनी साथ दुधात मिसळून गेलेल्या साखरेइतकीच मधुर होती. त्यांच्या जोडीला डॉ. सतीश गोरे यांनी गिटारवर तसेच राजेश डेव्हिड यांनी कीबोर्डवर उत्तम साथ केली. स्वतः पंडित किरण परळीकर यांनी निवेदनाची धुरा उत्तमरीत्या सांभाळली.

# पिंपरी-चिंचवड पोलिसांसाठी वाकडमध्ये स्वतंत्र रुग्णालय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाकड :** - स्वतंत्र पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय २०१८ मध्ये कार्यान्वित झाल्यापासून पोलिसांसाठी स्वतंत्र रुग्णालयाची मागणी होती. अखेर वाकडमध्ये पोलिसांसाठी रुग्णालय सुरू करण्यात आले आहे.वाकड येथील कावेरीनगर येथील पोलिस वसाहतीत हे रुग्णालय सुरू केले आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे, विवेक पाटील, स्वप्ना गोरे, विशाल गायकवाड, डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर, पुण्याचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, औंध रुग्णालयाचे प्रमुख डॉ. नागनाथ एमपल्ले उपस्थित होते. वैद्यकीय अधिकारी अनुपमा कांबळे, डॉ. संजय भारती यांच्यासह आठजणांची रुग्णालयासाठी नियुक्ती केली आहे.

विनयकुमार चौबे म्हणाले की, कामाचा ताण आणि शारीरिक, मानसिक थकवा आल्याने पोलिसांना स्वतःकडे लक्ष देणे शक्य होत नाही. यातून आरोग्याचे प्रश्न उद्भवतात. त्यासाठी आयुक्तालय स्तरावर पोलिस रुग्णालय कार्यान्वित केले आहे. यामाध्यमातून पोलिसांसाठी अनेक सुविधा आहेत.

### पोलिसांची गैरसोय टळणार..

● पिंपरी- चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत ४,९२७ महिला आणि पुरुष अधिकारी आणि कर्मचारी कार्यान्वित आहेत. त्यांना पुण्यातील शिवाजीनगर येथील पोलिस रुग्णालयात जावे लागते. यात त्यांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. अनेकांना तिथेपर्यंत जाणे सहज शक्य होत नाही. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्येच रुग्णालय प्रस्तावित करण्यात आले.

# पुनावळे येथे इसको इंडियाच्या माध्यमातून खेळाडूंना स्वसंरक्षणाचे धडे –नवनाथ ढवळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुनावळे :** इसको इंडियाच्या माध्यमातून खेळाडूंना संरक्षणाचे धडे देण्यात येणार असल्याचे नवनाथ ढवळे यांनी सांगितले ते सोनवणे येथील फिटनेस क्लबच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. पिंपरी चिंचवड शहरातील पुनावळे येथे पांढरे वस्ती इचीबाण शितोरियो कराटे दो ऑर्गनायझेशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पुनावळे फिटनेस क्लब चे उद्घाटन अधिरा इंटरनॅशनल स्कूल,पिंपरी चिंचवड उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी श्री.नवनाथ ढवळे यांच्या



हस्ते संपन्न झाले .याप्रसंगी मा.सरपंच हिंजवडी श्री.सागर भाऊ साखरे,आकाश पांढरे, इसको इंडिया प्रमुख प्रशिक्षक-इंडिया शिहान अशोक वेताळ,पिं. चिं प्रमुख प्र.इसको इंडिया मुकुंद मराठे, वाकड प्रमुख प्रशिक्षक इसको इंडिया तेज प्रताप पासवान,वैष्णव सावंत, पृथ्वीराज पवार, इत्यादी प्रशिक्षक तसेच पालक वर्ग सोमानी रेसिडेन्सी चेअरमन किरण सावंत, सोमनाथ इंगळे सर व खेळाडू,या प्रसंगी सर्व उपस्थित होते, या कार्यक्रमाचे संयोजक राष्ट्रीय खेळाडू रोहित विनोद कुमावत व हेमंत मुलचंद कुमावत यांनी केले.

# “सरदार पटेल कोहिनूर हिऱ्यासारखे होते!” – पंकज पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगवी :** “सरदार वल्लभभाई पटेल हे अत्यंत थोर मुत्सद्दी प्रशासक होते. त्यांनी भारत नावाच्या स्वप्नाला जीवनाचा उद्देश बनविले होते. पोलादी, धाडसी, करारी, कठोर, बुद्धिमानी, दृढनिश्चयी, वाक्चतुर, विनोदी अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी, असा त्यांचा स्वभावविशेष होता. ते स्वातंत्र्यलढ्यातील कोहिनूर हिऱ्यासारखे होते!” असे प्रतिपादन सरदार पटेल यांच्या जीवनचरित्र्याचे संशोधक पंकज पाटील यांनी सुदर्शननगर, पिंपळे गुरव येथे रविवार, दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी केले. लेवा पाटीदार मित्रमंडळ, सांगवी यांच्यावतीने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना पंकज पाटील बोलत होते. यावेळी माजी नगरसेविका शारदा सोनवणे, खानदेश मंडळाचे अध्यक्ष उमेश बोरसे, लेवा पाटीदार मित्रमंडळाचे अध्यक्ष भागवत झोपे, संजय भंगाळे, राजेंद्र इंगळे, शकुंतला पेटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शारदा सोनवणे आणि उमेश बोरसे यांनीदेखील अभिवादनपर मनोगते व्यक्त केलीत.

अध्यक्षीय मनोगतात पंकज पाटील पुढे म्हणाले की, “सरदारश्री लढवय्ये सेनापती, सैनिक आणि देशाचे पाईक होते. या महान देशाचे सुपुत्र आणि प्राण होते. त्यांच्या लढ्याला अंत नव्हता. बारडोलीच्या शेतसाऱ्याच्या लढ्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला जागे करून त्यांची अस्मिता जागृत केली. साराबंदी एक निमित्त होते. जोपर्यंत आपली मातृभूमी स्वतंत्र होणार नाही, तोपर्यंत अव्याहत लढून युद्ध करणे त्यांचे ध्येय होते. त्यांच्या लढ्यावर समस्त देशाची भिस्त अवलंबून होती. स्वातंत्र्यापूर्वी राष्ट्रीय चळवळीत त्यांनी खूप मोठी बाजू सांभाळली. स्वातंत्र्यानंतरही भारताला सुसंघटित करून भारतीय राज्यव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून दिले. त्यांनी ब्रिटिशांच्या तावडीतून नागरिकांची सुटका केली. नागरिकांना स्वावलंबी बनवले आणि खेड्यांना संघटित केले!”




मंडळाचे अध्यक्ष भागवत झोपे यांनी प्रास्ताविक केले. उद्योजिका ऊर्मिला पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# जलतरण तलाव चालविण्याचा निर्णय पालिकेने रद्द करावा –मारुती भापकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून व्यापारी उद्देशाने १० जलतरण तलाव खासगी संस्थांना चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काही ठराविक ठेकेदार यांना पोसण्यासाठी हा उद्योग करण्यात आला असून त्याचा भुर्दंड सर्वसामान्य करदात्या नागरिकांच्या माथी पडणार आहे. मनमानी व हुकूमशाही पद्धतीने घेतलेला हा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केली आहे. अन्यथा पिंपरी चिंचवडकरांच्या रोषाला सामोरे जावे लागेल असा इशाराही त्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिला आहे. मारुती भापकर यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, खेळाडू, जलतरणपटू, विरोधक या साऱ्यांचा विरोध डावलून उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्याचा दावा करत आपण शहरातील जलतरण तलावांचे खासगीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील दहा जलतरण तलाव तीन वर्षांच्या कालावधीसाठी खासगी संस्थांना चालवण्याचा निर्णय घेतला आहे. तिकीट विक्री, स्वच्छता, सुरक्षा, पाणी शुद्धीकरण असे कामकाज संस्था पाहणार आहेत. या निर्णयामुळे कोट्यवधी रुपये खर्चाची बचत होईल, असा दावा आपण व आपल्या प्रशासनाने केला आहे. महापालिकेच्या वतीने जलतरणपटूंना सरावाची सुविधा उपलब्ध व्हावी, नागरिकांना, विद्यार्थ्यांना पोहण्याचा आनंद घेता यावा यासाठी केशवनगर, संभाजीनगर, कासारवाडी, पिंपरीगाव, यमुनानगर, पिंपळे गुरव, नेहरूनगर, वडमुखवाडी, भोसरी, मोहननगर, थेरगाव, सांगवी, आकुर्डी या भागांत १३ जलतरण तलावांची कोट्यवधी रुपये खर्च करून उभारणी करण्यात आली आहे. यापैकी मोहननगर येथील तलावाचे काम सुरू आहे. तर, केशवनगर आणि आकुर्डीतील तलावाच्या निविदेला प्रतिसाद मिळाला नसल्याने फेरनिविदा प्रसिद्ध केली जाणार आहे.

# देहूरोडपर्यंत मेट्रो रेल्वेचा विस्तार करण्याची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** देहूरोड ते निगडी मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) देहूरोड शहर युवकाध्यक्ष आशिष बन्सल यांनी मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तीर्थक्षेत्र देहूगाव येथे वर्षातून तीनदा यात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक येत असतात. तर प्रतिदिनी हजारो भाविक व पर्यटक देहूत येत असतात. यासह धम्मभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमी असा त्रिवेणी संगम असणाऱ्या देहूरोड शहरातील वर्षभर बौद्ध बांधव व पर्यटक येथे येतात. देहूरोड व निगडी या दोन्ही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. मेट्रो रेल्वेमुळे या दोन्ही भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या वेळेची, पैशाची बचत होईल. मेट्रो रेल्वेमुळे खासगी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होईल.

# संविधानाच्या अंमलबजावणीतूनच मुस्लिमांचा विकास शक्य–अब्दुर रहमान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** अल्पसंख्यांकांच्या सर्वाजनिक विकासासाठी भारतीय संविधानाची अंमलबजावणी करावी, त्यातूनच अल्पसंख्याकचा सर्वांगीण विकास होऊ शकेल असे प्रतिपाद पुर्व आयपीएस अधिकारी व लेखक अब्दुर रहमान यांनी पिंपरी येथे आयोजित संविधान सुरक्षा संमेलनात व्यक्त केले.

नॅशनल कॉन्सफरन्स फॉर मायनॉरिटी व पिंपरी चिंचवड मुस्लिम जमात यांच्या संयुक्त विद्यमाने राहुल डंबाळे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सुरक्षा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून अब्दुर रहिमान, प्रमुख पाहुणे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड यांनी यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला.

» संमेलन

मुस्लिम समाजाने संविधानाची प्रत विकत घेवून त्याचे वाचन करून त्यातील तरतूदींचा अभ्यास करावा. तसेच शिक्षण, व्यक्तीची प्रतिष्ठा व सामाजिक सुरक्षा यासाठी कायदेशीर संघर्ष करावा व प्रसंगी न्यायालयाचा



दरवाजा ठोठाऊन न्याय मिळावावा अशी भुमिका अब्दुर रहिमान यांनी मांडली.

यावेळी बोलताना ॲड. जयदेव गायकवाड यांनी सांगितले की, भारतीय संविधान लिहित असताना अल्प संख्यांकासाठी तरतूद करता यावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मोठा संघर्ष करावा लागला होता. सध्या अल्पसंख्यांक समूह विशषत: मुस्लिम आपल्या आंदोलनाला संविधानिक कवच देत आहेत.

भारतीय संविधान अर्पण केल्यापासूनच कठोरतावादी लोकांनी संविधान मोडकळीस आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. सध्याचे केंद्रीय सरकार धार्मिक भेदभाव करणारे असून ते हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते आहे. त्यांच्यामुळे देशाला धोका निर्माण झाला असून देशातील अल्प संख्यांक समाज असुरक्षित झालेला आहे. संविधानवादी कार्यकर्ते म्हणून भारताला हिंदू राष्ट्र होऊ देणार नाही अशी भुमिका राहुल डंबाळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडली.

संमेलन आयोजनात पिंपरी चिंचवड मुस्लिम जमातीचे हाजी युसूफ कुरेशी, हाजी गुलाम रसुल, शहाबुद्दीन शेख व याकुब शेख यांनी सहभाग घेतला होता.

**CHANGE OF NAME**

माझे जुने नाव नंदिनी दत्तात्रय वाबळे असे होते. नवीन नाव नंदा दत्तात्रय वाबळे असे बदलून झाले आहे.
As per the Affidavit No. 2477/2024
Date : 16/12/2024

**महाराष्ट्र शासन**
**वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय खेड प्रा. ता. खेड, जि पुणे-४१०५०५**

**निविदा सूचना क्र. ३/सन २०२४-२०२५**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वन परिक्षेत्र कार्यालय खेड (प्रा.) ता खेड, जि पुणे ४१०५०५ हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा वन परिक्षेत्र कार्यालय खेड (प्रा.) येथे मिळतील. सदरच्या निविदा दिनांक १६.१२.२०२४ ते २२.१२.२०२४ या कालावधी मध्ये भरून हार्ड कॉपी स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वन परिक्षेत्र कार्यालय खेड (प्रा.) यांचे कार्यालय मध्ये दि. २२.१२.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वा पर्यंत स्विकारण्यात येतील व २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा उघडनेत येतील.

| अ.क्र | गावाचे नाव | कामाचे नाव | रक्कम रु (लक्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | Kharpudi | Providing & constructing Store Room at Shiroli in FC no-218 in the Premises of Range forest Office Khed range of Junnar Forest Division | 9,88,900/- | सर्व साधारण खुला वर्ग |
| २) | Shiroli | Providing & constructing Store Room at Shiroli in FC no-218 in the Premises of Range forest Office Khed range of Junnar Forest Division | 9,71,300/- | |
| ३) | Kharpudi | Providing & constructing Tin Godown shed at Kharpudi in FC no-281 in Khed range of Junnar Forest Division | 9,76,800/- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| ४) | Kharpudi | Providing & erecting eco friendly pagoda at kharpudi in Khed range of Junnar Forest Division | 9,92,200/- | |

शिक्का

**वनपरिक्षेत्र अधिकारी, खेड (प्रा.)**

**महाराष्ट्र शासन**
**वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरूर प्रा. रामलिंग रोड, पाबळ फाटा शिरूर ता शिरूर, जि पुणे**
**निविदा सूचना क्र. ३/सन २०२४-२०२५**

खालील कामांच्या सीलबंद निविदा वन परिक्षेत्र कार्यालय शिरूर (प्रा.) रामलिंग रोड, पाबळ फाटा शिरूर ता शिरूर, जि पुणे ४१२२१० हे महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्या कडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा वन परिक्षेत्र कार्यालय शिरूर (प्रा.) येथे मिळतील. सदरच्या निविदा दिनांक १६.१२.२०२४ ते २२.१२.२०२४ या कालावधी मध्ये भरून हार्ड कॉपी स्वरुपात भरावयाच्या आहेत. सदरच्या भरलेल्या निविदा वन परिक्षेत्र कार्यालय शिरूर (प्रा.) यांचे कार्यालय मध्ये दि. २२.१२.२०२४ रोजी दुपारी ०४.०० वा पर्यंत स्विकारण्यात येतील व २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा उघडणेत येतील.

| क्र | गावाचे नाव | कामाचे नाव | रक्कम रु (लक्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | Koregav Bhima | Construction of labour shed for leopard camp in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 9,99,600/- | सर्व साधारण खुला वर्ग |
| 2 | Pimparkhed | Construction of Parking shed for proposed leopard camp at Pimparkhed | 9,84,000/- | |
| 3 | Koregav Bhima | Construction of Parking shed in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 9,94,000/- | |
| 4 | Koregav Bhima | Construction of store room in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 9,39,300/- | |
| 5 | Koregav Bhima | Providing & erecting parking shed for leopard camp in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 7,35,800/- | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 6 | Koregav Bhima | Construction of WBM road towards residential quarter for leopard camp at Koregav bhima | 9,96,900/- | |
| 7 | Koregav Bhima | Providing & fixing paver block in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 9,95,800/- | |
| 8 | Koregav Bhima | Special repair old type 1 forest guard quarter no-1 at Koregav bhima | 4,99,500/- | |
| 9 | Koregav Bhima | Providing repair of existing under ground water storage tank in the premises of proposed leopard camp at Koregav bhima | 1,00,600/- | मजूर सह संस्था |
| 10 | Koregav Bhima | Koregav bhima Special repair old type 1 forest guard quarter no-1 at Koregav Bhima | 4,97,100/- | |
| 11 | Koregav Bhima | Special repair old type 2 forest guard quarter no-1 at Koregav bhima | 4,99,500/- | |

शिक्का

सही/-
**विकास भोसले**
वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरूर (प्रा.)

# बुद्धीबळातील जगज्जेता

काळ्या मोहऱ्यांनिशी खेळणाऱ्या गुकेशने सिंगापूर येथे सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत गुरूवारी चीनच्या डिंग लिरेनची अभेद्य भिंत १४ व्या आणि अखेरच्या डावात भेदली. माजी विश्वविजेत्या ३२ वर्षीय लिरेनला १८ वर्षीय गुकेशने चितपट करून भारतीय तिरंगा डौलाने फडकावत बुद्धिबळ इतिहासातील सर्वांत युवा जगज्ज्ञेता बनण्याचा मान मिळवला. भारतीय बुद्धिबळ क्षेत्रासाठी गुरूवारचा दिवस गुकेशने संस्मरणीय ठरवला. विश्वनाथन आनंदनंतर गुकेश भारताचा दुसरा जगज्ज्ञेता ठरला. गुकेशने रशियाच्या गॅरी कास्पारोव्हचा (२२ व्या वर्षी) गत १४ वर्षापासूनचा युवा जगज्ज्ञेतेपदाचा विक्रम मोडीत काढत नव्या अध्यायाची नोंद केली. सुमारे ४ तास रंगलेल्या १४ व्या आणि अखेरच्या फेरीत डिंग लिरेनला ५८ चालींमध्ये पराभूत होण्यास भाग पाडणारा गुकेश हा जगातील एकूण १८ वा जगज्ज्ञेता ठरला. वयाच्या १८ व्या वर्षी १८ वा जगज्ज्ञेता! लिरेनने १३८ वर्षाच्या बुद्धिबळ जगज्ज्ञेतेपदाच्या इतिहासात केलेली सर्वांत मोठी घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली. १४ वा डाव बरोबरीत सुटला असता तर शुक्रवारपासून टायब्रेकरद्वारे सामन्याचा निकाल लागला असता मात्र गुकेशने ७.५–६.५ अशा फरकाने विजय मिळवत जगज्ज्ञेतेपदाला गवसणी घातली. पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळताना लिरेनने डावाची आश्वासक सुरुवात केली होती. गुकेशने डावाच्या मध्यात आपली पटावरील स्थिती मजबूत केली होती त्यामुळे ही लढत बरोबरीत सुटेल, असे वाटत असतानाच लिरेनने १९ व्या चालीत मोठी चूक केली आणि त्याचा फायदा उठवत गुकेशने लिरेनला चेकमेट केले. जगज्ज्ञेतेपदाची ही लढत गुकेश १२ व्या फेरीआधीच सहज जिंकेल, असे भाकित अनेक बुद्धिबळ पंडितांनी वर्तवले होते. कदाचित त्यांना गत वर्षभरापासून मोजक्याच स्पर्धांमध्ये खेळणाऱ्या लिरेनच्या ताकदीचा अंदाज आला नसावा. स्पर्धेला प्रारंभ झाल्यानंतर पहिल्याच फेरीत लिरेनने पांढऱ्या मोहऱ्यांसह गुकेशला पराभूत केले होते; परंतु गुकेशने 'हार नही मानुंगा' असे म्हणत तिसऱ्या फेरीत लिरेनला जशास तसे प्रत्युत्तर देत पराभवाचा बदला घेतला होता. त्यानंतर सलग ७ डाव बरोबरीत सोडवल्यानंतर गुकेशने ११ व्या डावात विजय मिळवत आघाडी घेतली होती; परंतु लिरेनने जोरदार मुसंडी मारत १२ वा डाव जिंकला आणि सामना बरोबरीत आणला. ६.५–६.५ अशा गुण बरोबरीत अखेरचा डाव सुरू झाला. या डावात पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळणाऱ्या लिरेनची घोडचूक गुकेशच्या पथ्यावर पडली आणि प्रतिस्पर्ध्याला 'चेकमेट' देत गुकेशने पहिल्याच प्रयत्नात जगज्ज्ञेतेपदावर आपले नाव कोरले. सामन्यानंतर गुकेश म्हणाला, गत दशकभरापासून मी या क्षणाचे स्वप्न बघत होतो. १४ वा डाव ज्या प्रकारे सुरू झाला तो पाहता मला जिंकण्याची खात्री नव्हती; पण मला प्रतिस्पर्ध्यावर दडपण टाकण्याची संधी मिळाली आणि मी ती साधली. या स्पर्धेत गुकेश पहिल्या डावात पराभूत झाला होता; परंतु अखेरच्या डावात त्याने काळ्या मोहऱ्यांनिशी लिरेनवर बाजू उलटवली. २०१० मध्ये विश्वनाथन आनंदने बल्गेरियाच्या टोपालोवविरुद्ध पहिल्याच डावात हार पत्करली होती; पण १२ डावांच्या त्या लढतीत अखेरच्या डावात काळ्या मोहऱ्यांनिशी खेळून टोपालोववर बाजी उलटवत आनंदने जगज्ज्ञेतेपद पटकावले होते. २०२४ मध्ये त्या इतिहासाची पुनरावृत्ती घडली २००६ मध्ये जन्मलेल्या गुकेशने वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळ खेळण्यास प्रारंभ केला. त्याचे वडील रजनीकांत हे तज्ज्ञ डॉक्टर आहेत तर आई पद्मा यांनी जीवशास्त्रात डॉक्टरेट मिळवली आहे. गुकेशने २०१५ मध्ये ९ वर्षाखालील गटात आशियाई शालेय स्पर्धा जिंकली. २०१८ मध्ये १२ वर्षाखालील गटात जागतिक युवा स्पर्धेचे जेतेपद मिळवले तर याच सालात आशियाई युवा स्पर्धेत तब्बल ५ सुवर्ण पदके जिंकण्याची किमया साधली. २०१७ पासून गुकेश वरिष्ठ गटात (खुल्या) खेळण्यास पात्र ठरला. ऑक्टोबर २०२२ मध्ये गुकेशने जलद बुद्धिबळ स्पर्धेत मॅग्नस कार्लसनला पराभवाचा धक्का दिला होता. मॅग्नस त्या वेळचा जगज्ज्ञेता होता. या विजयामुळे गुकेशकडे जगाच्या नजरा वळला होत्या. २०२४ मध्ये गुकेशने कॅंडिडेटस् स्पर्धेत बाजी मारली. त्यानंतर भारतीय पुरुष संघाला ऑलिम्पियाड सुवर्ण मिळवून देण्यात मोलाची कामगिरी केली आणि आता जागतिक जेतेपद मिळवून आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. जागतिक लढतीत एकूण १४ पारंपरिक (क्लासिकल) डाव होतात. सर्वप्रथम ७.५ गुणांचा टप्पा गाठणारा खेळाडू विजेता ठरतो. पहिल्या ४० चालींसाठी १२० मिनिटे, पुढील २० चालींसाठी ६० मिनिटे आणि उर्वरित चालींसाठी १५ मिनिटांचा वेळ दिला जातो. काळ्या मोहऱ्यांनी ४० चाली होत नाहीत तोवर सामना बरोबरीत सोडवता येत नाही. १४ डावानंतरही गुण बरोबरी राहिल्यास विजेता ठरवण्यासाठी टायब्रेकरचा आधार घेतला जातो. गुकेशला विश्वनाथन आनंदचे मार्गदर्शन लाभले आहे. अखंड मेहनतीचे फळ त्याला मिळाले आहे. एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रीत करण्याचे कौशल्य त्याच्याकडे आहे. इतक्या कमी वयात त्याने जी प्रगल्भता दाखवली ती वाखाणण्याजोगी आहे. तो बेधडक, आत्मविश्वासपूर्ण खेळ करतो. मोक्याच्या क्षणी संतुलन ढळू न देण्याचा गुण त्याच्याकडे आहे. गुकेशचे कौशल्य आणि मानसिक स्थैर्य अफलातून असेच होते. त्याने शेवटपर्यंत जिंकण्याची जिद्द सोडली नाही. या उलट लिरेनने बचावात्मक खेळावर अधिक भर दिला शिवाय तो टायब्रेकरवर अति विसंबून राहिला. ढासळलेल्या मनोवृत्तीतून त्याला सावरता आले नाही. त्याने गुकेशच्या विजयाचे कौतुक केले आहे. या जेतेपदाबद्दल गुकेशला १३ लाख अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस मिळाले आहे. भारताकडे गुकेशसह आर. प्रज्ञानंद, विदीत गुजराथी, दिव्या देशमुख, तानिया सचदेव, असे असंख्य गुणवान बुद्धिबळपटू आहेत. यंदाचे वर्ष भारतीय बुद्धिबळाचा कायापालट करणारे वर्ष ठरले आहे. वर्षाच्या प्रारंभीच नागपूरच्या दिव्या देशमुखने कनिष्ठ गटाचे जागतिक जेतेपद मिळवले असून ३ बुद्धिबळपटू कॅंडिडेटस् स्पर्धेसाठी पात्र ठरले. ६४ घरांचा राजा गुकेशला मानाचा सलाम!

कमालीची राजकीय अस्थिरता असलेल्या नेपाळमध्ये सत्तांतर आणि पंतप्रधान बदलण्याची प्रक्रिया जणू नित्याची झाली आहे. सध्या केपी शर्मा ओली हे नेपाळचे पंतप्रधान असून ते चीनधार्जिणे म्हणून ओळखले जातात. अलीकडेच ओली यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारताला बगल देत चीनला भेट दिली. हा दौरा भारताच्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणाला आव्हान देणारा आहे. परंतु नेपाळसाठी चीनशी वाढती मैत्री फायदेशीर ठरणारी आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे आणि याचे उत्तर नकारार्थी आहे. कारण नेपाळ आणि चीनमध्ये गेल्या दहा वर्षांत जे मोठे करार झाले आहेत त्यातील बहुतांश करार आज बासनात गुंडाळलेले आहेत.

# ओलींच्या चीन दौऱ्याने काय साधणार?

रशियामध्ये पार पडलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीच्या निमित्ताने भारत आणि चीन यांच्यामध्ये पूर्वलदाखच्या सीमेवर २०२० च्या गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर वाढलेला तणाव कमी करण्यासाठीच्या महत्त्वपूर्ण करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारानंतर सैन्यमाघारीची प्रक्रियाही सुरू झाल्याचे वृत्त समोर आले आहे. परंतु या करारामुळे भारत–चीन यांच्यातील संबंध मधुर बनले आहेत किंवा चीनकडून होणाऱ्या भारतविरोधी कारवाया भविष्यात होणार नाहीत, असे मानण्याचे बिलकूल कारण नाही. याचे कारण अशा प्रकारचे कितीही करार झाले तरी चीन हा भारताचा शत्रू आहे, हे कटू वास्तव आहे. भारतासोबत सीमावाद सोडवण्याबाबत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी झिनपिंग यांना झालेली उपरती ही एकाएकी झालेली नसून त्यामागे अर्थकारणाचा मोठा पैलू आहे. तसेच चीन हा नेहमी दुटप्पीपणाने चाली खेळणारा देश आहे. त्यामुळे एकीकडे सीमावादाबाबत माघार घेऊन भारताची सहानुभूती मिळवताना दुसरीकडे आशिया खंडातील विशेषतः दक्षिण आशियातील देशांमध्ये भारतद्वेषाची पेरणीची आपली रणनीती चीनने आजही कायम ठेवली आहे. मालदीवसारख्या देशाने चीनच्या कच्छपि लागून भारताशी पंगा घेतला होता; परंतु भारताने नाक दाबल्यानंतर अलीकडेच या देशाचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जू यांना उपरती झाली आणि त्यांची भारताविषयीची भूमिका बदलली.

मालदीवप्रमाणेच गेल्या काही वर्षांमध्ये भारताचा सख्खा शेजारी म्हणून ओळखला जाणारा नेपाळही चीनच्या प्रभावाखाली गेला आहे. कमालीची राजकीय अस्थिरता असलेल्या नेपाळमध्ये सत्तांतर आणि पंतप्रधान बदलण्याची प्रक्रिया जणू नित्याची झाली आहे. सध्या केपी शर्मा ओली हे नेपाळचे पंतप्रधान असून ते चीनधार्जिणे म्हणून ओळखले जातात. त्यानुसार अलीकडेच ओली यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आपल्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारताला बगल देत चीनची निवड केली. त्यांचा हा चीनदौरा नेपाळला चीनच्या अधिक जवळ नेण्याचे निदर्शक आहे. वास्तविक, परंपरेनुसार नेपाळचे नवनियुक्त पंतप्रधान त्यांच्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी भारतात येतात. पण ओलींनी ही परंपरा धुडकावून लावत चीनला भेट दिली आहे. अर्थात ओली हे नेहमीच चीनशी संबंध अधिक दृढ करण्याचा सल्ला देत आले आहेत. २०१५ मधील सीमा नाकेबंदी असो, २०१९ मधील सीमावादाचे राजकारण करणे असो किंवा भारताच्या भूभागांना आपल्या हद्दीत दाखवणारा नेपाळचा वादग्रस्त नकाशा प्रकाशित करणे असो, या सर्वांतून नेपाळने भारताशी वैरत्व आणि चीनशी मैत्रत्व उघडपणाने दाखवून दिले आहे.

ओली यांचा चीनकडे असलेला राजकीय कल हा भारतासाठी चिंतेचा विषय आहे. नेपाळ भारतापासून दूर जात असतानाच त्यांनी केलेला हा दौरा भारताच्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणाला आव्हान देणारा आहे. अर्थात एक बाब लक्षात घ्यायला हवी की, ओली आणि त्यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (ईएमएल) ने जेव्हा जेव्हा चीनशी करार केले आहेत किंवा राजकीय संबंधांची वकिली केली आहे, तेव्हा ती केवळ प्रतीकात्मक पातळीवरच राहिली आहे आणि त्याचे फारसे परिणाम झाल्याचे दिसून आलेले नाही. नेपाळमध्ये राजकीय अस्थिरता ही एक सामान्य गोष्ट असल्याने आणि दर सहा–आठ महिन्यांनी नवीन सरकार येत असल्याने प्रत्येक पंतप्रधानाचा भारत दौरा हा नेपाळी परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने इतर शेजारी देशांकडे दुर्लक्ष करण्याचा संकेत ठरला असता. यामुळे त्यांच्या हितसंबंधांवर नकारात्मक परिणाम होण्याचाही धोका होता. येथे हे देखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की ओली यांचा पक्ष स्वबळावर नेपाळमध्ये सत्तेत नाहीये. नेपाळ कॉंग्रेस पक्षासोबत ओली आघाडीचे सरकार चालवत आहेत आणि नेपाळ कॉंग्रेस ही नेहमीच भारतासोबत मजबूत संबंधांचा पुरस्कार करत आली आहे. सध्याच्या सरकारमधील परराष्ट्रमंत्री नेपाळ कॉंग्रेसचेच आहेत. त्यामुळे ओली हे भारताला डावलून जोखीम पत्करणार नाहीत, अशी शक्यता होती. परंतु तसे घडले नाही. दोन शेजारी राष्ट्रांमध्ये समतोल परराष्ट्र धोरण राखण्याचा नेपाळचा प्रयत्न आहे, असे या दौऱ्यानंतर सारवासारव करताना सांगितले जात असले तरी ओली यांचा चीनकडे असलेला कल लपून राहिलेला नाही.

**ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)**

मुळात नेपाळसाठी चीनशी वाढती मैत्री फायदेशीर ठरणारी आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे आणि याचे उत्तर नकारार्थी आहे. कारण नेपाळ आणि चीनमध्ये गेल्या दहा वर्षांत जे मोठे करार झाले आहेत त्यातील बहुतांश करार आज बासनात गुंडाळलेले आहेत. मे २०१७ मध्ये, चीनने नेपाळसोबत बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हवर एक करार केला, ज्याला चीनसाठी एक मोठे राजनैतिक यश मानले जात होते. कारण भारत बीआरआय अंतर्गत बांधलेल्या चीन–पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरवर सातत्याने टीका करत आहे. आता अशाच स्वरुपाच्या करारांतर्गत, चीन नेपाळमधील विविध मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणार आहे. विशेषत: ट्रान्स–हिमालयन मल्टीडायमेंशनल कनेक्टिव्हिटी नेटवर्क, जे नेपाळला तिबेट प्रांताशी रेल्वे आणि रस्त्याने जोडणार आहे, त्याबाबतचा आराखडा या करारामध्ये आहे. यावरुन नेपाळ चीनच्या माध्यमातून भारतावरील आपले अवलंबित्व कमी करण्याचा मार्ग शोधत असल्याचे दिसत होते. परंतु जवळपास सात वर्षे उलटूनही नेपाळमध्ये असा एकही प्रकल्प लागू झालेला नाही. याची दोन कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, नेपाळमधील राजकीय अस्थिरतेमुळे या प्रकल्पांची पुढील प्रक्रिया सतत अडखळत राहिली. दुसरे म्हणजे, नेपाळ बीआरआयअंतर्गत प्रकल्पांसाठी आर्थिक साहाय्याच्या स्वरूपात चीनकडून सतत मदत मागत आहे; पण चीनला कर्ज देण्यात रस आहे.

इथेच खरी मेख आहे. वरकरणी चीन हा आर्थिक साहाय्य करत असल्याचे या छोट्या देशांना दाखवत असला तरी एक तर त्याबदल्यात त्या देशातील प्रकल्पांची कंत्राटे मिळवतो आणि कालांतराने त्यावर कब्जा मिळवतो; किंवा दुसरा प्रकार म्हणजे प्रचंड प्रमाणात कर्जाऊ रक्कम देण्यास तयारी दर्शवून या देशांना आधी कर्जबाजारी करतो आणि नंतर त्यांचे सार्वभौमत्वच बळकावण्याचा प्रयत्न करतो. याबाबत श्रीलंकेचे उदाहरण जगाने पाहिले आहे. प्रचंड कर्जामुळे श्रीलंकेला आपल्या हंबनटोटासारख्या बंदरांचा ताबा चीनकडे सोपवावा लागला आहे. नेपाळलाही याची भीती वाटते. परंतु ओलींसारख्या नेत्यांना नेपाळच्या हितापेक्षा आपला राजकीय स्वार्थ अधिक महत्त्वाचा वाटतो. वास्तविक पाहता, चीनकडून कर्ज घेतल्यास भविष्यात नेपाळवर दबाव आणण्याची संधी झिनपिंग यांना मिळणार आहे आणि बीआरआयचा मुख्य जागतिक उद्देशच हा राहिला आहे. २०१६ मध्ये ओली यांनी त्यांच्या दौऱ्यात चीनसोबत वाहतूक आणि पारगमन करार केला होता. या अंतर्गत चीनच्या सहा बंदरांमधून नेपाळ इतर देशांशी व्यापार करू शकतो. नेपाळचे भौगोलिक स्थान पाहिल्यास पूर्वेला चीन आणि उर्वरीत तिन्ही बाजूंनी भारताने वेढलेला हा देश आहे. भारतातील बंदरांचा वापर करून आज नेपाळ इतर देशांशी व्यापार करत आहे. हे त्यांच्यासाठी सर्व प्रकारे फायदेशीर आहे, परंतु २०१५ मध्ये भारतासोबतचा सीमाप्रश्न ऐरणीवर आल्यानंतर ओली यांनी भारताला पर्याय म्हणून चीनशी सलगी वाढवली. परंतु व्यावहारिकदृष्ट्या पाहिल्यास चीनची बंदरे नेपाळपासून किमान ३,००० किलोमीटर दूर आहेत. याउलट भारताचे कोलकाता बंदर ७०० किलोमीटर अंतरावर आहे. कराराच्या सहा वर्षानंतरही नेपाळने चीनच्या बंदरांमधून केवळ एकदाच व्यापार केला आहे. याचे कारण नेपाळला भारतातून व्यवसाय करणे सोपे आणि किफायतशीर आहे. नेपाळने भारतामार्फत बांगलादेशला वीज विकली असून हा प्रादेशिक सहकार्यातील एक महत्त्वाचा उपक्रम आहे. यातून नेपाळला आर्थिक फायदा तर होईलच, पण भारतामार्फत इतर देशांना वीज विकण्याचा मार्गही खुला होणार आहे. भारत आणि नेपाळ जलविद्युत क्षेत्रात आणखी मजबूत भागीदारीकडे वाटचाल करत आहेत. याशिवाय आज भारत नेपाळचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. सीमावादासारखे मुद्दे असूनही भारत आणि नेपाळमधील द्विपक्षीय संबंध दृढ झाले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानासारख्या नवीन क्षेत्रातही दोन्ही देश पुढे जात आहेत. अशा स्थितीत ओली यांचा चीन दौरा संबंध सुधारणांच्या नव्या आशाआकांक्षांना खिळ घालणारा आहे. परंतु ओली यांनी चीनकडून आश्वासने पदरात पाडून घेतली तरी भारताशी असणारे मैतरच नेपाळसाठी उपकारक आहे, हे त्यांना उमगल्याशिवाय राहणार नाही.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** — **मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर २०२४.** मार्गशीर्ष कृ. २, पुनर्वसु, श्री शके १९४६,विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. पेन्शनर्स डे. **नक्षत्र :** पुनर्वसु, योग : ब्रम्हा, करण : वणिज, **सूर्योदय :** स.०६.४६ सूर्यास्त : सायं.०५.३३ वा. **राहू काळ : दुपारी : ३:०० ते ४:३०**

**दिनविशेष** — ▶१७४० : वसईच्या लढाईत पराक्रम गाजवून वसईचा किल्ला जिंकणारे पराक्रमी चिमाजी अप्पा यांचे निधन. ▶१७४९ : डायनामो, ट्रान्स्फार्मर अशा साधनांचा शोधांचा पाया घालणाऱ्या जोसेफ हेन्री यांचा जन्म. ▶१८०३ : ब्रिटिश व नागपुरकर भोसले यांच्यातील देवगावचा तह. ▶१९०३ : किटिहॉक, नॉर्थ कॅरोलायनाच्या चौपाटीवर ऑलिव्हर राईटने 'द फ्लायर' हे विमान उडविले. ▶१९२९ : सरदार भगत सिंग आणि राजगुरू यांनी सॅंडर्सचा वध केला. ▶१९४४ : वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांचे निधन. ▶१९८५ : चित्रपट कथालेखक मधुसूदन कालेलकर यांचे निधन. ▶२००१: सचिन तेंडूलकर कॅस्ट्रॉल क्रिकेटर ऑफ इअर. पॉली उम्रीगर यांना कॅस्ट्रॉल जीवन–गौरव पुरस्कार. ▶१९५९ : ज्येष्ठ कॉंग्रेस नेते आणि इतिहासकार डॉ. पट्टाभिसीता–रामय्या यांचे निधन. ▶१९९५ : संस्कृत पंडित आणि राष्ट्रपती पुरस्कार विजेते विठ्ठलशास्त्री दीक्षित (अग्निहोत्री) यांचे निधन. ▶१९९९ : ज्येष्ठ साहित्यिक विजय तेंडूलकर व ख्यातनाम नर्तक बिरजू महाराज यांना संगीत नाटक अकादमीची सन्मानवृत्ती प्रदान. ▶२००० : समर्थ रामदासस्वामींच्या साहित्याचे गाढे अभ्यासक नानासाहेब धर्माधिकारी यांना संतकृपा प्रतिष्ठानच्या वतीने 'संत श्री ज्ञानेश्वर पुरस्कार'प्रदान.

**राशीभविष्य** — ▲**मेष :** गुप्त शंत्रूपासून सावध रहा. ▲**वृषभ :** कामात दिरंगाई होईल. ▲**मिथुन :** जिवलग साथीदार भेटेल. ▲**कर्क :** आनंददायक दिवस. ▲**सिंह :** घरगुती समारंभ आखाल. ▲**कन्या :** गृहसौख्य लाभेल. ▲**तुळ :** वाटाघाटी कराल. ▲**वृश्चिक :** अर्धवट कामे पूर्ण होतील. ▲**धनु :** मेजवानीचा योग. ▲**मकर :** धनलाभ होईल. ▲**कुंभ :** सार्वजनिक कामे कराल. ▲**मीन :** मनाप्रमाणे कामे होतील.

**चिंतन** — ईश्वर एक क्षणभरही विश्रांती घेत नाही. तो सतत कार्य करीत अअसतो. आपल्याला त्याची सेवा करायची असेल किंवा त्याच्याशी एकरुप व्हायचे असेल, तर त्याच्या प्रमाणेच आपणही अविरत कार्य करायला पाहिजे.

– महात्मा गांधी

**व्यक्तीविशेष**

### य. गो. जोशी

मराठीतील नव्या वळणाचे एक समर्थ कथाकार य. गो. जोशी यांचा जन्म १७ डिसेंबर १९०१ रोजी पुणे जिल्ह्यातील भिगवण येथे झाला. १९३४ मध्ये प्रकाशन व्यवसायास सुरुवात केलेल्या जोशी यांनी एक रुपया दोन आणे ही आपली पहिली कथा प्रसिद्ध केली. शेवग्याच्या शेंगा ही त्यांना लौकिक मिळवून दिलेली कथा, जिच्यावरील चित्रपटही गाजला. पांढपरेशा मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे प्रसन्न शैलीतत चित्रण करणारी त्यांची कथा जिवंत अनुभव प्रगट करते. पुनर्भेट हा त्यांच्या कथांचा संग्रह प्रसिद्ध आहे. 'तुळशीपत्र', आणि 'इतर गोष्टी', 'रेघोट्यांचे दैवत''मायेच्या सावल्या', 'जाई जुई', 'तरंग' हे अन्य कथासंग्रह, पडसाद आणि इतर कादंबऱ्या लिहिणाऱ्या य. गो. जोशींची भारतीय संस्कृतीच्या उदात्त मूल्यांवर श्रद्धा होती. लेखन हा समाजाचा मार्गदर्शन मित्र असतो अशा भावनेने त्यांनी लेखन केले. 'वहिनीच्या बांगड्या', 'शेवग्याच्या शेंगा' अशा गाजलेल्या चित्रपटाच्या कथा त्याच्या होत्या. दुधाची घागर हे त्यांचे आत्मचरित्र. आपल्या प्रकाशन संस्थेमार्फत चिं. ग. कर्वे आणि जोगळेकर यांच्या सहाय्याने त्यांनी महाराष्ट्र परिचय अर्थात संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश संपादित केला. सोज्वळ साहित्यसेवकाचे ७ नोव्हेंबर १९६३ रोजी पुणे येथे निधन झाले.

**बोधकथा**

### ...आणि बंटी शहाणा झाला

बंटीला पसारा करायची खूप सवय होती. घरात एकुलता एक असल्यामुळे भरपूर खेळणी त्याच्याकडे होती. सगळी खेळणी काढून तो घरभर मांडून ठेवत असे. आई त्याला सतत सांगत असे, 'अरे बंटी खेळल्यानंतर सर्व खेळणी आवरून ठेवत जा. घरात केवढा पसारा होतो ! शिवाय या खेळणीवर पाय पडून कोणीतरी घसरून पडेल.' पण बंटीला काही ते पटायचे नाही. आईने सांगितलेले तो या कानाने ऐकायचा आणि त्या कानाने सोडून द्यायचा. एके दिवशी आई सकाळपासून कसल्यातरी कामाच्या गडबडीत होती. स्वयंपाकघरातून खमंग वास येत होते. बंटीने विचारले, 'आई आज काय आहे गं? एवढी कसली गडबड?' आई म्हणाली, 'अरे आज तुझे आजी–आजोबा येणार आहेत.' हे ऐकून बंटीला खूप आनंद झाला. कारण, आजोबा म्हणजे त्याचे अगदी आवडते. जणू मित्रच. त्यामुळे आता आपल्याला भरपूर खाऊ आणि खेळणी मिळणार. शिवाय आजोबा आपल्याबरोबर खेळणार आणि छान छान गोष्टी सांगणार या कल्पनेने बंटी जाम खूश झाला. **(पूर्वार्ध)**

**जिज्ञासा**

### रेड लेड अर्थात सेंदूरचा शोध

फार प्राचीन काळापासून शिसे (लेड) आणि त्याच्या संयुगांचा वापर होत असे. इतिहासात याचे अनेक पुरावे सापडतात. भांड्यांसाठी, जलवाहिन्यांसाठी, बंदुकीच्या गोळ्यांसाठी शिसे वापरले जायचे. शिशाची बरीच संयुगे उपयुक्त आहेत.

पांढरे शिसे हे उत्तम पांढरा रंग म्हणून प्रसिद्ध आहे. निसर्गात हे शिसे सेरूसाईट नावाच्या क्षार रुपात आढळते. दिवसेंदिवस शिसाची मागणी वाढत असल्यामुळे शास्त्रज्ञांनी पांढरे शिसे तयार करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती शोधून काढल्या होत्या. शिसे आणि व्हिनेगार वापरून त्यापासून लेड ॲसिटेट बनवत आणि त्यापासून पुन्हा पांढरे शिसे बनवत असत. या पांढऱ्या शिसाला निरनिराळ्या देशातून बरीच मागणी असल्यामुळे त्याचा व्यापार वेगवेगळ्या देशांमध्ये होत असे. (पूर्वार्ध)

**सामान्यज्ञान**

### लिबियन वाळवंट

आफ्रिका खंडातील सहारा वाळवंटाचा ईशान्य भाग 'लिबियन वाळवंट' म्हणून ओळखला जातो. याचा विस्तार आफ्रिकेतील लिबिया, ईजिप्तचा पश्चिम भाग आणि सुदानचा उत्तर भाग यांमध्ये म्हणजेच नाईल नदीच्या पश्चिम भागात आहे. साधारणपणे २१ अंश ते २८ अंश उत्तर अक्षवृत्त आणि २० ते ३१ अंश पूर्व रेखावृत्तांदरम्यान हे वाळवंट पसरलेले आहे. या वाळवंटाचा इजिप्तमध्ये येणारा भाग 'वेस्टर्न डेझर्ट' या नावाने ओळखला जातो. लिबियन वाळवंटाच्या उत्तरेस भूमध्य समुद्र, **(क्रमश:)**

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५३१**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | | | 1 |
| 4 | | | 2 |
| | 3 | 1 | |
| | 4 | 2 | |

**क्रमांक ५३० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 1 |
| 2 | 1 | 3 | 4 |
| 1 | 2 | 4 | 3 |
| 4 | 3 | 2 | 1 |

**हास्यविनोद**

दोन माणसं भांडत होती आणि हातातल्या काठीने एकमेकांची डोकी फोडत होती. इतक्यात एकजण जवळ आला आणि दोघांच्या हातात एक एक कागदाचा तुकडा देवून गेला. दोघांनी तो वाचला. कागदावर लिहिलं होतं, 'मलमपट्टीसाठी माझ्या दवाखान्यात या. हाकेच्या अंतरावर आहे. दोघे आल्यावर स्वस्तात करून देईन.'

रात्री बराच वेळ झाला तरी बंड्या जागा होता हे पाहून गणपतरावांनी विचारले, ' काय रे बंड्या झोप की आता. दोन वाजले. काही अडचण आहे का?'
बंड्या : नाही बाबा मी झोपणार नाही.
**बाबा :** का रे?
**बंड्या :** काल माझे स्वप्नात चिंटूशी भांडण झाले होते. मी त्याला खूप मारले होते. आज तो त्याचे मित्र घेऊन मला मारायला येणार आहे. मी झोपलोच नाही तर त्याला मी सापडणारच नाही !

### चौदा वर्षांच्या पाठपुराव्याची संकल्पसिद्धी

पुण्याच्या कोथरूड भागात असलेल्या स्वप्नशिल्प या प्रतिष्ठित गृह रचना संस्थेत जे इमारतीखाली तळाला दोन रोहित्रे बसवलेली होती. निवासी अथवा व्यावसायिक इमारतीखाली रोहित्र बसविणे हे धोकादायक आहेच, परंतु दिल्लीच्या उपहार सिनेमागृहाच्या खटल्यातील निर्णयापासून सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारे रोहित्र बसवणे अथवा बसवलेले रोहित तेथून न हलवणे ही बाब बेकायदेशीर ठरवली आहे. या निकालानंतर स्वप्नशिल्प सोसायटी मधील रहिवासी श्री विनय चितळे यांनी हे रोहित्र हलवण्याबाबत सुप्रीम कोर्ट, लोकसभा व इलेट्रिकल ऑथॉरीटी या सर्वांची दारं ठोठावली होती आणि पत्व्यवहार करून वेळोवेळी दाद मागितली आणि सोसायटीच्या व्यवस्थापन समितीकडे अनेक वर्षे पाठपुरावा केला.

मार्च २०२३ मध्ये नवीन कार्यकारणी निवडून आल्यावर त्या कार्यकारिणीने हा विषय धसास लावण्याचे ठरवले आणि त्या दृष्टीने पावले उचलावयास सुरुवात केली. या भागातील स्थानिक आमदार आणि तत्कालीन पालकमंत्री माननीय चंद्रकांत दादा पाटील यांनी समस्येचे गांभीर्य जाणून तात्काळ या कामासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्याच बरोबर माननीय आमदार आणि मंत्री श्री शंभुराज देसाई साहेब यांनी पण स्वतः लक्ष घालून सरकार दरबारी मदत केली.



याबाबतच्या सर्वपरवानग्या मिळवून याचे काम सुरु झाले. आज मितिला ही दोन्ही रोहित्रे तळमजल्यावरून काढून ठेवली आहेत आणि लवकरच इमारतीच्या समोरच्या बाजूस असलेल्या नवीन शेडमध्ये ती बसवण्यात येतील.

या कामांमध्ये अर्थातच अनेक अडचणी आल्या.. परंतु जवळजवळ सोसायटीतील सर्व सदस्य समितीच्या पाठीशी उभे राहिले आणि अखेरीस हे काम आता पूर्णत्वास आले आहे. याचा औपचारिक उद्घाटन समारंभ लवकरच मान्यवरांच्या हस्ते आणि त्यांच्या उपस्थितीत करण्यात येईल असे सोसायटीचे अध्यक्ष श्री सतीश भोसरेकर आणि सचिव श्री अरविंद लेले यांनी सांगितले. या कामांमध्ये श्री विनय चितळे यांच्याबरोबरच श्री अरविंद लेले, श्री सतीश भोसरेकर आणि श्री भूषण खरे इत्यादी समिती सदस्यांचा विशेष सहभाग राहिला. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याबरोबरच आता सोसायटीतील जे इमारतीमधील सर्व रहिवाशी भयमुक्त जीवन जगू शकतील..

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# उद्योगनगरीच्या पदरी पुन्हा निराशा

## यंदाही मंत्रीपदाची हुलकावणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** उद्योगनगरी म्हणून देशभरात प्रचलित असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराच्या पदरी मंत्रीपदाबाबत पुन्हा एकदा निराशा आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून उद्योगनगरीला मंत्रीपदापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

सलग तीनदा निवडून आलेले आमदार महेश लांडगे असो वा विक्रमी मताधिक्याने जिंकलेले शंकर जगताप असो किंवा तिसऱ्यांदा जिंकणारे आमदार अण्णा बनसोडे असो कुणालाही भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने मंत्रीपदाची संधी दिली नाही. भाजपसह राष्ट्रवादीच्या आमदारांना मंत्रीपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांची मोठी निराशा झाली आहे. त्यामुळे शहराला मंत्रीपद तरी कधी मिळणार? असा सवाल पिंपरी चिंचवडकर करु लागले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय व पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी विधानसभा मतदार संघातून विजयाची हॅट्रीक करणारे आमदार महेश लांडगे हे मंत्रीपदाचे प्रबळ दावेदार समजले जात होते. अनेक हिंदुत्ववादी संघटनांबरोबरच त्यांचे असलेले सलोख्याचे संबंध हा त्यांच्या पूरक गुणामुळे त्यांना मंत्री पद मिळावे, अशी अनेकांची अपेक्षा होती. भोसरी विधानसभा मतदारसंघात हिंदुत्त्वासोबतच विकासाचे नवे मॉडेल उभे करणारे लांडगे यांना पुन्हा एकदा डावलण्यात आले. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर त्यांचे भावी मंत्री असे फलक मतदारसंघात झळकले होते. मात्र, त्यांना भाजपच्या कोट्यातून मंत्रीपद मिळविण्यात यश आले नाही.

राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार आण्णा बनसोडे हे यंदा पिंपरी विधानसभा मतदार संघाचे तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करीत असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख आहे. अजित पवार यांच्या राजकीय बंडाच्यावेळी बनसोडे हे अजित पवार यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहिले. त्यामुळे तीन वेळा निवडून येण्याबरोबरच अजित पवार यांच्याशी असलेल्या घनिष्ठ संबंधांमुळे त्यांना मंत्रीपद मिळेल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, राष्ट्रवादीच्या कोट्यातील मंत्रीमंडळात त्यांची वर्णी लागू शकली नाही.

सध्या शहरातील विधानसभा सदस्यांची संख्या ३ तर विधानपरिषद सदस्यांची संख्या २असे एकूण पाच आमदार शहरात वास्तव्यास आहेत. यापैकी अमित गोरखे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्षपद भूषविले होते. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय असलेले गोरखे यांना मंत्रीपद देण्याची मागणी समाज बांधवांनी केली होती. मात्र त्याला यश आले नाही.

काँग्रेस नेते स्व. प्रा. रामकृष्ण मोरे यांनी शालेय शिक्षणमंत्रीपद भूषविल्यानंतर अद्यापपर्यंत एकाही आमदाराला मंत्रीपद मिळू शकले नाही. मात्र. राज्यमंत्रीपदाचा दर्जा असलेली अनेक पदे शहरातील विशेषत: भाजप पदाधिकाऱ्यांना मिळाली आहे. यामध्ये लेखा समिती, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्षपद अशी अनेक पदे मिळाली आहेत. तर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाबरोबरच ग्राहक समितीचे अध्यक्षपद भूषविले आहे. परंतु मंत्रीपद न देता शहराची बोळवण करण्यात येत असल्याची भावना पिंपरी-चिंचवडकर सातत्याने व्यक्त करत आहेत.

## पिंपरी नेहरू-नगररोड रस्त्यावर गतिरोधक बसवा – ॲड. साबळे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी नेहरूनगररोड रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी ॲड.दिपक साबळे यांनी केली आहे. पिंपरी नेहरूनगर रोड रस्त्यावरील उतार हा जीवघेणा असून या रस्त्यावरून प्रवास करताना अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे. या रस्त्याच्या आजूबाजूला दुकाने, कार्यालये आहेत. येथे नागरिकांची नेहमी रहदारी असते. शिवाय रस्त्यालगत गांधीनगर वसाहत,जय गणेश वरदहस्त सोसायटी ,महिंद्रा ॲन्थीया सोसायटी,लोखंडे कामगार भवन, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले सभागृह,आदी असल्याने रस्ता ओलांडत असताना जीव मुठीत घेऊन नागरिक रस्ता ओलांडत आहेत. या अगोदर रस्त्यावरून भरधाव जाणाऱ्या वाहनांना लगाम बसावा म्हणून उताराजवळील महात्मा फुले स्मारकासमोर गतिरोधक बसविण्यात आले होते. परंतु काही कारणांमुळे ते काढण्यात आले. या उताराच्या रस्त्याला गतिरोधकच नसल्याने अपघातांची मालिका सुरू आहे.

## » Selected



## पवार साहेबांसारखे लढायला शिकले पाहिजे – देवेंद्र तायडे

**पिंपरी :** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या 84 व्या वाढदिवसानिमित्त पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजक पक्षाचे कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे यांनी सांगितले कि शरद पवार यांनी राजकारणात अनेक चढ-उतार बघितले आहेत आणि कुठल्याही परिस्थितीमध्ये धीर सोडला नाही आपण हि पराभवाने खचून न जात पवार साहेबां सारखे लढायला शिकले पाहिजे.यावेळी माजी नगरसेवक . राहुल कलाटे यांनी सांगितले कि शरद पवार साहेबांना दिल्लीमध्ये प्रचंड आदर आहे. पवार साहेब गेली सहा दशके महाराष्ट्र नव्हे तर देशासाठी झटले आहेत. तसेच यावेळी शहराचे सरचिटणीस जयंत शिंदे असे म्हणाले की हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री सदैव धावला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ॲडव्होकेट जयदेव गायकवाड असे म्हणाले की पवार साहेबांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा न्याय स्वातंत्र्य आणि समता हा विचार घेऊन सामान्य नागरिकांसाठी काम केले.पवार साहेबांनी अनेक धरणे बांधली, लोकांच्या पाण्याचे आणि शेतीच्या पाण्याचे प्रश्न सोडवले. पवार साहेबांचा विचार पुढे घेऊन अनेकांचे प्रश्न सोडवण्याचे काम मला करता आले.

# आनंदनगर येथिल रहिवाशांवर रेल्वे प्रशासन वतीने होणारी कारवाई थांबवावी – शैलेश मोरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील आनंदनगर चिंचवड स्टेशन येथे रेल्वे प्रशासनाने कारवाई करण्यासाठी येथील रहिवाशांना ताबडतोब घरे मोकळी करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्या संदर्भात नोटीस देखील बजावलेली आहे परंतु आनंद नगर चिंचवड स्टेशन येथे रेल्वे प्रशासनामार्फत होत असलेली कारवाई थांबवावी अशी मागणी माजी नगरसेवक शैलेश मोरे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्याकडे केली आहे.

महानगरपालिका वतीने आनंदनगर मधील रहिवाशींकरिता एस. आर. ए. प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत आनंद नगर मधील या रहिवासी करिता राहण्याची योग्य ती सोय करावी अशी मागणी माजी नगरसेवक शैलेश मोरे यांची आहे. सदर मागणीकरिता शैलेश मोरे यांनी पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्याशी हि चर्चा केलीआहे, यावेळी आमदार अण्णा बनसोडे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही या विषया संदर्भात सांगितले आहे तसेच माजी नगरसेवक शैलेश मोरे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडेही आनंदनगर मधील रहिवाशांसाठी योग्य ती सोय करण्याची मागणी केली आहे. आता सदर मागणीची निवेदन शैलेश मोरे यांनी खासदार बारणे यांना दिले सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, आनंदनगर येथे एस. आर. ए. मार्फत रहिवाशंकरिता गृह प्रकल्प लवकरच राबविण्यात येणार आहे. मात्र त्याआधीच रेल्वे प्रशासन मार्फत कारवाई होणार असल्यामुळे आनंदनगर मधील नागरिकांची गैरसोय होणार आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**चिंचवड :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मराठवाडा जनविकास संघाचे संस्थापक अध्यक्ष वृक्षमित्र अरुण पवार यांच्या वतीने १२ हजार गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार असून, यापैकी गुरुवारी पहिल्या टप्प्यात आंबेगाव तालुक्यातील २ हजार विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. माळीण, फुलवाडे व बोरघर (ता. आंबेगाव) येथील पहिली ते दहावीपर्यंतच्या २ हजार विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कापडी पिशवी, कॅलेंडर, परीक्षा पॅड, भारताचे संविधान, तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना २१ अपेक्षित संच आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना वृक्षमित्र अरुण पवार म्हणाले, की देशाच्या राजकारणातील दिग्गज नेते म्हणून शरद पवारांनी आपले वेगळेपण जपले आहे.

## इंडियन डेंटल असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. विनयकुमार शेट्टी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर जिल्हा इंडियन डेंटल असोसिएशनच्या (IDA)अध्यक्षपदी विनयकुमार शेट्टी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. २०२४ ते २०२७ कार्यकाळासाठी हि निवड करण्यात आली. डॉ शेट्टी यांची निवड करत असता विद्यमान अध्यक्षा सह सर्व सभासद याप्रसंगी उपस्थित होते.डॉक्टरी क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांची ही निवड करण्यात आली येत्या काळात इंडियन डेंटल असोसिएशन (IDA) या संघटनेला बळ देण्याचे काम काम डॉ. विनय कुमार शेट्टी यांच्या माध्यमातून केलं जाईल असा सर्वांना विश्वास असल्या ने डॉ. विनयकुमार शेट्टी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.





## डॉ. योगेश भावसार यांना श्री बालाजी विद्यापीठाकडून पीएच्डी प्रदान

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) चे प्रा. योगेश विनोद भावसार यांना पुणे येथील श्री बालाजी विद्यापीठाकडून पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. भावसार यांनी "भारतीय उत्पादन क्षेत्रातील दीर्घकालीन एकीकरणाचे आर्थिक कामगिरीचे विश्लेषण" या विषयावर शोधप्रबंध सादर केला. डॉ. भावसार हे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) या संस्थेमध्ये रजिस्ट्रार व ओएसडी या पदावर कार्यरत आहेत. तसेच त्यांचा वरील विषयावर आधारीत शोधप्रबंध तुर्की येथे ऑनलाईन जर्नल मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. डॉ. लिना डाम यांचे मार्गदर्शन लाभले. या पदवी प्रदान सोहळ्यात बालाजी विद्यापीठाचे कुलपती परमानंदम यांच्या हस्ते डॉ. भावसार यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी पॅनासोनीक इंडिया कंपनीचे प्रमुख आदर्श मिश्रा, बालाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. के. शिरोडे, रजिस्ट्रार डॉ. एस. बी. आगाशे तसेच प्रा. भाग्यश्री भावसार, मोहनीश भावसार आदी उपस्थित होते. डॉ. भावसार हे वयाच्या २९ व्या वर्षी २०१० साली राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्वात तरुण रजिस्ट्रार म्हणून सेवेत रुजू झाले होते. पिंपरी चिंचवड एजुकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी प्रा. डॉ. योगेश भावसार यांचे अभिनंदन केले.

पान १ वरून

## खातेवाटपासाठी खलबते

त्यामुळे विजयकुमार गावितांना मंत्री पद नाकारण्यात आले. सुरेश खाडे यांच्याकडून मंत्रिपदास न्याय मिळाला नव्हता. फारसा प्रभाव टाकता न आल्याने खाडे यांना वगळण्यात आले. महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात स्थान न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ नाराज असून त्यांनी स्वत: माध्यमांसमोर आज (दि. १६) उघड नाराजी व्यक्त केली. आपण नाराज असल्याचे स्पष्ट करतानाच मी सामान्य कार्यकर्ता आहे. मला डावललं काय, फेकलं काय, काय फरक पडतो? मंत्रिपद किती वेळा आलं आणि गेलं छगन भुजबळ संपला नाही. जरांगेंना अंगावर घेतल्याचं बक्षीस मिळालं, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

## शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलन...

शिक्षण विभागाच्या उपायुक्त आशा राऊत आणि शिक्षण अधिकारी माध्यमिक आशा उबाळे यांचा समावेश आहे. शुक्रवार, दि. २० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पुस्तक प्रदर्शन, पुस्तक प्रकाशन व चित्र व छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन होणार असून या प्रसंगी यशदाचे महासंचालक निरंजन सुधांशू, पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. सहकार आयुक्त दीपक तावरे, निवृत्त आयएएस अधिकारी अनिल कवडे, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, लोकमान्य मल्टिपर्पज क्रेडिट सोसायटीचे सुनील जाधव, डॉ. राजाराम घावटे, राजगंगा बायोरिफायनरी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संमेलनाचा मुख्य उद्‌घाटन समारंभ शनिवार, दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला असून माजी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, अविनाश धर्माधिकारी, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, निवृत्त आयएएस अधिकारी विश्वास पाटील, नॅशनल बुक ट्रस्टचे विश्वस्त राजेश पांडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## आरोग्य केंद्रांवर ...

लघवी चाचणी ३५ रुपये आदी शुल्क आकारण्यात येते. मात्र, शासनाच्या निर्णयामुळे हे सर्व उपचार मोफत मिळण्यास सुरुवात झाले आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांचे आर्थिक उत्पन्न बंद झाले. त्यात आता गेल्या दिवसांपासून महावितरणकडून थकीत वीज बिल भरण्यासाठी आरोग्य केंद्रांकडे तगादा लावत आहेत. काही ठिकाणी तर वीज पुरवठा खंडीत करण्याचा प्रकार झाला मात्र, त्या तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांनी महावितरणच्या वरिष्ठांशी बोलून वीज पुरवठा सुरळीत ठेवल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## आप ने जाहीर केली...

काही नावांमध्ये बाबरपूरमधून गोपाल राय, ओखलामधून अमानतुल्ला खान आणि शकूर बस्तीमधून सत्येंद्र कुमार जैन यांचा समावेश आहे. आगामी दिल्ली निवडणुकीत नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसने दिवंगत शीला दीक्षित यांचे पुत्र संदीप दीक्षित यांना उमेदवारी दिल्याने अरविंद केजरीवाल यांच्यासाठी ही लढत मोठीच असेल.2013 आणि 2015 मध्ये अरविंद केजरीवाल यांच्याकडून पराभूत झालेल्या दिल्लीच्या तीन वेळा मुख्यमंत्री असलेल्या शीला दीक्षित यांच्या साक्षीदार असलेल्या मतदारसंघात या निर्णयामुळे ऐतिहासिक स्पर्धा पुन्हा निर्माण होणार आहे. संदीपसाठी ही निवडणूक केवळ राजकीय लढतीपेक्षा अधिक आहे; त्याच्या कुटुंबाचा वारसा पुन्हा मिळवण्याची आसंधी आहे.

## दोन वर्षात ३२ लोकांचे खून...

७ हजार रुपये, कापसाला ९ हजार रुपये भाव द्यावा. हमी भावापेक्षा कमी भावाने शेतमालाची खरेदी झाली असल्यास भावातील फरक देण्याचे सरकारने जाहीर केले होते, तो आता सरकारने द्यावा. लाडक्या बहिणीला २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते, आता ते तातडीने पूर्ण करावे. लाडकी बहिण योजनेतील ५० ते ६० टक्के लाभार्थी कमी करणार असल्याची चर्चा सुरु आहे, परंतु निवडणुकीआधी ज्या बहिणांना १५०० रुपये दिले त्या सर्व बहिणांना कोणतेही नियम, अटी, शर्ती न लावता पैसे द्यावेत.

# नवनिर्वाचित आमदार जगताप, आ.लांडगे यांचा सत्कार



**पिंपरी :** भाजप प्रणित केंद्र सरकार संविधान बदलतील असा आरोप करणाऱ्या काँग्रेसनेच देशांमध्ये आतापर्यंत ७२ वेळा संविधानात बदल केला. १९७५ मध्ये देशामध्ये आणीबाणी संविधानाचा अवमान केला. संविधान निर्मितीचे काम केलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत दोन वेळा पाडण्याचे काम काँग्रेसने केले, अशी टीका माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी केली. भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर च्या वतीने नवनिर्वाचित आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप यांचा शाल, श्रीफळ, पगडी आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. ग.दि. माडगूळकर प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला.

## फसवणूक प्रकरणी शोरुम मालकावर गुन्हा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** खरेदी केलेल्या जुन्या कारचे पूर्ण पैसे न दिल्याने शोरुम मालकाविरोधात हिंजवडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. अंबादास किसन काकडे (रा, विनोदे वस्ती, हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत राजेंद्र भागवत फाळके (वय ३४, रा. शुभम रेसिडेन्सी, धायरी नरे, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांच्याकडील कार साडे तीन लाखांना खरेदी केली. कार व सर्व कागदपत्रे घेऊन फिर्यादीला तीन लाखांचा चेक दिला. मात्र, बँकेत तो चेक बाऊन्स झाला असून त्यांनी ९० हजार रुपये दिले. मात्र, कार व्यवहारातील राहिलेले २ लाख ६० हजार रुपये न देता फिर्यादीची फसवणूक केली.

## विमा सखी योजना महिलांना स्वावलंबी बनविण्यात महत्त्वाचे योगदान देईल - आ.जगताप

# पिंपरी-चिंचवडमध्ये विमा सखी योजनेचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेला एलआयसीचा विमा सखी योजने मुख्य उद्देश महिलांना विमा क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा आहे. महिलांना मानधनासह रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करून त्यांना समाजात स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने हा कार्यक्रम महत्त्वाचे योगदान देईल, असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या एलआयसीच्या विमा सखी योजना पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच लागू करण्यात आली असून, याचा शुभारंभ पिंपळे गुरव येथील आमदार शंकर जगताप यांच्या जनसंपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची नोंदणी आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते करण्यात आली.

या कार्यक्रमाला माजी महापौर माई ढोरे, माजी नगरसेविका उषाताई मुंढे, सामाजिक कार्यकर्ते नितीन इंगवले, बुद्धिजीवी सेलचे अध्यक्ष मनोजकुमार मारकड, रोजगार, स्वयंरोजगार आणि कौशल्य विकास आघाडीचे जिल्हा संयोजक भारत मदने, शुभम नखाते, तसेच एलआयसीचे अधिकारी प्रमोद ढोणे आणि महेश पाटील यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

नारी शक्ती हा आपल्या देशाच्या प्रगतीचा कणा आहे. विमा सखी योजना महिला सक्षमीकरणासाठी मोठे योगदान देईल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिला विकासाच्या दृढ संकल्पाला बळकट करेल," असा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.

#रा

## निर्मला सीतारामन यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

# भारतीयांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काँग्रेसचा घाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १९५० मध्ये सर्वोच्च न्यायालयानं 'क्रॉस रोड्स' या कम्युनिस्ट मासिकाच्या बाजूनं आणि आरएसएसच्या संघटनात्मक मासिक 'ऑर्गनायझर'च्या बाजूनं निकाल दिला होता. पण प्रत्युत्तरादाखल अंतरिम सरकारनं विचार केला की प्रथम घटनादुरुस्तीची गरज आहे आणि ती काँग्रेसनं आणली. हे मूलतः स्वातंत्र्यावर घाला घालणारे होते. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भारताला आजही अभिमान आहे. भारतीयांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अंकुश ठेवण्याच्या उद्देशानं घटनादुरुस्ती करून पहिले अंतरिम सरकार सत्तेत आले, असा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केला.

भारतीय राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्यसभेत दोन दिवसीय चर्चेला सुरुवात करणाऱ्या सीतारामन म्हणाल्या की, १९७५ मध्ये देशात आणीबाणी लागू केल्यामुळे मोठ्या प्रमाणात निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्यानंतर माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी धडा घेतला. ज्या पद्धतीने ४२ वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली, त्यामुळे विरोधी पक्षनेते कसे तुरुंगात होते. राज्यसभेत एकाही व्यक्तीने विरोध केला नाही, असेही त्यांनी म्हटले.

आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी सरकारने १९७६ मध्ये केलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीवरून सोमवारी राज्यसभेत केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन आणि काँग्रेसचे खासदार



जयराम रमेश यांच्यात शाब्दिक चकमक झाली.

जयराम म्हणाले की, १९७८ मध्ये इंदिरा गांधी यांनी ४२ व्या घटनादुरुस्तीचे भाग रद्द करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुरुस्तीच्या समर्थनार्थ मतदान केले तेव्हा ४४ वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली होती. ४२ व्या घटनादुरुस्तीमुळे आपला निवडणुकीतील पराभव झाल्याचे लक्षात आल्यानंतर इंदिरा गांधी यांनी हे पाऊल उचलले, असे काँग्रेस नेते म्हणाले.

राज्यसभेत संविधानावरील चर्चेदरम्यान बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, "आपण आपल्या राज्यघटनेचे ७५ वे वर्ष साजरे करत असताना मला वाटतं की अशा भारताच्या निर्मितीसाठी आपण आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करण्याची वेळ आलीय. दुसऱ्या महायुद्धानंतर ५० हून अधिक देश स्वतंत्र झाले. त्यांची राज्यघटना लिहिली गेली. परंतु अनेक देशांनी आपली राज्यघटना बदलली आहे. त्यांच्या संविधानाचे संपूर्ण वैशिष्ट्य अक्षरशः बदलले आहे. परंतु अनेक दुरुस्त्या करूनही आपली राज्यघटना काळाच्या कसोटीवर उतरली आहे, असे त्या म्हणाल्या.

# थंडीच्या लाटेची तीव्रता वाढली



**नवी दिल्ली :** देशातील मैदानी आणि डोंगराळ भागात थंडीची लाट वाढली आहे. दरम्यान, भारतीय हवामान शास्त्र विभागाने (आयएमडी) सोमवारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दक्षिण आणि उत्तर भारतासाठी हवामानाचा महत्त्वाचा अलर्ट जारी केला आहे. आयएमडीच्या म्हणण्यानुसार, तामिळनाडू आणि आसपासच्या भागात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर भारतातील अनेक भागांत थंडीचा कहर सुरूच राहणार असून, यामुळे थंडी आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

उत्तर भारतातील हिमाचल प्रदेश, पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि मध्य प्रदेशात थंडीची लाट कायम आहे. अनेक भागात तापमान सरासरीपेक्षा ५ अंश सेल्सिअसने कमी नोंदविण्यात आले. राजस्थान आणि मध्य प्रदेशाच्या काही भागात थंडी पडली आहे. आयएमडीने १६ ते २२ डिसेंबर दरम्यान देशातील अनेक भागात थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे.

पंजाब, हरयाणा-चंदीगड आणि उत्तर प्रदेशात १६ ते २० डिसेंबर दरम्यान थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. तर विदर्भ, छत्तीसगड, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि तेलंगणामध्ये १६ डिसेंबरला थंडीचा प्रभाव अधिक राहील. पश्चिम राजस्थानमध्ये १६ ते २२ डिसेंबर, पूर्व मध्य प्रदेशात १६ आणि १७ डिसेंबर आणि पश्चिम मध्य प्रदेशात १७ डिसेंबरला थंडीचा कडाका कायम राहण्याची शक्यता आहे. थंडीच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी लोकांना पुरेशा उपाययोजना करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

देशाच्या अनेक भागात दाट धुक्याचा इशारा देण्यात आला आहे. १८ डिसेंबरपर्यंत पंजाब, हरियाणा-चंदीगड, उत्तर प्रदेश आणि ओडिशामध्ये रात्री उशिरा आणि पहाटेच्या वेळी दाट धुके राहण्याची शक्यता आहे. तर पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये १९ डिसेंबरपर्यंत दाट धुके असेल.

## » Selected

### प्रियांका गांधी यांची बॅग चर्चेत

**नवी दिल्ली :** संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असून,



काँग्रेसी खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांचे हे पहिलेच अधिवेशन आहे. सोमवारी त्या संसदेत पॅलेस्टाईन असे लिहिलेली बॅग घेऊन आल्या असल्याने, सत्ताधारी भाजपने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रियंका गांधी या केरळच्या वायनाडमधून निवडून आल्या आहेत. निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर संसदेच्या पहिल्याच अधिवेशनात त्या उपस्थित आहेत. दरम्यान पॅलेस्टाईन असे लिहिलेल्या बॅगेमुळे त्या भाजप खासदारांकडून लक्ष्य झाल्या आहेत. प्रियंकाच्या या कृतीला भाजप खासदार गुलाम अली खताना यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. प्रियंका या गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये युद्ध सुरू झाल्यापासून गाझामध्ये इस्रायली लष्कराच्या कारवायांविरुद्ध आवाज उठवत आहेत.

### पंतप्रधान मोदींनी विपर्यास केला; काँग्रेसचा आरोप

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यांना आरक्षण देण्याबाबत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पत्राबाबत तथ्यांचा विपर्यास करून देशाची दिशाभूल केल्याचा आरोप राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला आहे. राज्यसभेत बोलताना, खर्गे यांनी भाजपचे नेते पंतप्रधान मोदींची भक्ती करत असल्याचा आरोप केला आणि ही परिस्थिती देशाला हुकूमशाहीकडे घेऊन जात असल्याची भीती व्यक्त केली. १९४७ ते १९५२ या काळात निवडून आलेले सरकार नव्हते आणि काँग्रेसने बेकायदेशीरपणे राज्यघटनेत दुरुस्ती केली होती, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले होते. खर्गे म्हणाले की, पहिली दुरुस्ती श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासह संविधान सभेच्या सदस्यांनी केली होती. अनुसूचित जाती-जमातींना आरक्षण मिळावे, शिक्षण, रोजगाराशी संबंधित अडचणी दूर व्हाव्यात आणि जमीनदारी पद्धत संपुष्टात यावी, यासाठी ही दुरुस्ती करण्यात आली आहे. ही वस्तुस्थिती दडवली, त्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशाची माफी मागावी, अशी माझी मागणी आहे, असे ते म्हणाले.

## किरिट सोमय्यांनी केली कारवाईची मागणी

# मालेगाव व्होट जिहाद फंड घोटाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** भाजप नेते किरीट सोमय्या यांनी मालेगाव व्होट जिहाद फंडिंग घोटाळा समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव शाखेत सिराज मोहम्मदची ५ बेनामी खाती सापडली. यामध्ये ५३ कोटी बेनामी व्यवहार केल्याप्रकरणाची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी पोलीस आणि एटीएसला महाराष्ट्र बँकेच्या व्यवस्थापकावरही कारवाई करण्याची विनंती केली होती, असे किरीट सोमय्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत हा प्रकार उघडकीस आणला आहे.

एवढेच नाहीतर किरीट सोमय्या यांनी सोशल मीडियावर अवैध बँक खातेधारकांची नावांची यादी सोशल मीडियावर शेअर केली आहे. ज्यात जयेश लोटन मिसाळ, गणेश लोटन मिसाळ,






मनोज गोरख मिसाळ, प्रतिक पोपट जाधव अशा नावाने बँक खाती खोलण्यात आली होती, असे एका पत्रकात नमूद करण्यात आले होते, या व्होट जिहादप्रकरणाचे ट्विट किरीट सोमय्या यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र मालेगाव शाखेत सिराज मोहम्मदची ५ बेनामी खाती सापडली. ५३ रूपये कोटी बेनामी व्यवहार मी पोलीस आणि एटीएसला महाराष्ट्र बँकेच्या व्यवस्थापकावरही कारवाई करण्याची विनंती केली होती असे ट्विट करत किरीट सोमय्या यांनी याप्रकरणी गौप्यस्फोट करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यात २१ राज्यांतून २५५ कंपन्यांमधून ११२ कोटी ७१ लाख ९७ हजारांहून अधिक पैसे जमा करण्यात आले होते. या व्यतिरिक्त बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत अशाचप्रकारे ५ बेनामी खाती उघडण्यात आली असून यामाध्यमातून व्होट जिहाद करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले, तसेच याप्रकरणात एकूण ५३ कोटी ७५ लाखांचे आर्थिक व्यवहार झाले असल्याची माहिती देण्यात आली.

### श्रीसाईचरणी कतरिना कैफची हजेरी

**शिर्डी :** प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री



कतरिना कैफ शिर्डीत दाखल झाली. दुपारी बाराच्या सुमारास ती मंदिर परिसरात पोहोचली तेव्हा साई मंदिरात साईबाबांची दुपारची मध्यान्ह आरती सुरु असल्यानं तिला मंदिराच्या बाहेरच ताटकळत उभं रहावं लागलं. मंदिराच्या बाहेरुनच तिनं साई आरतीत भाग घेतला. यावेळी चाहत्यांना ओळखू नये यासाठी कतरिनानं चेहऱ्यावर मास्क परिधान केला होता. मात्र कतरिना मंदिरात आल्याची बातमी वेगानं पसरली आणि मोठ्या संख्येनं चाहत्यांनी मंदिर परिसरात गर्दी केल्याचं चित्र पाहायला मिळालं.

साईबाबांची आरती संपल्यावर कतरिनानं मंदिरात प्रवेश केला आणि साई समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. यावेळी साई समाधीवर तिनं साई राम अक्षर असलेली सुंदर शालही अर्पण केली.

## बंद न केल्यास कारवाईचा इशारा

# ज्योतिबाच्या पायथ्याशी अनधिकृत उत्खनन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्योतिबा डोंगराच्या पायथ्याशी गायमुखाजवळ अनधिकृत गौणखनिज उत्खनन केल्याप्रकरणी हैदराबाद येथील मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रा. प्रा. लि. कंपनी दंडात्मक कारवाईला न जुमानता रविवारी पुन्हा उत्खनन करीत होती. यासंबंधी पुराव्यानिशी प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर पन्हाळा तहसीलदार माधवी शिंदे कंपनीस उत्खनन बंद



करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ज्योतिबा डोंगराच्या पायथ्याशी गौणखनिज उत्खननप्रकरणी दोषी मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रा. प्रा. लि. कंपनीस दंडात्मक कारवाई केली आहे. तरीही, या कंपनीकडून रविवारी उत्खनन होत असल्याची तक्रारी झाली. त्यानंतर तातडीने उत्खनन बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कंपनीने पुन्हा उत्खनन केल्याने त्यांच्यावर कारवाई होईल. असं पन्हाळा तहसीलदार माधवी शिंदे यांनी सांगितलं आहे. देसाई यांनी पहिल्यांदा तक्रार केल्यानंतर १० डिसेंबर रोजी प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनी दखल घेऊन कार्यवाहीचा अहवाल आठ दिवसांत अहवाल देण्याचा आदेश प्रांताधिकारी, तहसीलदार यांना दिले. यानंतर ११ डिसेंबर रोजी तहसीलदार शिंदे यांनी उत्खनन करणाऱ्या कंपनीस दंड करून अहवाल पाठवला. प्रशासनाच्या या दंडात्मक कारवाईला केराची टोपली दाखवत कंपनी रविवारी उत्खननाचे धाडस केले आहे.याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

### ईव्हीएमला दोष नको- टीएमसीचा काँग्रेसला सल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** निवडणुकीत ईव्हीएमने मतदान न करण्याच्या मोहिमेत गुंतलेल्या काँग्रेसला सहकाऱ्यांकडून धक्का बसला आहे. जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यापाठोपाठ टीएमसीनेही काँग्रेसला सल्ला दिला आहे. सहकाऱ्यांच्या टोमण्याला सामोरे गेल्यानंतर भाजपनेही जोरदार हल्ला चढवला. राहुल गांधी यांना निवडणूक कशी लढवायची हे माहित नसेल तर त्यांनी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनला (ईव्हीएम) दोष देऊ नये, असा टोला भाजपचे खासदार संबित पात्रा यांनी लगावला आहे.

## विध्वंस...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**सीरिया :** दमास्कस येथे, इस्त्रायली हल्ल्यानंतर, सत्ताधारी सीरियन संस्थेचा एक सैनिक लष्करी साइटवर झालेल्या नुकसानीची पाहणी करताना.

# लोकसेवा आयोगाच्या परीक्षा वेळापत्रक जाहीर

**नाशिक :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचं अंदाजित वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं त्यांच्या संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिध्द केलं आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव ओतारी यांनी याबाबत माहिती दिली आहे.

जाहीर करण्यात आलेलं वेळापत्रक अंदाजित असून, त्यामध्ये बदल होऊ शकतो. काही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

**वेळापत्रकात खालील परीक्षांचा समावेश :**

- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षांमध्ये दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ सर्व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र अराजपत्रित गट- ब आणि गट-क सेवा संयुक्त परीक्षांमध्ये महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब आणि गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा
- महाराष्ट्र अराजपत्रित गट- ब सेवा मुख्य परीक्षा
- सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र गट- क सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षामध्ये महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा
- अन्न व औषध प्रशासकीय सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र विद्युत आणि यांत्रिकी परीक्षा
- अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा
- निरीक्षक वैद्यमापक शास्त्र मुख्य परीक्षा
- राज्यसेवा मुख्य परीक्षा
- महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा

# गांधी घराण्याने माझी कारकीर्द उद्ध्वस्त केली

## काँग्रेसचे मणीशंकर अय्यर यांचा घणाघात

**मुंबई :** 'गेल्या १० वर्षांत मला फक्त एकदाच सोनिया गांधींना भेटण्याची संधी मिळाली आहे. गांधी घराण्याने माझी राजकीय कारकीर्द घडवली आणि त्यांनीच उद्ध्वस्त केली, पण मी कधीही भाजपमध्ये जाणार नाही,' असा धक्कादायक आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी केला आहे.



वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत अय्यर यांनी अनेक खुलासे केले. ते म्हणाले की, 'मला एकदा राहुल गांधींना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या होत्या. पण यासाठी मला प्रियंका गांधींना फोन करावा लागला होता. तसेच एकदा मी सोनिया गांधींना मेरी ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या तेव्हा मॅडम म्हणाल्या मी ख्रिश्चन नाही.' ८३ वर्षीय अय्यर यांनी दावा केला आहे की त्यांना गांधी कुटुंबातील प्रमुख सदस्यांशी वर्षानुवर्षे भेटता आलेले नाही. ते म्हणाले की, १० वर्षांपासून मला सोनिया गांधींना समोरासमोर भेटण्याची आणि राहुल गांधींसोबत वेळ घालवण्याची एकही संधी दिली गेली नाही.'

अय्यर यांनी तामिळनाडूमधील मायलादुथुराई येथून तीनदा लोकसभा निवडणूक जिंकली असून ते राज्यसभेचे खासदारही राहिले आहेत.

## नाना पटोले यांचा गंभीर आरोप

# ९ कोटी रुपयांसाठी तरुणाचे अपहरण

**नागपूर :** भाजपाचे आमदार आणि माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या बंगल्यावर एका तरुणाचे ९ कोटी रुपयांसाठी अपहरण करण्यात आले असून, त्यातील ४ कोटी रुपये वसूल करण्यात आलेत, असा धक्कादायक आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केलाय. वैभव नावाच्या तरुणाचे अपहरण करण्यात आले असून, त्याला रवींद्र चव्हाण यांच्या बंगल्यात ठेवण्यात आले असल्याची माहिती मला मिळाली आहे, असा दावा नाना पटोले यांनी केलाय. उर्वरित पैशांसाठी त्याच्यावर अत्याचार केले जात असल्याचा आरोप त्यांनी केलाय. रवींद्र चव्हाण यांच्याकडे इतके पैसे आले कसे, असा प्रश्न पटोलेंनी उपस्थित केलाय. दरम्यान, रवींद्र चव्हाण यांनी पटोले यांचे हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. नाना पटोले यांनी बिनबुडाचे आरोप करणे चुकीचे असल्याचं ते म्हणालेत.

रवींद्र चव्हाणांनी नाना पटोलेंचे सर्व आरोप फेटाळून लावत नाना पटोलेंनी याआधीसुद्धा असे खोटे आरोप केलेत. त्यांना वेगवेगळ्या नेत्यांवर खोटे आरोप करण्याची सवय आहे. त्यांनी असे बिनबुडाचे आरोप करणे चुकीचे आहे, असंही रवींद्र चव्हाण म्हणालेत. नाना पटोले यांचे आरोप नेहमीच टीआरपीसाठी असतात, स्वंग प्रसिद्धीसाठी नेहमीप्रमाणे त्यांनी हे वक्तव्य केलंय.

## राजपत्रित अधिकारी महासंघाची मागणी

# पदे भरताना कंत्राटी पद्धती नको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य सरकारच्या विविध संवर्गातील सुमारे अडीच लाखांपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. तर एकूण मंजूर पदांच्या ३५ टक्के पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरताना कंत्राटी पद्धतीचा वापर केला जाऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करीत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने व्यक्त केलीय. महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी करणारं पत्र पाठवलंय. प्रशासकीय विभागातील सरकारी योजनांची अन् सरकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत केली जाते. या विभागात दरवर्षी सुमारे ३ टक्के पदे निवृत्तीच्या माध्यमातून रिक्त होत असतात. गेल्या १० वर्षांत सरकारी भरतीचे प्रमाणदेखील अत्यंत कमी आहे. त्यामुळे पदभरती करताना लोकसेवा आयोग, जिल्हा निवड मंडळे आदी विहित मार्गाने वेळेत पदे भरण्यात यावीत, असंही महासंघानं म्हटलंय.

पदे न भरल्याचा फटका राज्यातील वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण तसेच लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मर्यादा येत आहेत. त्यामुळे पदभरतीवर असलेली मर्यादा रद्द करावी, सुधारित आकृतीबंध विहित मर्यादेत सादर करण्याबाबत संबंधित विभागप्रमुखांना निर्देश द्यावेत. राज्य सरकारच्या विविध विभागांतील कंत्राटी पदभरती प्रक्रियेत यापूर्वी झालेले गैरप्रकार आणि त्यामुळे झालेला गोंधळ लक्षात घेऊन सरकारने सद्यःस्थितीतील कंत्राटी नेमणुकांबाबत वस्तुस्थितीपूरक अशी चाचपणी करावी, अशी मागणी महासंघाने केलीय. कोणत्याही प्रकारामुळे प्रशासनातील गुणवत्तेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलीय. बदलापूर येथील शाळकरी अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराची निंदनीय घटना, तसेच कुर्ला येथे झालेला बेस्ट बसचा अपघात या दुर्दैवी घटनांतील आरोपी हे कंत्राटी कर्मचारी होते, ही गंभीर बाब दुर्लक्षित करता येणार नाही, याकडे महासंघाने सरकारचे लक्ष वेधलंय.

## प्रकाश आबिटकर यांचे पारडे जड

# कोल्हापूरचे पालकमंत्री कोण होणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महायुती सरकारचा बहुचर्चित मंत्रिमंडळ शपथविधी नुकताच संपन्न झालाय. विशेष म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्याच्या वाट्याला शिंदे सेनेचे आमदार प्रकाश आबिटकर, राष्ट्रवादीचे हसन मुश्रीफ यांना, तर पुणे जिल्ह्यातील कोथरूडमधून आमदार झालेले आणि जिल्ह्याचे सुपुत्र असलेल्या चंद्रकांत पाटलांच्या रूपाने तीन कॅबिनेट मंत्री जिल्ह्याला मिळाले आहेत. आता यातून पालक मंत्रिपदावर कुणाची वर्णी लागणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागलं आहे. यापूर्वी मंत्री चंद्रकांत पाटील आणि हसन मुश्रीफ यांच्या माध्यमातून भाजपा आणि राष्ट्रवादीने पालकमंत्रिपद भूषवले आहे, तर यंदा पहिल्यांदाच कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतलेल्या प्रकाश आबिटकर यांचं पारड जड मानलं जातंय.

सहकाराची पंढरी असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यात यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने निर्विवाद वर्चस्व मिळवलंय. जिल्ह्यातील दहा पैकी भारतीय जनता पार्टीने ३, शिंदे सेनेने ३, जनसुराज्य शक्ती पक्षाने २, राष्ट्रवादी अजित पवार गटाने १ आणि एका जागेवर महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शाहू आघाडीचा उमेदवार निवडून आलाय. यंदा पहिल्यांदाच विधानसभा निवडणुकीत शरद पवारांचा राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हद्दपार झालाय. याचंच बक्षीस म्हणून जिल्ह्याला दोन कॅबिनेट दर्जाची मंत्रिपद देण्यात आली असून, शिंदे सेनेचे प्रकाश आबिटकर आणि अजित पवारांचे शिलेदार हसन मुश्रीफ यांचा यामध्ये समावेश आहे.

### जनसुराज्य शक्तीची निराशा

● शाहूवाडी-पन्हाळा विधानसभा मतदारसंघातून जनसुराज्य शक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष विनय कोरेंनी विजय मिळवला. तसंच हातकणंगले मतदारसंघातून पक्षाच्या नारळाची बाग चिन्हावर अशोकराव माने पहिल्यांदाच विधानसभेत पोहोचलेत. जिल्ह्यात दोन आमदार आणि पडत्या काळात महायुतीला ताकद दिलेल्या आमदार विनय कोरे यांना मंत्रिपदाची लॉटरी लागेल, असा अंदाज होता. मात्र जनसुराज्य शक्ती पक्षाच्या पदरीही निराशाच पडली, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवलेंच्या पक्षालाही मंत्रिपद मिळालं नाही. मात्र २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना विविध महामंडळे आणि कोल्हापूर जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून आरपीआयचे जिल्हाध्यक्ष उत्तम कांबळेंना संधी मिळाली होती. आता जनसुराज्य शक्ती पक्ष, शाहू आघाडी आणि आरपीआयची नाराजी दूर करण्याचं आव्हान महायुतीचे मंत्री चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ आणि प्रकाश आबिटकर यांच्यावर असणार आहे.

#रा

## मंत्रीपद मिळाल्याने इंदापूर तालुक्यात समाधानाची भावना

# दत्तात्रय भरणे यांच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर विधानसभेचे आमदार दत्तात्रय विठोबा भरणे यांनी रविवारी (दि. १५) नागपूरमध्ये महायुती सरकारच्या मंत्रीमंडळ विस्तार सोहळ्यात मंत्री पदाची शपथ घेतली. त्यामुळे इंदापूर शहरात व तालुक्यात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

इंदापूर शहरातील बाबा चौक या ठिकाणी या मंत्रीमंडळ विस्तार सोहळ्याचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस च्या कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी फटाक्यांची आतिषबाजी करीत डीजे वर ठेका धरला. दरम्यान, कार्यकर्त्यांनी एकमेकांना लाडू आणि मिठाई भरवून आनंद व्यक्त केला.याप्रसंगी मोठ्या संख्येने कार्येकर्ते, नागरिक उपस्थित होते.



कोणताही राजकीय वारसा नसतानाही एका कार्यकर्त्यापासून सामाजिक कामांना सुरवात करणारे आमदार दत्तात्रय भरणे यांची पुन्हा एकदा मंत्रीपदी वर्णी लागली आहे. इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे हे शेतकरी कुंटुंबातील आहेत. केवळ पक्षनिष्ठा व विकासकामांच्या जोरावर त्यांनी आज मंत्रीपदापर्यंत मजल मारली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक व विश्वासू आमदार म्हणून त्यांची राज्यामध्ये ओळख आहे.

**हजारो कार्यकर्ते नागपुरात**

● आ. दत्तात्रय भरणे यांच्या शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर इंदापूर तालुक्यातून आणि जिल्ह्यातून हजारोच्या संख्येने कार्येकर्ते राज्याच्या उपराजधानीत एक दिवस अगोदरच गेले होते. आ. भरणे शपथ घेण्यासाठी उठताच त्यांनी आनंद व्यक्त करीत जल्लोष केला.

## अनिल दोंदेकर यांचे निधन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** येथील जुन्या पिढीतील सुवर्णकार अनिल पांडुरंग दोंदेकर (वय ७२) यांचे आकस्मिक निधन झाले. ते सामाजिक कार्यात कायम अग्रेसर होते. ढुम्या गिरीभ्रमण मंडळाचे संस्थापक सदस्य प्रविण दोंदेकर, उद्योजक समीर दोंदेकर, लायन्स क्लब ऑफ राजगुरूनगरचे अध्यक्ष नितीन दोंदेकर आणि उद्योजिका सुषमा बेल्हेकर यांचे ते वडील होत. त्यांच्या अंत्यविधीला अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शोकभावना व्यक्त केल्या.

## Selected

## ढोकसांगवी संस्थेची निवडणूक बिनविरोध



**कारेगाव :** शिरुर तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या ढोकसांगवी येथील शिवमल्हार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी भाऊसाहेब बळवंत श्रीराम तर उपाध्यक्षपदी भगवान शिवाजी जगताप यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याचे संस्थेचे सचिव दिलीप पुणेकर यांनी सांगितले.

या आधीच्या अध्यक्षा शोभना सुदामराव पाचंगे व उपाध्यक्ष ठकाराम राजाराम मलगुंडे यांनी ठरल्याप्रमाणे आपल्या पदांचे राजीनामे दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर निवड करण्यासाठी संचालक मंडळाची नुकतीच ग्रामपंचायत सभागृहात बैठक झाली. यात अध्यक्षपदासाठी श्रीराम व उपाध्यक्षपदासाठी जगताप यांचे एकमेव अर्ज आल्याने या दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पोपटराव हराळ यांनी जाहीर केले.

## ऐन मार्गशीर्ष महिन्यात फुलांना बाजारभाव मिळेना?

# झेंडू, शेवंती उत्पादक अडचणीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** ऐन मार्गशीर्ष महिन्यातही झेंडू, शेवंतीच्या फुलांना बाजारभाव समाधानकारक मिळत नसल्याने फुल उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात रांजणी, थोरांदळे, पारगाव, शिंगवे परिसरात झेंडू, शेवंतीच्या फुलांची तोडणी सुरू आहे. दिवाळी सणाच्या अगोदर फुलांना बाजारभाव चांगले मिळत होते. परंतु त्यानंतर मात्र फुलांच्या बाजारभावात घसरण होत गेली. मार्गशीर्ष महिन्यात व्रतवैकल्ये, धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर असतात. यामध्ये सर्वच प्रकारच्या फुलांना मोठी मागणी असते. बाजारभाव देखील चांगले मिळतात. परंतु यंदा मात्र फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच पडली आहे.

अनेक शेतकऱ्यांनी झेंडूच्या फुलांबरोबरच शेवंतीची विविध रंगांची फुलांची पिके घेतली आहेत. यासाठी महागडी रोपे, मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन, फुलांना सूर्यप्रकाश अधिक मिळावा यासाठी वीजेची सोय केली. परंतू मार्गशीर्ष महिना सुरू होऊन आता दोन आठवडे उलटले, तरी देखिल बाजारभावात समाधानकारक वाढ झाली नाही.

सध्या झेंडूच्या फुलांचे बाजारभाव घसरले आहेत. पाच ते दहा रुपये किलो असा झेंडूच्या फुलांना भाव मिळत आहे. झेंडूची फुले स्वस्त मिळत असल्याने ग्राहक शेवंतीची महागडी फुले खरेदी करत नाहीत. त्यामुळे शेवंतीच्या फुलांना देखील समाधानकारक बाजारभाव मिळत नाही. शेवंतीच्या फुलांना सध्या किलोला शंभर रुपयांपर्यंत बाजारभाव मिळत आहे. शेवंतीचा फुलांना किलोला दोनशे रुपयांच्या पुढे बाजारभाव मिळणे अपेक्षित आहे.

रांजणी (कारफाटा ) येथील फुलउत्पादक शेतकरी नवनाथ वाघ, गोरक्षनाथ वाघ म्हणाले, सणासुदीचे दिवस डोळ्यासमोर ठेवून आम्ही फुलांचे पिक घेतले होते.

## वनविभागाने सतर्कतेने लावले पिंजरे

# येडगाव परिसरामध्ये बिबट्याचा वावर;

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** येडगाव परिसरामध्ये बिबट्याचा वावर पुन्हा वाढू लागल्याने व खानेवाडी परिसरामध्ये दोन बिबटे दिसत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे असल्याने वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी नामदेव नेहरकर यांच्या उसाच्या कडेला पिंजरा लावण्यात आला आहे, अशी माहिती वनक्षेत्रपाल लहू ठोकळ यांनी दिली.



मागील पंधरवाड्यामध्ये खाणेवाडीच्या शरद नेहरकर यांच्या घराजवळ बिबट्याने एका बारा वर्षाच्या मुलावर हल्ला करण्याचा प्रयत्नकेला होता.त्यावेळी वन खात्याने घटनेचे गांभीर्य ओळखून त्या ठिकाणी पिंजरा लावून एक बिबट्याही पकडला होता. परंतु त्याच दिवशी रात्रीच्या वेळी दोन बिबटे स्थानिक नागरिकांनी पाहिल्याने वनखात्याला पुन्हा पिंजरा लावण्याची मागणी स्थानिक लोकांनी केली होती.

दरम्यान, स्थानिक नागरिकांच्या मागणीवरून वन विभागाने खानेवाडी परिसरामध्ये पुन्हा एक पिंजरा लावला आहे. बिबट्याला खाद्य म्हणून पिंजऱ्यामध्ये कोंबडी देखील ठेवण्यात आलेली आहे. पिंजरा व्यवस्थित न झाकल्यामुळे तसेच बिबट्याला पिंजरा दिसत असल्यामुळे तो पिंजऱ्यात येत नसावा, असा अंदाज स्थानिकांनी व्यक्त केला आहे.

## जेजुरी उद्योजक संघाच्या रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद



**जेजुरी :** शरद पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी औद्योगिक वसाहतीतील २५३ कामगारांनी व विशेषतः महिला कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. या शिबिराचे उद्‌घाटन पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक सचिन सोनवणे, सुधीर गोडसे, महेश काळे आदी उपस्थित होते. या शिबिराचे नियोजन जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे, कार्याध्यक्ष रवींद्र जोशी, पदाधिकारी पांडुरंग सोनवणे, राजेश पाटील, शकील शेख, अनंत देशमुख, संभाजी जाधव, सुयश जोशी, रौनक सर माने, मुस्ताक शेख, वसीम शेख, सुजित राणे, प्रशांत लाखे, व्यवस्थापक जालिंदर कुंभार आदींनी केले.

# मधुकरराव पिचड यांना श्रध्दांजली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** आदिवासी समाजाचे नेते, मधुकरराव पिचड यांना खेड तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आदिवासी समाजाच्या वतीने डेहणे येथे आयोजित शोकसभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. एस. एम. सुपे मेमोरियल फाउंडेशन आणि आदिवासी सामुदायिक विवाह सोहळा समितीने आयोजित केलेल्या या शोकसभेसाठी भोरगिरी ते आव्हाट परिसरातील आदिवासी समाजाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री, जात पडताळणीचे जनक, आदिवासींसाठी बजेटमध्ये कायमस्वरूपी निधीची तरतूद करण्यासाठी ज्यांचे मोठे योगदान आहे. असे आदिवासींचे आधारवड मधुकरराव पिचड यांच्या निधनाने निर्माण झालेले पोकळी पुढील काळात आदिवासी समाजातील तरुणांना भरून काढण्याचे मोठे आव्हान असल्याचे, यावेळी बोलताना डॉ. संतोष सुपे यांनी सांगितले.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांना मोठे करण्याचे काम करताना ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात मोठे योगदान दिले. राजकीय, सामाजिक क्षेत्रात कर्तृत्वाचा ठसा उमटवला. आदिवासींमध्ये उच्चशिक्षणाची पायाभरणी त्यांनी केली अशी भावना यावेळी विभागीय आयुक्तकार्यालयातील दत्तात्रय लांघी यांनी व्यक्त केली.

आदिवासी समाजाचे स्थान आणि आवाज बळकट करण्याचं काम आणि आदिवासींना प्रगतीच्या रस्त्यावर आणण्यासाठी अहोरात्र झटणारा हा नेता हरपल्याने आदिवासी समाजाची खुप मोठी हानी झाल्याचे बाजार समितीचे माजी उपसभापती विठ्ठल वनघरे यांनी नमूद केले.

# हिवाळ्यातही टोमॅटोच्या लागवडी वाढल्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** टोमॅटोला सध्या चांगला बाजारभाव मिळत असल्याने, जुन्नर तालुक्यामध्ये सध्या हिवाळ्यातही टोमॅटोची लागवड शेतकरी करताना दिसत आहेत. टोमॅटोच्या एका क्रेटला सध्या पाचशे ते सहाशे रुपये बाजारभाव असून गावठी टोमॅटोला जास्त मागणी व बाजारभाव देखील चांगला आहे.

जुन्नर तालुक्यातील येडगाव, नगदवाडी उंब्रज, वैशाख खेडे, पिंपरी पेंढार, भोरवाडी, वडगाव कांदळी, शिरोली खुर्द तेजेवाडी या भागामध्ये सध्या हिवाळ्यातही टोमॅटोच्या बागा पाहायला मिळतात. टोमॅटोसाठी हे वातावरण पोषक असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे असून, टोमॅटोला बाजारभाव चांगले असल्याने तसेच हिवाळ्यामध्ये रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो म्हणून शेतकरी या पिकाकडे वळत असल्याचे सांगितले जाते.



अर्थात टोमॅटोला पोषक वातावरण असलेले बाजारभाव जरी चांगला असला तरी महागडी खते महागडी औषधे तसेच वारेमाप मजुरांचा खर्च या सगळ्याचा ताळमेळ बसवताना शेतकऱ्याला "नाकीनऊ" येतात. सुमारे दीड लाख रुपये खर्च टोमॅटोचा भाग सुरू होण्यापर्यंत येतो. टोमॅटोची एक रोप एक रुपयापेक्षा अधिक रकमेला घ्यावे लागत आहे. त्यामुळे टोमॅटो लागवडीचा एकरी खर्च अधिकचा येत असतो. टोमॅटोवर करपा व इतर रोगांचा प्रादुर्भाव नसला, तरी पांढरी माशीचा प्रादुर्भाव असल्याने व निसर्गाच्या लहरीपणामुळे हवामानाच्या बदलाचा फटका बसतो. त्याचा परिणाम फुले गळणे व फळ धारणेवर होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना औषध फवारणी करावी लागत आहे.

गावठी टोमॅटोची मागणी जास्त असल्याने व त्याला बाजारभाव चांगला असल्याने सध्या शेतकरी यश टोमॅटोची लागवड जास्त प्रमाणात करीत आहे.

## पिंपरी दुमाला संस्थेच्या अध्यक्षपदी शहाजी खळदकर बिनविरोध



**रांजणगाव गणपती :** पिंपरी दुमाला येथील पिंपरी दुमाला विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी शहाजी संतू खळदकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष रवींद्र बडदे यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदासाठी निवडणुक घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पी व्ही. हराळ यांनी काम पाहिले, तर सोसायटी सचिव दिलीप पुणेकर यांनी त्यांना सहाय्य केले. शहाजी खळदकर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या सभेला संचालक रवींद्र बडदे, कैलास खेडकर, प्रकाश चिखले, बबन चिखले, फक्कड खळदकर, साहेबराव चिखले, रायचद सोनवणे, बबन पोपट चिखले, संतोष थोरात, नंदा डोळस, संगीता चिखले, सुरेखा सोनावणे, कैलास शेलार, सतिश दुर्गे, आदि उपस्थित होते. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शेखर पाचुंदकर पाटील, रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्ष स्वाती पाचुंदकर पाटील, पिंपरी दुमाला ग्रामपंचायत सरपंच महेंद्र डोळस, उपसरपंच शरद खळदकर, माजी सरपंच दिलीप खळदकर, सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष सुनील सोनवणे, खजिनदार शेखर पाटेकर, उपाध्यक्ष कैलास पिंगळे, कार्याध्यक्ष अभिषेक शेळके, सचिव श्रीकांत सोनावणे, पोलीस पाटिल संतोष जाधव, शालेय शिक्षण समिति अध्यक्ष शशीकांत चिखले, उपाध्यक्ष विशाल खळदकर आदी उपस्थित होते.

## अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून बँकेची सव्वा कोटीची फसवणूक

# बनावट कागदपत्रांद्वारे घेतले सव्वा कोटींचे कर्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** गणेगाव दुमाला येथील काही दुग्धव्यावसायिकांनी बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने बँकेला बनावट कागदपत्रे सादर करुन सव्वा कोटी रुपयांचे कर्ज घेऊन बँकेची फसवणूक केल्याची घटना घडली असल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे बँकेचे, अधिकारी कर्मचारी यांसह कर्जदार व सह कर्जदार अशा तब्बल सत्तावीस जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

गणेगाव दुमाला येथील काहींनी २०२२ मध्ये फेडबँकेच्या मार्फत तब्बल एक कोटी सत्तावीस लाख एक्काहत्तर हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, सदर कर्जाचे हप्ते थकल्याने बँकेच्या वतीने नेमण्यात आलेल्या विविध एजन्सीच्या माध्यमातून सदर कर्जदारांची चौकशी करण्यात आली असता, कर्जदार व सहकर्जदार यांनी बनावट कागदपत्रे बँकेला देऊन तसेच बँकेच्या अधिकाऱ्यांनी त्या कागदपत्रांची तसेच मालमत्तेबाबत कोणतीही चौकशी न करता बँकेचे अधिकारी व कर्जदार आणि सहकर्जदार यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्रांद्वारे कर्ज मिळवून बँकेची फसवणूक केल्याचे समोर आले. याबाबत दिगंबर संदीपान फुले (३०, रा. गंगाकुज सोसायटी कळसगाव) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी बँकेशी संबंधित प्रीतम घोलप, शत्रुंजय साटणकर, अजिंक्य रसाळ, सागर लोढा, उत्तम तुकाराम नांदरे, सुनिता उत्तन नांदरे, राहुल दत्तात्रय शिंदे, दत्तोबा विष्णू शिंदे, प्रकाश मोहन धारकर, अक्षय प्रकाश धारकर, रवींद्र तात्याबा शिंदे, कल्पना रवींद्र शिंदे, प्रशांत अनिल गरुड, योगिता प्रशांत गरुड, गौरव बाळासाहेब नंदखिळे, बाळासाहेब रामचंद्र नंदखिळे, प्रतिभा संतोष कौंडे, संतोष बाळासाहेब कौंडे, ऋषिकेश बाबुराव शिंदे, सपना ऋषिकेश शिंदे, अक्षय अशोक गरुड, शोभा अशोक गरुड, शिवाजी ज्ञानदेव कौंडे, मंगल शिवाजी कौंडे सर्व (रा. गणेगाव दुमाला, ता. शिरुर) अजित जालिंदर गवळी व अश्विनी अजित गवळी (दोघे रा. बाभूळगाव, ता. शिरुर) आदेश साळुंखे (रा. इनामगाव ता. शिरुर) यांच्या विरुद्ध विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## जुन्नुर येथिल लोक न्यायालयात प्रकरणे निकाली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** जुन्नर मध्ये आयोजित लोक न्यायालयामध्ये ४,४२२ विविध प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली असून, ३ कोटी ४० लाख ८८ हजार रुपयांची यावेळी वसुली झाली आहे. मुंबई उच्च न्यायालय महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण तालुका विधी सेवा समिती यांनी जुन्नर न्यायालयामध्ये दिवाणी फौजदारी प्रलंबित तसेच दाखल पूर्व प्रकरणांचा निपटारा करण्याकरिता लोक न्यायालयाचे आयोजन केलेले होते. पक्षकार अशोक सूर्यवंशी यांच्या हस्ते उदघाट्न करण्यात आले.यावेळी दिवाणी न्यायाधीश नम्रता बिरादार, स्वप्ना घुले, गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, पोलीस निरीक्षक किरण अवचर, लहू थाटे आदी सह वकील, पक्षकार उपस्थित होते. जुन्नर न्यायालयातील दिवाणी फौजदारी ८७ प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली असून, दाखलपूर्व ४,३३५ प्रकरणे निकाली निघाल्याने एकूण ४,४२२ प्रकरणे निकाली निघाली आहेत. यातून ३ कोटी ४० लाख ७८ हजार रुपये तडजोडीने वसूल झाले.

## नारायणगाव येथे एकाचा खून

**नारायणगाव :** नारायणगाव येथील गावायत्रा मैदानात एका चाळीस वर्षे वयाच्या इसमचा डोक्यात दगड घालून खून झाल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. खून झालेल्या व्यक्तीचे नाव बाळू महादेव पोखरकर (वय ४० वर्षे, रा. खोडद, ता. जुन्नर) असून ही घटना शुक्रवारी बारा ते सकाळी सहा वाजण्याच्या समारास घडली. दरम्यान पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. नारायणगाव बस स्थानकाच्या बाजूला डोक्यात दगड घालून बाळू पोखरकर याचा खून झाल्याने परिसरामध्ये खळबळ उडाली असून, पोलिसांनी या खुन्याचा लवकर तपास करून अधिक सतर्क राहण्याची मागणी होत आहे.

# डिंभेच्या उजव्या कालव्याला पाणी

## आंबेगावसह शिरूर तालुक्यातील ५० हून अधिक गावांना फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** डिंभे धरण हुतात्मा बाबू गेनू जलाशय यातून डिंभा उजव्या कालव्याला पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील व शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील ५० गावांना याचा फायदा होणार आहे. सुकू लागलेल्या शेती पिकांना जीवनदान मिळणार असल्याने, या गावांतील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



आंबेगाव तालुक्यात असणारे डिंभे धरण हुतात्मा बाबू गेनू जलाशय व या जलाशयात साठणाऱ्या पाण्यावर पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर तालुक्यातील शेती पिकांना पाणीपुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड या तालुक्यांना व सोलापूर जिल्ह्यातील करमाळा इथपर्यंत या धरणाच्या पाण्यावर शेतीला पाणीपुरवठा केला जातो.

डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यातून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील डिंभे पासून तर खडकवाडी पर्यंत व शिरूर तालुक्यातील सविंदणे पासून सोनेसांगवी पर्यंतच्या गावांना पाणीपुरवठा होत असतो. त्याचप्रमाणे डाव्या कालव्यावर आंबेगाव तालुक्यातील व जुन्नर तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा होतो. तर डाव्या कालव्यातून हे पाणी येडगाव धरणात जाऊन तेथून ते अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यातील तालुक्यांनाही जात असते.

सध्या डिंभे धरणाच्या उजव्या कालव्या खालील गावांमध्ये शेती पिकांना पाणी टंचाई निर्माण झाली होती. अनेक शेती पिके पाण्याअभावी सुकू लागली होती. तळी, ओढे आटले होते. त्यामुळे या भागातील शेतकरी डिंभे धरणाच्या उजव्या कालव्याला पाणी सोडावे, अशी मागणी करत होते.

## तालुक्याला सर्वाधिक वेळ देण्यासाठी पद नाकारल्याची चर्चा

# वळसे पाटील यांना मंत्रीपद न मिळाल्याने नाराजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** राज्यातील अभ्यासू, ज्येष्ठ नेत्यांपैकी एक असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांना महायुती सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नसल्याने कार्यकर्त्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे. तालुक्यात प्रलंबित राहिलेल्या विकास कामांसाठी काम करायचे आहे. तसेच तालुक्यात सर्वाधिक वेळ देण्याच्या उद्देशाने वळसे पाटील यांनीच मंत्रीपद नाकारले, असे खासगीत बोलले जात आहे.



राज्यात जेव्हा जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता यायची त्यावेळेस वळसे पाटील यांना मंत्रीपद दिले जायचे, हे समीकरण गेली अनेक वर्षे होते. अनेकदा जी खाती अडचणीत असायची ती खाती वळसे पाटील यांना देण्यात आली होती. त्यामध्ये अर्थ खाते, ऊर्जा खाते, गृह खाते ही खाती वळसे पाटलांनी सांभाळून त्या ठिकाणी व्यवस्थित काम केले आहे. आतापर्यंत दिलीप वळसे पाटील यांनी विविध मंत्रिपदे भूषवली असून, त्यांना दिलेली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडत मंत्रीपदाला साजेल, असे काम केले आहे. मंत्र्याच्या शब्दाला किंमत असते, तालुक्याचे आमदाराला मंत्री पद मिळाले तर तालुक्यातील कामे लवकर मार्गी लागतात, मात्र यावेळी वळसे पाटील यांना मंत्रिपद न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

वळसे पाटील आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून आठ वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. मागील निवडणुकांमध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात मताधिक्य मिळाले. मात्र यावेळी त्यांच्या मताधिक्यात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे करूनही जनतेने म्हणावा असा कौल दिला नसल्याने या पुढील काळात आंबेगाव तालुक्यातच जनतेसाठी काम करायचे आहे, असा निश्चय त्यांनी केला आहे. तालुक्यात मुख्यत्वे करून असलेल्या पाण्याचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करायचे आहे. असे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे निकटवर्ती आणि शरद सहकारी बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शेठ शहा यांनी सांगितले.

**स्वत:हून मंत्रिपद नाकारले..**

● राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर महायुतीत समाविष्ट असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील आमदारांना मंत्रीपद मिळणार यामध्ये वळसे पाटलांचे नाव आघाडीवर होते. मात्र मंत्रिपद मिळाले तर राज्याची मोठी जबाबदारी मिळेल, त्यामुळे तालुक्याकडे लक्ष देता येणार नाही. तसेच काही दिवसांपूर्वी वळसे पाटील यांचा छोटासा अपघात झाल्यानंतर त्यांना डॉक्टरांनी प्रकृतीची काळजी घेण्यास सांगितले आहे. तसेच तब्येतीची काळजी घेण्याच्या डॉक्टरांच्या उद्देशाने त्यांनी स्वत:हून मंत्रिपद नाकारले, अशी चर्चा आहे.

#रा

## दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

# श्री क्षेत्र नारायणपूर येथे श्रीदत्त जयंती साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र नारायणपूर येथे श्री दत्त जन्म सोहळा उस्ताद साजरा करण्यात आला. मंदिरात देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले लाखो भाविक उपस्थित होते. मंदिरात केलेली विद्युत रोषणाई, फुलांची सजावट, दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जय घोष आणि फुलांची उधळण करत हजारो भाविकांच्या उपस्थितीत पोपट महाराज टेंबे स्वामी यांच्या अधिपत्याखाली शनिवारी सायंकाळी सात वाजून तीन मिनिटांनी मोठ्या उत्साहात दत्तजयंती सोहळा पार पडला.





विद्यमान आमदार विजय शिवतारे, माजी आमदार उल्हास पवार, अशोक टेकवडे, प्रांत अधिकारी वर्षा लांडगे, तात्यासाहेब बनसोडे, जालिंदर कामठे, डॉक्टर उमेश डोंगरे, प्रशांत पाटणे, मंदिर व्यवस्थापक क्षीरसागर, सरपंच प्रदीप बोरकर, अजित बोरकर, भारुडकार लक्ष्मण राजगुरू, भोर विभागीय पोलिस अधिकारी तानाजी बेर्डे, तहसीलदार विक्रम राजपूत, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, श्रीनाथ बोरकर, दादा भुजबळ यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीदत्त मंदिरात सकाळी नऊ तीस ते दहा आरती दुपारी एक ते तीन विविध भागातून येणारे दिंड्याची स्वागत करण्यात आले. दुपारी तीन ते चार भजन, चार ते पाच वाजता रुद्र अभिषेक झाला.

## नितीन राकेंना संघर्षरत्न पुरस्कार

**जुन्नर :** आंतरराष्ट्रीय जैन सोशल ग्रुप फेडरेशन महाराष्ट्र च्या वतीने जुन्नर मधील नितीन राकेचा यांना संघर्षरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले असून, १० पेक्षा जास्त देशातून व १५० हून अधिक पात्रांमधून त्यांची ही निवड करण्यात आलेली आहे. २०१८ पासून राकेचा यांच्या पत्नी गंभीर कॅन्सर आजाराशी सामना करीत असताना त्यांनी आपले आयुष्य पत्नीच्या उपचाराकरिता समर्पित केले. गेली सहा वर्ष या दोघांनी मिळून अनेक अडचणीशी सामना करीत संघर्षाची प्रेरणा इतर कॅन्सर ग्रस्त रुग्णांना दिली. आंतरराष्ट्रीय जैन सोशल ग्रुप ची स्थापना १९६५ मध्ये झालेली असून ३५ हजारपेक्षा अधिक जैन कुटुंबे तसेच ३६० गट भारतात कार्यरत आहेत.

# नीरा-पाडेगांव येथे श्रीदत्त जयंती उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुणे व सातारा जिल्ह्याच्या सीमेवरील नीरा नदी काठावरील नीरा-पाडेगांव येथील प्रसिद्ध दत्तमंदिरात दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा च्या जयघोषात शनिवारी (दि. १४) संध्याकाळी सहा वाजता दत्तजयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री दत्त सेवा मंडळाच्यावतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंतीनिमित्त मंदिरामध्ये आकर्षक फुलांची, पताकांची सजावट करुन विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दत्तजन्म सोहळ्यानंतर फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. दरम्यान, नीरा - पाडेगांव



परिसरातील नागरिकांना दत्तजयंतीनिमित्त दर्शनासाठी गर्दी केली होती.

पुरंदर व खंडाळा तालुक्याच्या सीमेवरील नीरा नदीच्या काठावरील नीरा - पाडेगांव येथील दत्तघाटावर दरवर्षीप्रमाणे दत्त जयंती सोहळ्यानिमित्त श्री दत्त सेवा मंडळ मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दत्त जयंतीनिमित्त येथे तीन दिवशीय दत्तचरित्र पारायण सुरू होते. शनिवार (दि. १४) मार्गशीर्ष पोर्णिमा श्री दत्त जयंतीनिमित्त पहाटे काकडा आरती, सकाळी सहा वाजता महाअभिषेक, श्री दत्त गायश्री व स्वामी गायत्री यज्ञ झाला. सायंकाळी 'श्री जन्मांचे' फुलाचे किर्तन झाले. नीरा भजनीमंडळाने किर्तनास साथ दिली. सायंकाळी सहाच्या दरम्यान पारंपारिक पद्धतीने दत्त महाराजांचा जन्मसोहळा पार पडला. श्रीदत्त जन्मा नंतर मंदिर परिसर गर्दीने फुलून गेला होता. दिवसभर ग्रामस्थांच्या वतीने भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिवसभरात भजन, किर्तन आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलावर्गाने दत्तजन्म सोहळ्यानिमित्त एकत्रित येऊन पाळणा, नाव ठेवणे असे विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पाडले. दत्तजयंती सोहळ्याच्या कार्यक्रमास ग्रामस्थांसह महिलावर्गाची मोठी उपस्थिती होती.

## जेजुरी पोलीस स्टेशनच्या वतीने दत्तजयंती साजरी

**जेजुरी :** जेजुरी पोलीस स्टेशनच्या आवारातील दत्त मंदिरात दत्त जयंती विविध धार्मिक उपक्रमांनी साजरी करण्यात आली. गेली ४९ वर्षांपासून जेजुरी पोलीस स्टेशनच्या श्रीदत्त मंदिरात दत्त जयंती साजरी केली जाते. दत्तजयंती निम्मित सकाळी महापूजा,अभिषेक करण्यात आला. सायंकाळी हभप सयाजी मोहरकर व विठ्ठल मंदिराच्या वतीने, भजन कीर्तन करून दत्त जयंती साजरी करण्यात आली. आरती करुन महिलांनी पाळणा सादर केला. यानंतर सुमारे चार हजार भाविकांना पोलीस स्टेशनच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली या उत्सवाचे आयोजन केले.

# नागापूरला श्रीदत्त जयंती उत्साहात संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** नागापूर (ता. आंबेगाव ) येथे श्रीदत्तजयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी देवजन्माच्या भाविकांनी गर्दी केली. हभप विक्रम महाराज काळे (आळंदी) यांचे देवजन्माचे व काल्याचे कीर्तन झाले.

येथिल पवित्र मीना नदीच्या तिरावर दत्त मंदिरात वैकुंठवासी हभप कुंडलिकराव मल्हारी निकम यांच्या प्रेरणेने अखंड हरिनाम सप्ताह सुरु झाला. बाजार समितीचे संचालक देवदत्त निकम यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीदत्त मंदिर देवस्थान ट्रस्टने सप्ताहाची परंपरा टिकवून ठेवली आहे. गेले आठ दिवस हभप ज्ञानेश्वर महाराज पिंगळे (पाबळ), आदिनाथ महाराज जुन्नरकर (खडकी), अर्जुन महाराज शिंदे (जुन्नर), जालिंदर महाराज करंडे (काठापूर), दत्तात्रय महाराज रुकारी



(कोल्हारवाडी) यांची सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कीर्तने झाली. त्यानंतर उपस्थित भाविकांना दररोज महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

शनिवारी दुपारी ४ वाजता श्रीदत्त गुरु पादुकांची टाळ - मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता हभप विक्रम महाराज काळे (आळंदी) यांचे देवजन्माचे कीर्तन झाले. महिला भाविकांनी यावेळी पाळणा गायला. रात्री सामुदायिक जागर झाला. रविवारी (दि. १५ ) सकाळी ९ वाजता हभप विक्रम महाराज काळे यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमांचे नियोजन संचालक देवदत्त निकम यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीदत्त देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी केले.

# मरकळ पंचलिंगमाळावर हरिनाम गजरात श्रीदत्त जन्मोत्सव साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्रीक्षेत्र मरकळ (मारूतीनगर ता. खेड) येथील जागृत, पुरातन पंचलिंगमाळावरील दत्तमंदिरात टाळ-मृदंगाच्या गजरात श्री दत्त जन्मोत्सवा निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात विश्वकर्मा महाराज पांचाळ यांचे जन्मोत्सव कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांनी हरिनाम गजरात श्री पंचलिंग गुरुदेव दत्त देवस्थान ट्रस्ट अध्यक्षा हभप ताईमाऊली महाराज यांचे मार्गदर्शनात श्री दत्त जन्मोत्सव सोहळा झाला. यावेळी परिसरातील भाविक, नागरिक यांनी श्रींचे दर्शनास मोठी गर्दी केली. दर्शन, महाप्रसाद मोठ्या उत्साहात वाटप करण्यात आला. या निमित्त





पंचक्रोशीतील भाविक, नागरिकांना हरिकीर्तन सेवेच्या श्रवणाची पर्वणी लाभली.

पंचलिंग गुरुदेव दत्त प्रतिष्ठानच्या वतीने हरिनाम सप्ताहाचे आयोजन जन्मोत्सव सोहळा म्हणून करण्यात आले. या सप्ताहात विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात स्मार्ट इंडिया हॅकेथॉन हार्डवेअर स्पर्धेचा समारोप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** येथील एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणेच्या संत श्री.ज्ञानेश्वर महाराज विश्वशांत डोम येथे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाची इनोवेशन सेल व एआयसीटीई द्वारे आयोजित राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२४ (एसआयएच) स्पर्धेच्या हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीनंतर झागराम००७ (कोळसा मंत्रालय ), वोल्ट एसेस (गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय), मावेरिक्स (गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय) या संघांनी नाविन्यपूर्ण कल्पनांसह प्रथम क्रमांकाला गवसणी घातली. तर द ऑलिम्पियन्स, पॅराडॉक्स इनोव्हेटर, रेल मॅनिक्स, निदान ७.० (सर्व गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय) यांनी आपापल्या गटात संयुक्तरित्या प्रथम क्रमांक पटकाविला.

एसआयएच-२०२४ या पाच दिवस चाललेल्या राष्ट्रीय हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीसाठी एमआयटी एडीटी विद्यापीठ हे निवड झालेले महाराष्ट्रातील एकमेव नोडल केंद्र होते. ज्यात, देशातील ३० राज्यांतील जसे की, आंध्र प्रदेश, बिहार, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, कर्नाटक, केरळ, जम्मू-काश्मिर, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यांतील एकूण २८ संघांची निवड झाली होती.

या स्पर्धेदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी केंद्रीय कोळसा मंत्रालय, रेल्वे व मेट्रो, गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयांसमोर असणाऱ्या विविध समस्यांवर पर्यायी उपाय देण्याचे काम केले. त्यामध्ये अंतिम फेरीत विविध स्तरांवर प्रत्येक गटातील विजेत्या संघाच्या नवकल्पनांचे परिक्षकांकडून मूल्यमापन करण्यात आले. या सर्व विजेत्या संघांच्या नवकल्पनांना भारत सरकारकडून प्रत्येकी एक लाख रूपयांचे पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचा समारोप समारंभ तथा बक्षीस वितरणासाठी पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, डसॉल्ट सिस्टिमचे कार्याध्यक्ष सलीम हुझेफा, भारत सरकारच्या इनोवेशन सेलचे संचालक योगेश ब्राम्हणकर, 'एआयसीटीई'चे उपसंचालक डॉ. प्रशांत खरात, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, नोडल अधिकारी डॉ.रेखा सुगंधी, इनोव्हेशन सेलचे नवोपक्रम अधिकारी अभिषेक रंजन, डॉ.निशांत टिकेकर, प्रा.सुरेश कापरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार यावेळी बोलताना म्हणाले, एसआयएच-२०२४ ही केवळ स्पर्धा नव्हती तर विद्यार्थ्यांच्या इनोवेशनचा एक मेळा होता. विद्यार्थ्यांनी आपल्या नवकल्पनेतून भारत सरकारच्या विविध मंत्रालयांसमोरील समस्यांवर सुचवलेले उपाय पाहताना, आपण विकसित भारताच्या संकल्पनेपासून आता फार दूर नाहीत याचा प्रत्यय आला. आपल्या देशातील युवा पीढी ही आपल्या विकसित होण्याच्या वाटचालीत अत्यंत महत्वाची भूमिका बजाविणार आहे, आणि अशा या युवकांना त्यांच्या नवकल्पना जगासमोर मांडण्यासाठी एसआयएच-२०२४ सारखे उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल भारत सरकारचे खूप अभिनंदन व आभार. तसेच, या स्पर्धेच्या आयोजनासाठी एमआयटी एडीटी विद्यापीठात प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या नेतृत्वाखाली सर्व कर्मचाऱ्यांनी घेतलेली मेहनतही उल्लेखनिय आहे.

# पारगाव पोलिस स्टेशनची कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव) येथील आदक वस्ती येथील जागृत दैवस्थान म्हणून येथील हनुमान मंदिर परिसरात ओळखले जाते. हे हनुमान मंदिर पश्चिमभीमूख असून या मंदिरात पाच महिन्यापूर्वी भूरट्या चोरट्यांनी मंदिरातील दोन पितळी समया व ॲप्लीफायर चोरून नेले होते. या संदर्भात ग्रामपंचायत सदस्य रवि ढगे पाटील व पै. विजय आदक यांनी पारगाव पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केली होती.

पारगाव पोलिस स्टेशनचे



सहाय्यक पोलिस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या मागदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेने तपास सुरू केला. या तपासाला यश आले व संबंधीत वस्तू जप्त करण्यात आल्या. या वस्तू परत मिळाव्यात, यासाठी रवि ढगे पाटील यांनी पारगाव पोलिस स्टेशनच्या माध्यमातून प्रथम वर्ग न्यायालय घोडेगाव यांच्याकडे अर्ज केला होता. नूकताच तो मंजूर झाला.

## जुन्नर तालुक्यात राजकीय घडामोडींना आला वेग

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मार्च महिन्यात?


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या असून या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाल्याने पंचायत समिती जिल्हा परिषद व नगरपालिका या निवडणुका लवकर घेण्याच्या मूडमध्ये राज्य सरकार असल्याने साधारण मार्च पर्यंत निवडणुका लागण्याची शक्यता असल्याने जुन्नर तालुक्यामध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षाचे नेते आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची बैठका घेऊन उमेदवारांची चाचपणी सुरु केली आहे.

दरम्यान विधानसभा



निवडणुकीमध्ये अपक्ष उमेदवार शरद सोनवणे विजय झाल्याने त्यांच्याकडून देखील या निवडणुकीबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिला असून ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख होते. शरद सोनवणे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये माहितीला साथ न देता अपक्ष उमेदवारी अर्ज भरल्याने त्यांची शिवसेना पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. परंतु ते



निवडून आल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना हेलिकॉप्टर पाठवूनमुंबईला बोलून घेतले होते.त्यामुळे त्यांचे सोनवणे आणि एकनाथ शिंदे यांचे सूत जुळले असून त्यांच्याकडूनही या निवडणुकी संदर्भात प्रयत्न सुरू राहणार आहेत.

राज्यात महायुतीचे सरकार असल्याने पंचायत समिती जिल्हा परिषद व महानगरपालिका या एकत्र लढवणार की प्रत्येक पक्ष वेगळे लढवणार? हे अद्याप ठरलेले नाही. त्यामुळे महायुतीतील प्रत्येक पक्ष आपापल्या परीनेउमेदवारांची चाचपणी करू लागला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी आमदार अतुल बेनके यांनी देखील पराभव नंतर कार्यकर्त्यांची एक बैठक घेऊन याबाबतचा आढावा घेतला आहे. तसेच आशाताई बुचके यांनी देखील भाजपाच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली आहे.

दरम्यान, महाविकासाकडीने देखील विधानसभेच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर चिंतनाची एक बैठक पार पडली आहे. या बैठकीत आपण महाविकास आघाडी म्हणून पुढे जाऊ, अशीही चर्चा झाली आहे. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या कार्यकर्त्यांची देखील दोन दिवसांपूर्वी जुन्नर या ठिकाणी बैठक पार पडली. उद्धव ठाकरे गट आणि शिवसेना या दोन पक्षाच्या कार्यकर्त्यांची मात्र स्वतंत्र बैठक अद्याप झालेली नाही.

जुन्नर तालुक्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना यांच्या फाटाफटीनंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसची ताकद आमदार अतुल बेनके यांचा पराभव झाला असला, तरी मजबूत आहे. कॉंग्रेसचे युवा नेते सत्यशील शेरकर शरद पवारांच्या सोबत गेल्याने त्या पक्षाची देखील ताकद वाढली आहे.

#रा

## Selected

### सहधर्मदाय आयुक्तांनी दिली कौतुकाची थाप



**जेजुरी :** श्री मार्तंड देवस्थान जेजुरी या ठिकाणी चंपाषष्ठीच्या उत्सवच्या वेळी विविध कार्यक्रमांतर्गत व दर्शनासाठी पुणे विभागाच्या सहधर्मदाय आयुक्त रजनी शिरसागर मल्हार गडावर श्री खंडेरायाच्या दर्शनासाठी आल्या होत्या. यावेळी गडावर पहिल्यांदाच झालेल्या महिलांकडून हरिद्राअर्चन महापूजा व महाआरती उपक्रम संपन्न झाला. याला महिला भगिनींकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. हा धार्मिक विधी खऱ्या अर्थाने भक्ती आणि एकात्मतेचा संदेश आहे असे गौरवोद्गार रजनी शिरसागर यांनी काढत कार्यक्रमाच्या आयोजिका श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा मनीषा खेडेकर यांचा सन्मान केला. याचे आयोजन जेजुरी देवसंस्थान, जयमल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठान व श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या वतीने करण्यात आले होते. भाविकांनी या उत्सवात भक्ती संगीताचा लाभ घेतला. खंडेरायाची संगीतमय सेवा दरवर्षी करण्यासाठी आपण पुढाकार घेवू श्री मार्तंड देवस्थान, जय मल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठान तसेच ज्योती घाटे, भार्गवी बडे, स्मिता वाघ , रचना झांजले, आरती उंद्रे, दिपाली खुडे , डॉ लीना बोरुडे, वर्षा थोरवे, माजी नगराध्यक्ष साधना दीडभाई, मनीषा वांजळे यांनी उपक्रमासाठी सहकारी केले असे मनीषा खेडेकर यांनी सांगितले.

### मेधाताई पाटकरांचा शेतकऱ्यांशी संवाद



**सासवड :** सामाजिक कार्यकर्त्या व जनआंदोलनाच्या राष्ट्रीय नेत्या मेधाताई पाटकर यांनी पुरंदर तालुक्यातील शेतकरी व एमआयटी पुणे महाविद्यालयातील अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांशी नदीपरिसंस्था संवर्धन आणि लोकांची भूमिका याविषयी ग्राम गौरव प्रतिष्ठान पाणी पंचायत, खळद येथे संवाद साधला. मेधाताई म्हणाल्या की, पावसाच्या पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे नियोजन केले पाहिजे. नदीच्या वाहत्या प्रवाहात आजूबाजूच्या गाव शहरातून नदीमध्ये सोडले जाणारे सांडपाणी, औद्योगिक सांडपाणी या सर्वांचा नदी परिसंस्थेवर होणारा परिणाम याचा विचार केला असता, पृथ्वीवरील एकूणच पर्यावरण सुरक्षित राहण्याच्या दृष्टिकोनातून नदीचे वाहते राहणे गरजेचे आहे. देशातील गोदावरी, नर्मदा, गंगा व कावेरी सारख्या सर्वच छोट्या मोठ्या नद्यांच्या पाण्याचा योग्य उपयोग केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. यावेळी नर्मदा नवनिर्माण अभियानच्या प्रणीतीताई, संतोष ललवानी तसेच ग्राम गौरव प्रतिष्ठान (पाणी पंचायत) च्या कार्यकारी विश्वस्त डॉ. सोनालीताई शिंदे, प्रसाद सेवेकरी, समन्वयक प्रशांत बोरावके, एमआयडी कॉलेजचे कोष्टी, अविनाश जाधव आदी उपस्थित होते.

### राजगुरुनगर येथे रक्तदान शिबीर उत्साहात; १५१ रक्तदात्यांचे रक्तदान



**शिरोली :** विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे स्वर्गीय कोठारी बंधू यांच्या पुण्यस्मरणानिमित्त राजगुरुनगर येथील सिद्धेश्र्वर मंगल कार्यालय येथे आयोजित रक्तदान शिबिरात एकूण १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुना सेरोलॉजिकल इन्स्टिटयूट ब्लड सेंटर पुणे या संस्थेचे डॉ.सुनील राठोड व डॉ.कल्पेश थोरात यांच्या पथकाने ब्लड संकलन केले. बजरंग दलाचे संयोजक अविष्कार सावंत, गणेश रौंधळ, जिल्हा मातृशक्ती संयोजिका वैशाली लांडगे यांची शिबिरास प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राजगुरुनगर शहर प्रखंड अध्यक्ष विरेंद्र भागवत, कडुस शाखा अध्यक्ष अनिल धायबर, मयुर सावंत, सहमंत्री नवनाथ पाचारणे, सुरेश माळी, संयोजक निखील थिगळे, आदेश शिंदे, अनुप गाडे, नितीन कोळेकर, प्रतिक जगदाळे, आदेश मुळे, मातृशक्ती संयोजिका सुरेखा डूबे सहसंयोजिका शालिनी गिलबिले, महेश चौधरी, सृष्टी गायकवाड, पायल जरे, श्रुती आरूडे, सिद्देश लोहोट, ओंकार शिंदे आदींनी प्रयत्न केले.

राष्ट्रसंचार मंगळवार, १७ डिसेंबर २०२४
# मानसी
●फॅशन ●किचन ●गृहसजावट ●सहजीवन ●टिप्स



बाहेरच्या परिस्थतीपेक्षा तुमच्या मनाची स्थिती ठरवणारे तुमचे विचार तुम्हाला जास्त दु:खी बनवतात. भावनांचं व्यवस्थापन कसं करायचं, हे शिकणं ही आजच्या काळाची गरज आहे. सतत दु:ख करत राहणे ही गोष्ट खरंच त्रासदायक असते. त्यातून काहीच चांगलं घडत नाही. त्यापेक्षा 'इटस् ओके' म्हणत पुढच्या मार्गाला लागणे श्रेयस्कर ठरते. कटू आठवणी आठवत, सतत नकारात्मक गोष्टी उगाळत राहिल्यास अशा विचारांच्या आवर्तनांचे पॅटर्न मनात म्हणजे अर्थातच मेंदूमध्ये तयार होतात. मग जराशी वाईट गोष्ट घडली की त्या पद्धतीचे विचार एकामागोमाग येऊन मनाची शांती नष्ट करतात. म्हणून जेव्हा असे होऊ लागेल, तेव्हाच मनाला ताबडतोब थांबवा. आणि म्हणा 'इटस् ओके!' झालं ते झालं. आता ते सोडून टाकून पुढे जाऊया.

## इटस् ओके !

आनंद तरंग

● सुजाता पेंडसे

आपल्या आजूबाजूला अनेक माणसं आपण पाहतो, त्यात विविध प्रकारची माणसं असतात. श्रीमंत, गरीब असे आर्थिक स्तर वेगवेगळे असतात. तसे स्वभाव, वृत्ती प्रवृत्तीही वेगळ्या असतात. मात्र एकसारख्या परिस्थतीतही वेगवेगळे वर्तन करणाऱ्या व्यक्ती पाहिल्या की आश्चर्य वाटते. हा फरक कशामुळे असतो तर त्यांच्या स्वतःच्या विचारप्रक्रियेमुळे एखाद्या प्रसंग, घटनेकडे कोण कसे पाहतो, त्याबद्दल काय विचार करतो, यावर आपली प्रतिक्रिया अवलंबून असते. काही माणसं नेहमी आनंदी असतात, तर काही नेहमी दु:खी असतात. काही सतत तक्रार करणारी असतात, तर काही शांत, संयमी असतात. हे फरक कशामुळे असतात, तर त्यांच्यातल्या 'थॉट प्रोसेस' मुळे असतात.

एक उदाहरण घेऊया. एका कंपनीने आपल्या नवीन निघालेल्या प्रॉडक्टची जाहिरात करण्यासाठी जाहिरात प्रतिनिधी नेमायचे ठरवले. तशी जाहिरात दिली. त्यासाठी अनेक अर्ज आले. प्रत्यक्ष मुलाखती झाल्या. त्यातून त्यांनी तीन कॅन्डिडेट निवडले. त्यातल्या दोघांना खूप आत्मविश्वास होता की आपला बायोडेटा बघून आपल्याला निवडले जाईल. शिवाय अनुभवही होताच. त्यात तिसरी एक मुलगी होती. जिचा हा पहिलाच इंटरव्यू होता. पण तिने बेधडक उत्तरे दिली होती. त्या कंपनीचे ते ब्युटी प्रॉडक्ट होते. इंटरव्यूमध्ये या मुलीला विचारले की 'हे प्रॉडक्ट एखाद्या ग्राहकाला घ्यावे असा आग्रह तुम्ही कसा कराल?' त्या मुलीने उत्तर दिले की 'त्या ग्राहकाला मी विचारेन, की तुम्ही कोणकोणते प्रॉडक्ट वापरता ? त्याहून या प्रॉडक्टची चांगली बाजू कोणती हे समजावून सांगेन. शिवाय मी त्याच्या वापरानंतर फॉलोअपही घेईन !' कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तिला विचारलं की, 'आम्ही तुला फॉलो अप घ्यायला कुठे सांगितलंय?' त्यावर ती म्हणाली 'तुमचं प्रॉडक्ट नवीन आहे. त्यामुळे ग्राहकांना विश्वास द्यायला हवा की आम्ही तुमच्यासोबत आहोत. तरच ते नवं काही घ्यायला तयार होतील ना!'

त्या मुलीचा हा ॲप्रोच कंपनीला खूपच आवडला. आणि त्यांनी तिला ताबडतोब कामावर घेतलं. त्यापूर्वीची अजून एक गोष्ट सांगायचीच राहिली. त्या अधिकाऱ्यांनी तिला विचारलं की 'तुला ही नोकरी मिळाली नाही तर तुझी रिॲक्शन काय असेल?' त्या मुलीने सांगीतलं की 'इटस ओके' ही माझी पहिली रिॲक्शन असेल !' त्या अधिकाऱ्यांनी पुन्हा विचारलं 'तुला दु:ख होणार नाही?' इतक्या चांगल्या कंपनीत जॉब मिळाला नाही म्हणून!' 'नाही. वाईट वाटेल, पण क्षणभरच. कारण 'इटस ओके' हा मूलमंत्र मी मानते. सतत दु:ख करत राहणे ही गोष्ट खरंच त्रासदायक असते. त्यातून काहीच चांगलं घडत नाही. त्यापेक्षा 'इटस् ओके' म्हणत पुढच्या मार्गाला लागणे मला आवडते!'

त्या मुलीच्या या जीवनाकडे बघण्याच्या दृष्टीकोनामुळे तिला चांगले काम मिळाले. हे उदाहरण सांगण्याचा हेतू हाच आहे की आपण दु:खी राहणं डिझर्व्ह करत नाही, तर आनंदी राहणं निवडून समाधानी होऊ शकतो. आता खरंच एखाद्याच्या आयुष्यात वाईट घटना घडत असतील तर तो कसा 'इट्स ओके' म्हणेल? हा प्रश्न पडेलच. पण एक नक्की



**प्रत्येकाच्या आयुष्यात ट्विस्टस येत राहतात. कधी कधी परिस्थिती नियंत्रणात राहते, परंतु बहुतांश वेळा जे घडन असतं, त्यावर तुमचं नियंत्रण राहात नाही. तेव्हा माणूस खूप दु:खी होतो. परंतु तुम्ही हे नेहमीच गृहित धरा की बाहेरच्या परिस्थितीचा रिमोट कंट्रोल तुमच्याकडे नाही, पण ती परिस्थती हाताळायची कशी, हे नक्की तुमच्या हातात आहे. तिथे लक्ष केंद्रित करायचं.**

आहे की बाहेरच्या परिस्थतीपेक्षा तुमच्या मनाची स्थिती ठरवणारे तुमचे विचार तुम्हाला जास्त दु:खी बनवतात. भावनांचं व्यवस्थापन कसं करायचं, हे शिकणं ही आजच्या काळाची गरज आहे.

आता हे व्यवस्थापन करायचं कसं, हे समजून घेऊ. सगळ्यात पहिली गोष्ट काय करायची तर 'नॉन शिंकिंग' झोनमध्ये स्वतःला न्यायचं. म्हणजे काय तर आत्ता तुमच्या आयुष्यात जे घडते आहे, ते वाईट किंवा नकोसे असेल तर तुम्ही नकळत त्याबद्दलचाच विचार सतत करत राहता. हे सतत विचार करणं, थांबवायचं. त्या विशिष्ट घटनेबद्दलचा कोणताही विचार मनात आणायचाच नाही. किंबहुना आपले लक्ष संपूर्णतः दुसऱ्याच गोष्टीवर केंद्रित करायचे. किंवा काहीही झालं तरी ते विचार येतच असतील तर त्याला थोडंसं अलिप्तपणे बघायचं, तटस्थपणे त्याचं निरीक्षण करायचं. यामुळे त्या भावनांच्या गुंत्यातून आपण थोडे बाजूला होऊन मोकळा श्वास घेऊ शकतो. दु:ख, वेदना ह्या प्रत्येकाच्याच आयुष्यात येत असतात. चढ-उतार येणं हे नैसर्गिक असतं, परंतु त्याला तुम्ही रिॲक्ट कसे करता यावर दु:खाची तीव्रता कमी-अधिक होत असते. कुणाचेही आयुष्य सरळ रेषे सारखे सतत समाधानी असत नाही. पण जेव्हा मनासारखी गोष्ट घडत नाही, तेव्हा साहजिकच अस्वस्थता येते. कधी कधी तर घटना घडते तेव्हा जे दु:ख होतं. त्याहून जास्त वेदना ते पुन:पुन्हा आठवण्यानं होत असतं. 'कोळसा उगाळावा तेवढा काळाच!' तसं अप्रिय घटना पुन्हा आठवत राहणं, दु:खी होणं असा क्रम चालू राहतो. हे टाळणंही आपल्या हातात असतं. 'ठीक आहे.

अमुक एक बॅड पॅच आपल्या आयुष्यात आला होता. तो पार पाडून पुढे आलो. संपलं. इटस ओके!' असं म्हणून त्या आठवणींचा हात सोडून द्यायचा आणि मन वर्तमानातल्या क्षणात गुंतवायचं. आता तुम्ही काय करत आहात, जे काम, नोकरी, व्यवसाय, एखादा छंद जोपासणं, किंवा अजूनही वेगवेगळं करत असाल, तिथे संपूर्ण लक्ष एकाग्र करायचं. असं केलं तर भूतकाळाचा दु:खी संसर्ग तुम्ही टाळू शकता. त्यामुळे मनाला खूप रिलीफ मिळतो. तुमच्या आयुष्यात सध्या काय काय चांगलं घडतंय, त्यावर फोकस करण्याने आनंदाची पातळी वाढते. आयुष्यात जमेच्या बाजू काय आहेत, हे तरी अक्षरशः दररोज प्रत्येकाने बघायलाच हवं. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करायलाच हवी. त्यामुळेही मनातल्या अस्वस्थतेला दूर ठेवता येतं.

तुम्हीच ठरवलं की 'दु:खी राहायचं, त्याच त्या गोष्टी पुनः पुन्हा उगाळत राहायचं. आपल्यावरच कशी वाईट वेळ आलीय, आपल्यावरच नेहमी अन्याय होतो. आपलंच नशीब फुटक आहे!' अशा पद्धतीचे विचार कराल तर हेच खरे आपले शत्रू आहेत. अशा विचारांच्या आवर्तनांचे पॅटर्न मनात म्हणजे अर्थातच मेंदूमध्ये तयार होतात. मग जराशी वाईट गोष्ट घडली की त्या पद्धतीचे विचार एकामागोमाग येऊन मनाची शांती नष्ट करतात. म्हणून जेव्हा असे होऊ लागेल, तेव्हाच मनाला ताबडतोब थांबवा. आणि म्हणा 'इटस् ओके!' झालं ते झालं. आता ते सोडून टाकून पुढे जाऊया.

●●●

■ सेलीब्रेटी कॉर्नर



## प्रिया बापटचं कौतुकवर्षाव

मराठी अभिनेत्री प्रिया बापटने नाटक, मालिका, चित्रपटांसह वेबसिरिजमध्ये देखील काम केले आहे. आपल्या अभिनयासह सौंदर्याने तिने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. अनेकांना माहीत नसेल पण प्रिया ही उत्तम गायिका देखील आहे.

असं सगळं असतानाच प्रिया तिच्या सोशल मीडियावरही बरीच सक्रिय असते. इतकच नव्हे तर तिच्या आयुष्यातल्या अनेक छोट्या गोष्टी या तिच्या चाहत्यांसोबत शेअर करते. असाच एक तिच्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव प्रियाने नुकताच शेअर केला आहे.

प्रियाने लोकप्रिय कॉन्सर्टमध्ये जबरदस्त परफॉर्मन्स केला आहे. सध्या तिचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून लोकांचा याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

प्रिया बापटने इंडियन ओशन या बँडच्या लाईव्ह कॉन्सर्टमध्ये गाणे गायले आहे.सोशल मीडियावर अपलोड केलेल्या या कॉन्सर्टच्या पोस्टला प्रियानं खास कॅप्शन दिलं आहे. प्रिया लिहिते की, आयुष्यात कायमच लक्षात राहिल अशी एक जादुई संध्याकाळ... इंडियन ओशनच्या कॉन्सर्टमध्ये मी लाईव्ह परफॉर्मन्स करेन अशी कधी कल्पनाही केली नव्हती. मी स्वत: माझ्या कॉलेजच्या दिवसापासून या बँडची चाहती आहे. त्यांचं संगीतही मी अगदी मनापासून जगले देखील आहे. पण आज याच बँडने माझं खूप छान स्वागतही केलं. त्यांच्याच ग्रीनरुममध्ये मला जाता आलं, बॅकस्टेजला भेटता आलं आणि त्यांच्यासोबत संगीतही जगता आलं. मी त्यांच्यासोबत माझं संगीतावरचं प्रेम शेअर केलंय, हे सगळं स्वप्नच वाटतंय.

पुढे प्रिया म्हणाली की, मला त्यांच्यासोबत स्टेजवर उभं राहता आलं, हा क्षण मी कधीच विसरणार नाही. त्यावर चाहत्यांनी मनभरुन डान्स करणं, त्यांनी चिअर करणं आणि आमच्यासोबत त्यांनी गाणं हे सगळं माझ्यासाठी जादुई होतं. हे सगळं बघताना खूप छान वाटलं. ३५ वर्ष त्यांचं म्युझिक अनेकांच्या काळजाला भिडलं. ती रात्र खरोखर लक्षात राहण्यासारखी होती. थँक यू.

●●●

■ स्मरण



## नलिनी जयवंत

नलिनी जयवंत या ज्येष्ठ अभिनेत्री होत्या. त्यांचे शिक्षण प्रार्थना समाजाच्या राममोहन शाळेत झाले. लहानपणी त्यांचा डान्स हे राममोहन शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे सर्वात मोठे आकर्षण असे. नामांकित लोक तो पाहायला येत. तिच्या या डान्सला भाळूनच वीरेन्द्र देसाईंनी केवळ चौदा वर्षांच्या नलिनीला सिनेमात काम करण्याची ऑफर दिली. नलिनी आणि विजया जयवंत (मेहता) विद्यार्थी भवनमध्ये राहात होत्या. 'राधिका' या १९४१ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटापासून आपल्या कारकिर्दिला सुरुवात करणाऱ्या नलिनी यांनी त्यांच्या अप्रतिम अभिनयाच्या जोरावर हिंदी चित्रपटसृष्टीत काही वर्षांतच स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले होते. कसदार अभिनयामुळे त्यांना अशोक कुमार, देवानंद आणि दिलीपकुमारसारख्या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसोबत त्यांना काम करता आले. दिलीपकुमार, नर्गीस यांच्यासोबत 'अनोखा प्यार'मध्ये त्यांनी केलेल्या अभिनयाने चित्रपट रसिकांची वाहवा मिळविली होती. नलिनी यांनी निर्देशक वीरेन्द्र देसाई यांच्याबरोबर १९४० मध्ये विवाह केला.

फिल्मफेअरने १९५० मध्ये घेतलेल्या एका सर्वेक्षणात त्या काळात हिंदी सिनेसृष्टीत असलेल्या सर्वात सुंदर नायिकेचा मान दिला होता. १९८३ मध्ये 'नास्तिक' चित्रपटात अमिताभ बचनच्या आईच्या भूमिकेत त्यांचे रूपेरी पडद्यावर अखेरचे दर्शन झाले. त्यांचे २० डिसेंबर २०१० रोजी निधन झाले. ●●●

## संगोपनाचे आव्हान आणि आई

आई म्हणून मुलाचे संगोपन करणे हे एक मोठे आव्हान असते आणि हे आव्हान पूर्ण करण्यात आईच्या आयुष्याचा मोठा भाग जातो. यादरम्यान आईच्या संयमाची सत्वपरीक्षा असते. लहान मुलं तांडव करतात, हट्टी असतात आणि अनेक चुका करतात, अशा परिस्थितीत आईला धीर न सोडता त्यांना सांभाळणे गरजेचे असते. मुले मोठी होईपर्यंत आईचा बहुतेक वेळ त्यांची काळजी घेण्यात जातो. पण, याचा अर्थ असा नाही की तुम्ही स्वतःकडे अजिबात लक्ष देऊ नका. कारण आई असण्यासोबतच तुम्ही एक माणूस देखील आहात, त्यामुळे तुमचे छंद जोपासा आणि तुमच्या दैनंदिन जीवनात स्वत:साठी वेळ काढा.

अनेक वेळा आई थकून जाते कारण मुलांना सांभळताना खूप काम करावे लागते. त्यामुळे याबाबतीत तुमच्या कुटुंबीयांची किंवा मित्रमंडळींची मदत घेणे ही वाईट गोष्ट नाही. एकमेकांच्या मदतीनेच कुटुंबे टिकतात. त्यामुळे जेव्हा जेव्हा गरज असेल तेव्हा कामाचे ओझं स्वत:वर न घेता तुम्ही कुटुंब आणि मित्रमंडळींची, शेजाऱ्यांची मदत घेऊ शकता.

एक गोष्ट सदैव लक्षात ठेवा की, जगात कोणीही परिपूर्ण नाही. तुमच्याही पालकत्वात चुका होऊ शकतात. या गोष्टी मनावर घेण्याऐवजी त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि त्यातून धडा घ्यावा.

आपल्या मुलांना चांगली संगत देणे हे आईचे कर्तव्य आहे. तुम्ही ज्या लोकांमध्ये राहता त्यांच्याकडूनच तुमचे मूलही शिकेल. आपल्या मुलांबरोबर वेळ घालवावा आणि त्यांच्या




वेळेचे योग्य व्यवस्थापन करा. यातून तुमचे मूल चांगले जीवन जगण्यासाठी नवीन गोष्टी शिकतील. मूल काही शिकत नसेल किंवा ते खूप त्रास देत असेल, तर फार कठोर वागण्याची गरज नाही. मुलं निरागस असतात, एक क्षण रडतात आणि दुसऱ्या क्षणी हसतात. त्यांच्याशी कधी प्रेमाने वागा, समजावून सांगा आणि मूल किती आनंदी राहते ते पहा.

कोणत्याही कामासाठी मुलाला काहीही देण्याची अट नसावी. ते काम करण्यासाठी त्याला योग्य प्रकारे प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करा. पण त्याला काही काम केले तरच बक्षीस मिळेल, अशा अटी घालू नयेत. तसेच त्याला कोणत्याही गोष्टीचे आमिष दाखवून कोणतेही काम करण्यास भाग पाडू नये. असे केल्याने, तुमचे मूल प्रत्येक कामात लोभाला जास्त महत्त्व देईल. आणि जीवनात पुढे जाण्यात अडचणी येतील. ●●●

## कोल्ड क्रीम वापरताना...

हिवाळा सुरू झाला कधी आणि गारठ्याची तीव्रता वाढली कधी हे यंदा समजलेही नाही. उन्हाळ्याप्रमाणेच थंडीचाही आपल्या त्वचेवर परिणाम होत असतो. त्यामुळे या ऋतूमध्ये आपल्या त्वचेची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. या दिवसांमध्ये थंड वाऱ्यामुळे त्वचा कोरडी आणि निर्जीव होते. अशा परिस्थितीत कोल्ड क्रीम वापरणे गरजेचे ठरते. बाजारात अनेक प्रकारची कोल्ड क्रीम्स उपलब्ध आहेत, पण त्यातून योग्य कोल्डक्रीम निवडणे आवश्यक आहे. अन्यथा योग्य परिणाम तर दिसणार नाहीतच, शिवाय अपाय होण्याचाही धोका असतो. हे टाळण्यासाठी काही टिप्स :

त्वचेच्या प्रकारावर आधारित क्रीम निवडा : कोल्ड क्रीम खरेदी करण्यापूर्वी तुमच्या त्वचेचा प्रकार ओळखणे फार महत्वाचे आहे. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर तेलाचे प्रमाण कमी असलेले कोल्ड



क्रीम निवडा. त्वचा कोरडी असेल तर मॉइश्चरायझिंग गुणधर्मांनी युक्त कोल्ड क्रीम निवडा. सामान्य त्वचा असल्यास संतुलित गुणधर्मांसह क्रीम वापरावी.

नैसर्गिक घटकांची तपासणी करा : कोल्ड क्रीम खरेदी करताना त्यातील घटक जरूर तपासा. बदाम तेल, खोबरेल तेल, कोरफड, मध इत्यादी नैसर्गिक घटक असलेल्या क्रीमला प्राधान्य द्या.

त्वचेवर चाचणी : क्रीम विकत घेण्यापूर्वी त्याने त्याची त्वचेवर चाचणी घ्यावी. आपल्या मनगटावर किंवा कानाच्या मागे कोल्ड क्रीम लावून पहा. कोणत्याही प्रकारचे रॅशेस आले नाहीत किंवा ॲलर्जी जाणवत नसेल तरच ती क्रीम वापरावी.

ब्रँड आणि गुणवत्ता : कोल्ड क्रीमचा योग्य ब्रँड निवडणे देखील खूप महत्वाचे आहे. नेहमी विश्वासार्ह आणि लोकप्रिय ब्रँडची क्रीम खरेदी करा. यासाठी थोडे जास्त पैसे द्यावे लागले तरी त्वचेसाठी ते गरजेचे असते. अन्यथा, खराब दर्जाची क्रीम त्वचेला हानी पोहोचवू शकतात. ब्रँडेड उत्पादने प्रमाणित गुणवत्तेची असतात आणि सर्वसाधारणपणे त्वचेसाठी सुरक्षित असतात.

सुगंध आणि पोतकडे लक्ष द्या : कोल्ड क्रीमचा सुगंध आणि पोत याही लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत. अत्यंत तीव्र सुगंध असलेली क्रीम वापरणे टाळा. कारण त्यामुळे ॲलर्जी होऊ शकते. क्रीमचा पोत देखील असा असावा की ते त्वचेत सहज शोषले जाईल आणि चिकटपणा जाणवणार नाही.

अशा सुयोग्य कोल्ड क्रीमचा वापर केल्यास हिवाळ्यातही तुमची त्वचा मऊ, आणि निरोगी राहील. तसेच त्वचेचे थंडीच्या दुष्परिणामांपासून संरक्षण होईल.

●●●

## हेअर क्लिप्सच्या बहारदार दुनियेत...


कोणत्याही स्त्रीच्या सौंदर्यात केशसंभार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या केशसंभाराचे सौंदर्य खुलवण्याचे काम हेअर क्लिप करतात. हेअर क्लिपचा वापर केवळ केस बांधण्यासाठीच केला जात नाही तर त्या संपूर्ण केशरचनाला स्टायलिश लुक देतात. आजकाल बाजारात अनेक प्रकारच्या सुंदर आणि डिझायनर हेअर क्लिप उपलब्ध आहेत, ज्या प्रत्येक वयोगटातील महिलांच्या आवडीनिवडी आणि व्यक्तिमत्त्वानुसार परिपूर्ण आहेत.



**हेअर क्लिप विथ फ्लॉवर :** फुलांची रचना असणाऱ्या या क्लिपमुळे केस सुंदर आणि आकर्षक दिसण्यास मदत होते. सर्व वयोगटातील स्त्रिया या क्लिपचा वाप करु शकतात. कोणत्याही पार्टीत, लग्नाच्या फंक्शनमध्ये किंवा उत्सवात फ्लॉवर हेअर क्लिप सहज कॅरी करता येतात. पारंपारिक पोशाख जसे की साडी, लेहेंगा किंवा अगदी अनारकली सूटवरही हे क्लिप वापरता येतात. फ्लॉवर क्लिपचा फायदा असा आहे की ते लावल्यानंतर अन्य हेअर ॲक्सेसरीजची गरज भासत नाही.

**कलर स्टोन क्लिप :** रंगीबेरंगी खड्यांच्या रचनेने सजवलेल्या या हेअर क्लिपमुळे खुले केस आकर्षक दिसतात. आजकाल, किशोरवयीन मुलींमध्ये या क्लिप ट्रेंडमध्ये आहेत. केस लहान असोत किंवा लांब, या हेअर क्लिपमुळे सुंदर आणि आकर्षक लूक मिळतो.

**टिक-टॅक हेअर क्लिप :** या हेअर क्लिप सर्वात जास्त कॅरी केल्या जातात. कारण त्या केसांचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करतात. रोजच्या वापरासाठी टिक-टॅक हेअर क्लिप सर्वात उपयुक्त ठरतात. कारण त्या वापरण्यास अतिशय सोप्या असतात आणि सर्व प्रकारच्या केशरचनांना अनुकूल असतात. केस बाजूला पिन करायचे असतील किंवा पोनीटेलमध्ये थोडी चमक आणायची असेल, टिक-टॅक हेअर क्लिप आवर्जून वापराव्यात. किशोरवयीन मुली त्यांना महाविद्यालयात किंवा कोणत्याही प्रासंगिक बाहेर घेऊन जाऊ शकतात.



टिकटॉक क्लिपमध्ये विविध डिझाईन्स आणि विविध आकाराचे पर्यायही उपलब्ध आहेत. या क्लिप लहान मुलींसाठी देखील खूप सुंदर दिसतात. मुलांच्या वाढदिवसाच्या मेजवानीला, कौटुंबिक भेटीगाठी किंवा कोणत्याही विशेष प्रसंगी या हेअर क्लिप वापरता येतात. बाजारात अनेक प्रकारच्या डिझायनर टिक-टॅक क्लिप उपलब्ध आहेत, ज्यावर फुले, मणी आणि कार्टून कॅरेक्टर देखील उपलब्ध आहेत, ज्यामुळे मुलींचे सौंदर्य खुलवण्यास मदत होते.

**पर्ल मेटल हेअर क्लिप :** वेगवेगळ्या आकारात आणि डिझाईन्समध्ये उपलब्ध असलेल्या पर्ल मेटल हेअर क्लिप जीन्स-टॉप, ट्राउजर-कुर्तीसोबत केसांमध्ये खुलून दिसतात. याशिवाय व्हाईट-गोल्डर हेअर क्लिप बनमध्ये वापरता येतील. हेअर क्लिपमधील बटरफ्लाय डिझाइन सध्या ट्रेंडमध्ये आहेत. यामुळे केसांच्या सौंदर्याला नॅचरल लूक मिळतो. कोणत्याही पार्टीत किंवा फंक्शनमध्ये तुम्ही या केसांवर कॅरी करू शकता. ●●●

## फेस योगाने घालवा काळी वर्तुळे

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि प्रदूषित वातावरणामुळे महिलांना त्यांच्या त्वचा आणि केसांशी संबंधित समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विशेषत: अनेक महिलांना मध्यम वयात किंवा त्याआधीही डोळ्यांखाली काळी वर्तुळे येण्याच्या समस्येने त्रस्त केलेले दिसते. ही समस्या सामान्यतः तेव्हा उद्भवते जेव्हा तुमची जीवनशैली योग्य नसते, पुरेशी झोप मिळत नाही किंवा खूप ताणतणाव असतो.

डोळ्यांखाली आलेली ही काळी वर्तुळे सौंदर्यासाठी बाधक ठरतात. साहजिकच, तरुणी-स्त्रिया ही वर्तुळे कमी करण्यासाठी अनेक प्रकारची उत्पादने वापरता. पण यातून काही फायदा होत नसेल तर फेस योगा करुन पहा. फेस योगा केल्याने तुमची त्वचा सैल पडण्याची प्रक्रिया खंडित होते. तसेच डोळ्यांखालील काळी वर्तुळे आणि सूज दूर होईल. फेस योगाचे वैशिष्ट्य म्हणजे तुम्ही ऑफिसमध्ये किंवा प्रवासात कुठेही करू शकता. आय टॅपिंग योग : या व्यायामामुळे डोळ्यांतील सूज दूर होते आणि डोळ्यांखालील काळी वर्तुळेही कमी होतात. हा व्यायाम तुम्ही दिवसातून तीन वेळा करू शकता. तुम्ही ऑफिसमध्ये असाल किंवा घरी असाल किंवा प्रवासात असाल, यामध्ये तुमच्या डोळ्याखाली दोन बोटांनी टॅप करा. म्हणजेच दोन्ही डोळे बंद करून त्याखाली बोटांनी दाबून मसाज करा. अंडर आय बॅलन्स योग : हा व्यायाम केल्याने डोळ्यांखालील रक्तप्रवाह वाढतो आणि स्नायू मजबूत बनतात. यासाठी तुमच्या हाताच्या तर्जनी आणि मधल्या बोटांनी डोळ्यांखाली वर्तुळाकार मसाज करा. रोज किमान १० मिनिटे ही प्रक्रिया करा.

आय लिफ्ट योग : हा फेस योगा केल्याने डोळ्यांखालील स्नायू मजबूत राहतील आणि त्वचा टोन्ड राहील. तसेच रक्तप्रवाहही चांगला राहील. हा व्यायाम करण्यासाठी, प्रथम आपल्या हाताने प्रत्येक डोळा झाकून घ्या. यानंतर, दुसरा डोळा झाकून कोपऱ्यातून दोन बोटांनी खेचा आणि डोळ्यांच्या बाहुल्या वरच्या दिशेने हलवा आणि नंतर ३० सेकंद थांबा. हे ५ ते १० वेळा करा.

स्लॅपिंग पियानो योग : स्लॅपिंग पियानो योगा केल्याने डोळ्यांखालील काळी वर्तुळे आणि डोळ्यांखालील सूज तर कमी होईलच पण मुरुमांची समस्याही दूर होते. हे करण्यासाठी, तुमची चार बोटे पियानोप्रमाणे चेहऱ्यावर चालवत राहा. हा व्यायाम डोळ्याभोवती देखील करा. तुम्ही ही क्रिया दिवसातून पाच-सहा वेळा करू शकता. ●●●



# SPORTS



"मी समानतेवर विश्वास ठेवते. मी फक्त बुमराहच्या यशाबद्दल आणि त्याच्या कामगिरीबद्दल बोलत होती. मी कदाचित त्यासाठी चुकीचा शब्द वापरला असेल, ज्यासाठी मी माफी मागते." — इसा गुहा इंग्लंडची माजी वेगवान गोलंदाज

"तुम्ही माझ्या फलंदाजीच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहात. तू एक काम कर गुगलवर सर्च कर की कसोचीच्या एका षटकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम कोणाच्या नावावर आहे" — जसप्रीत बुमराह भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज



## गाबा टेस्ट : पावसामुळे तिसऱ्या दिवशी फक्त ३३ ओव्हर

# पावसाचा लंपडाव अन् टीम इंडियाची दैना...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पहिल्या डावात भारत ५१/४, राहुल-रोहित नाबाद परतले

ऑस्ट्रेलिया ३९४ धावांनी पुढे





**ब्रिस्बेन :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात द गॅबा स्टेडियमवर सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात पावसामुळे बराच व्यत्यय आला आहे. पहिल्या दिवसातही पावसामुळे केवळ १३.२ षटकांचा खेळ झाला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मात्र पूर्ण दिवस खेळ झाला.

परंतु, तिसऱ्या दिवशी पुन्हा पावसाने खोडा घातला आहे. सुरुवातीपासून सातत्याने पाऊस ये-जा करत असल्याने बराचवेळा व्यत्यय आला. पण त्यातही भारताचा पहिला डाव सुरु असताना १४.१ षटकानंतर पावसाला पुन्हा सुरुवात झाली. त्यानंतर मात्र दोन तासांहून अधिकवेळ पावसाचा व्यत्यय आला.

अखेर या व्यत्ययानंतर पुन्हा खेळ सुरू झाला, पण साधारण तीनच षटकांच्या खेळानंतर पुन्हा खेळ थांबला. अखेर सामनाधिकऱ्यांनी तिसऱ्या दिवसाचा खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा भारताने ४ बाद ५१ धावा केल्या आहेत.

तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाने १०२ षटके आणि ७ बाद ४०५ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली होती. यावेळी ॲलेक्स कॅरे आणि मिचेल स्टार्क खेळत होते. पण १०६ व्या षटकात मिचेल स्टार्कला जसप्रीत बुमराहने १८ धावांवर माघारी धाडले. पण तो बाद झाल्यानंतरही कॅरेला नॅथन लायनने चांगली साथ दिली होती.

लायन तब्बल ३० चेंडू खेळला. पण त्याला ११७ व्या षटकात मोहम्मद सिराजने त्रिफळाचीत केले. त्याच्या पुढच्याच षटकात अर्धशतक झळकावलेला कॅरे बाद झाला. त्याला आकाश दीपने बाद करत ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ११७.१ षटकात ४४५ धावांवर संपवला. कॅरेने ८८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ७० धावांची खेळी केली.

तत्पुर्वी या डावात ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेड आणि स्टीव्ह स्मिथ यांनी शतके झळकावली आहे. ट्रॅव्हिस हेडने १६० चेंडूत १५२ धावांची खेळी केली, ज्यात त्याने १८ चौकार ठोकले. तसेच स्मिथने १९० चेंडूत १०१ धावा केल्या. त्याने १२ चौकार मारले. या दोघांनाही बुमराहनेच बाद केले.

भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या, तसेच मोहम्मद सिराजने २ विकेट्स घेतल्या, तर आकाश दीप आणि नितीश रेड्डी यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## एकदिवसीय रॅपिड बुद्धीबळ

# सहाव्या फेरीअखेर पाच खेळाडू आघाडीवर



■ राष्ट्रै संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जेकेज एक्सलंस चेस अकादमी यांच्या वतीने आयोजित, फिडे, एआयसीएफ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) व पुणे जिल्हा बुद्धीबळ सर्कल (पीडीसीसी)यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या दुसऱ्या जेकेज एक्सलंस चेस अकादमी एकदिवसीय रॅपिड बुद्धीबळ स्पर्धेत मित्रभा गुहा, संकल्प गुप्ता, अर्घ्यदीप दास, राम परब, मोहंमद रीयान या खेळाडूंनी 6 गुणांसह संयुक्तरीत्या आघाडी मिळवली आहे.

सिंहगड रोड येथील गुलमोहर बँकवेट्स हॉल, अभिरुची मॉल या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत सहाव्या फेरीत पहिल्या पटावर पश्चिम बंगालच्या मित्रभा गुहाने महाराष्ट्राच्या गौरांग बागवेचा पराभव करून 6गुण प्राप्त केले. दुसऱ्या पटावर महाराष्ट्राच्या संकल्प गुप्ताने निखिल दिक्षितचा ,तर पश्चिम बंगालच्या अर्घ्यदीप दासने विक्रमादित्य कुलकर्णीचा पराभव करून 6 गुणांची कमाई केली. महाराष्ट्राच्या राम परबने रेल्वेच्या हिमल गुसेनचा तर, बिहारच्या मोहंमद रीयान याने महाराष्ट्राच्या अखिलेश नागरेचा पराभव करून 6 गुण मिळवले. याआधी स्पर्धेचे उद्‌घाटन एरोटेक ग्रुपचे संस्थापक किरण कुलकर्णी, कोटीभास्कर इन्फ्राचे संचालक चिदंबर कोटीभास्कर, अभिरुचीचे मालक यशोधन भिडे, एमसीएचे प्रवीण ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

# ब्रिलियंटस स्पोर्टस अकादमी, योगेश इलेव्हन संघांचे विजय


आर्य कुमावत


हरीश बाकले

**पुणे :** नीलेश भिंताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एन.बी. करंडक 2024(17 वर्षाखालील) क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत ब्रिलियंटस स्पोर्टस अकादमी, योगेश इलेव्हन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सुरुवात केली. सनी स्पोर्ट्‌स, हांडेवाडी व ब्रिलियंट क्रिकेट क्रीडांगणा येवलेवाडी या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत आर्य कुमाव त(नाबाद 118धावा) याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर ब्रिलियंटस स्पोर्टस अकादमी संघाने कोद्रे फार्म संघाचा 275 धावांनी धुव्वा उडवत शानदार सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यात हरीश बाकले (3-14) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने केपी क्रिकेट क्लब संघाचा 7 गडी राखून पराभव केला.

# वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीचा सलग दुसरा विजय


ध्रुव पवार


अमन माने

## एके स्पोटर्स संघाची विजयी सलामी !!

**पुणे :** ट्रेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमी सलग दुसरा विजय मिळवला. एके स्पोटर्स संघाने पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली.सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अमन माने याने केलेल्या अष्टपैलु खेळीच्या जोरावर एके स्पोटर्स ॲकॅडमीने पुणे क्रिकेट ॲकॅडमीचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना पुणे क्रिकेट ॲकॅडमीने २५ षटकात १४९ धावांचे आव्हान उभे केले. यामध्ये विराट भिसे याने ५८ धावांची खेळी केली. नील रूद्रभाते याने १५ धावांमध्ये २ गडी बाद केले. हे लक्ष्य एके स्पोटर्स ॲकॅडमीने २४.५ षटकात व ७ गडी गमावून पूर्ण केले. अमन माने (३९ धावा) आणि प्रतिक पटेल (२६ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला.

# थासापोर्न नाकलो व बुन्यावी थामचैवत यांना विजेतेपद



**पुणे :** ओपन एमएसएलटीए - एसडीएलटीए 25हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये थायलंडच्या बुन्यावी थामचैवत हीने दुहेरी गटातील विजेतेपदाबरोबरच एकेरीत अंतिम फेरीत प्रवेश करत दुहेरी मुकुटाकडे वाटचाल केली आहे. दुहेरीत थायलंडच्या थासापोर्न नाकलो व बुन्यावी थामचैवत यांनी विजेतेपद संपादन केले. स्पर्धेत एकेरीत उपांत्य फेरीत पहिल्या लढतीत भारताच्या पाचव्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने गतवर्षीच्या विजेत्या भारताच्या दुसऱ्या मानांकित सहजा यमलापल्लीचा 6-3, 6-1 असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या उपांत्य फेरीत थायलंडच्या बुन्यावी थामचैवतने कझाकस्तानच्या चौथ्या मानांकित झिबेक कुलंबायेवाचा 6-1, 6-4 असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

# वॉटर पोलो



## कटककर करंडक

# मिस्टिक रायगड ९६, इंडियन एअर फोर्स, इंडियन नेव्ही संघांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेक्कन जिमखाना यांच्या तर्फे आयोजित कटककर करंडक अखिल भारतीय आंतर क्लब वॉटर पोलो स्पर्धेत साखळी फेरीत मिस्टिक रायगड 96, इंडियन एअर फोर्स, इंडियन नेव्ही, कलकत्ता स्पोर्टस असोसिएशन (सीएसए) या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

डेक्कन जिमखाना टिळक तलाव येथे सुरु असलेल्या

या स्पर्धेत साखळी फेरीत मोंजिथ एम एम 4, सिबिन वर्गीस 3, वेंदात 1, लाल कृष्णा 1, नितिश 1, प्रवीण जी. के. 1, श्रीजीत एस के. 1 यांच्या कामगिरीच्या जोरावर इंडियन एअरफोर्स संघाने रिलायन्स अ संघाचा 13-6 असा पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. दुसऱ्या सामन्यात इंडियन नेव्ही संघाने खिद्दरपूर कोलकत्ता संघाचा 12-7 असा पराभव केला. विजयी संघाकडून अनंथू जीएस 3, भागेश कुथे 3, अंकित प्रसाद 3, आनंद एम एस 2, वैभव कुथे 1 यांनी सुरेख कामगिरी केली.

अन्य लढतीत मिस्टिक रायगड 96 संघाने अमरावती संघाचा 14-3 असा सहज पराभव केला. मिस्टिक रायगड 96 संघाकडून भूषण पाटील 3, मनिष खोमणे 3, श्रेयस वैद्य 2, करण शुक्ला 2, अश्विनीकुमार कुंडे 2, अर्जून कावळे 1, सारंग वैद्य 1 यांनी सुरेख कामगिरी केली. सेंट्रल रेल्वे संघाने इंडो तिबेट बॉर्डर पोलिस(आयटीबीपी) संघावर 17-7 असा विजय मिळवला. साऊथ ईस्टर्न रेल्वे संघाने डेक्कन जिमखाना संघाला 9-6 असे पराभूत केले.

# अनप्रिडीक्टेबल इलेव्हन, ग्रीनपार्क क्लब संघांमध्ये विजेतेपदासाठी लढत !!


प्रथम खांडवे


केदार डी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमएआर लीग' अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेच्या बाद फेरीमध्ये अनप्रिडीक्टेबल इलेव्हन आणि ग्रीनपार्क क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला.

लोहगांव येथील रन-३६० टर्फ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या बाद (प्ले ऑफ) फेरीच्या क्वालीफायर सामनात केदार डी. याने केलेल्या कामगिरीमुळे अनप्रिडीक्टेबल इलेव्हनने वॉरीयर टायटन क्लबचा ९ गडी राखून सहज पराभव केला आणि अंतिम फेरी गाठली. पहिल्यांदा खेळताना वॉरीयर टायटन क्लबने ५२ धावांचे आव्हान उभे केले. अनप्रिडीक्टेबल इलेव्हनच्या गौरव पलहेरकर (२९ धावा) आणि केदार जोशी (१८ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला.

स्पर्धेच्या दुसऱ्या एलिमिनेटर सामन्यात प्रथम खांडवे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे ग्रीनपार्क संघाने वॉरीयर टायटन क्लबचा ६ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या वॉरीयर टायटन क्लबने ९४ धावांचे आव्हान उभे केले. मनु सक्सेना याने नाबाद ६६ धावांची खेळी करून संघाचा डाव उभा केला. या आव्हानाला उत्तर देताना ग्रीनपार्क क्लबने ७ षटकात व ४ गडी लक्ष्य गाठले. राज राठोड (२८ धावा), प्रथम खांडवे (२१ धावा) आणि अनिकेत शेवाळे (२५ धावा) यांनी धावा जमवित संघाचा विजय साकार केला.

पहिल्या एलिमिनेटर सामन्यामध्ये प्रथम खांडवे याच्या कामगिरीमुळे ग्रीनपार्क क्लबने अनस्टॉपेबल क्लबचा ६ गडी राखून सहज पराभव केला होता.

# इंडियन नॅशनल रॅली स्प्रिंट



## चॅम्पियनशीप फॉर टु-व्हिलर स्पर्धेची प्राथमिक फेरी संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फेडरेशन ऑफ मोटर स्पोटर्स क्लब्स ऑफ इंडिया (एफएमएससीआय) मान्यतेखाली होणाऱ्या इंडियन नॅशनल रॅली स्प्रिंट चॅम्पियनशीप स्पर्धेच्या अंतिम फेरीपुर्वीच्या प्राथमिक फेरी पूर्ण झाली. अंतिम आणि निर्णायक फेरीमध्ये भारतातील अव्वल आणि सर्वोत्तम रायडर्समधून राष्ट्रीय विजेता ठरवणार आहे.

पुण्याजवळील कामशेत येथील नानोली स्पीड-वे फार्म्स येथे आज झालेल्या प्राथमिक फेरीमध्ये देशातील ७० रायडर्सनी सहभाग घेतला आहे. 'युरोग्रीप' टायर उत्पादक कंपनीचे विभागीय व्यवस्थापक फराझ शेख यांच्या हस्ते या फेरीचा शुभारंभ करण्यात आला. एफबी मोटरस्पोटर्सचे संचालक तसेच ३ वेळेचा राष्ट्रीय रॅली चॅम्पियन आणि मानांकित ग्रेट डेझर्ट हिमालयन रॅलीजचा विजेता फराद भाथेना आणि चिन्मयी भाथेना उपस्थित होते. या अंतिम फेरीसाठी एकूण १०० हून अधिक प्रवेशिका आल्या आहेत. या अंतिम फेरीमध्ये चैन्नई, बंगलोर, कोईमतुर, भोपाळ, गुवाहाटी, तामिळनाडूमधील ईरोड, त्रिसुर आणि कुर्ग, आसाम, कर्नाटक, केरळमधील एर्नाकुलम, शिमागोज, जयपुर या राज्यांतुन रायडर्स सहभागी झाले आहेत.

महाराष्ट्रातील पुण्यामधून किशोर जाधव, मोहन सेठीया, पुरूषोत्तम मते, कुणाल सिंग, नितीश चौधरी, दानेश जोशी, पंकज ठक्कर, आदित्य राजपुत, बारामतीमधून रोहीत शिंदे, सांगलीमधून अजित पाटील, नाशिक मधून दर्शन चावरे, बादल दोशी (नवी मुंबई) असे अव्वल रायडर्स सहभागी झाले आहे. या टु-व्हिलरच्या डर्ट-रेस चा (मातीवरच्या शर्यतीचा) थरार पुणेकरांना अनुभवता येणार आहे. रॅली रेसिंगसाठी कोणतेही प्रवेश-शुल्क आकारण्यात येणार नसून सर्व क्रिडारसिकांना मोफत प्रवेश आहे.

सर्व पात्रता फेरीतून प्रत्येक गटातील अव्वल ठरलेले पहिले पाच रायडर्स अंतिम फेरीत पोहचले आहेत आणि अंतिम फेरीमध्ये धडक मारलेले रायडर्स आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. इंडियन नॅशनल रॅली स्प्रिंट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या अंतिम फेरीत ११ क्लास (गट) असणार आहेत. या रॅली स्पर्धेत सांघिक अजिंक्यपद, रायडर्स ग्रुप ए, बी, बुलेट क्लास, स्कूटर क्लास, महिला गट, प्रौढ गट असे एकूण १२ गटाच्या विजेतेपदासाठी रायडर्स रेसिंग करणार आहेत.

## भारतीय संघाला अजिंक्यपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मस्कत :** गोलरक्षक निधीच्या अप्रतिम कामगिरीच्या जोरावर भारतीय मुलींच्या संघाने कनिष्ठ गटाच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यातील १-१ अशा बरोबरीनंतर भारताने चीनचा शूटआऊटमध्ये ३-२ असा पराभव केला.

## २३ व्या गुरू तेगबहादुर गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेत

# बीटा, अशोका, नवमहाराष्ट्र , रेंजहिल्स संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** गुरू तेगबहादुर फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित 23व्या गुरू तेगबहादुर गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेत बाद फेरीत ज्युनियर गटात बीटा एफसी, अशोका एफसी, नवमहाराष्ट्र एफसी , रेंजहिल्स मिलान एफसी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

रेंजहिल्स स्पोर्ट्स मैदान, खडकी येथे आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत बाद फेरीत ज्युनियर गटात सलामीच्या चुरशीच्या लढतीत बीटा एफसी संघाने नॉईज बॉइज एफसी संघाचा टायब्रेकरमध्ये 3-1 असा पराभव करून शानदार सुरुवात केली. निर्धारित वेळेत सामना गोलशून्य बरोबरी सुटला व त्यामुळे टायब्रेकर पद्धतीचं अवलंब करण्यात आला. टायब्रेकरमध्ये विजयी संघाकडून हर्षल मुथाळ, ऋत्विक वखारे, सिद्धार्थ चव्हाण यांनी गोल केले. पराभूत संघाकडून आदित्य गणगे, शौनक भोसले यांना गोल मारण्यात अपयश आले.

दुसऱ्या सामन्यात विशाल घोलेकर(54 मि.) याने नोंदवलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर अशोका एफसी संघाने जायंट्स एफसी संघाचा 1-0 असा सनसनाटी पराभव केला. नवमहाराष्ट्र एफसी संघाने मक्सा एफसी संघाचा 3-0 असा सहज पराभव करून विजयी सलामी दिली. नवमहाराष्ट्र एफसी संघाकडून दिपक ठाकरे(49 मि.), अमोल वादक्कर(54 मि.), उमेश पदुमुले(57 मि.) यांनी प्रत्येकी एक गोल करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. अन्य लढतीत शुभम पुरुष(15 मि.), शाहीद रफिक शेख(39 मि.) यांनी नोंदवलेल्या प्रत्येकी गोलाच्या जोरावर रेंजहिल्स मिलान एफसी संघाने हायलँडर एफसी संघाचा 2-0 असा पराभव करून आगेकूच केली.

उदघाटनापूर्वी गुरुद्वारा मिलेटरी हॉस्पिटल खडकीचे ग्यानी जसबीर सिंग यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडावी याकरिता प्रार्थना केली. स्पर्धेचे उदघाटन एमजेएफ लायन विजय सारदा, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर 3234डी2, पीडीजी मजेएफ सीए अभय शास्त्री, लायन्स क्लब ऑफ पुणे कोथरूडचे अध्यक्ष विठ्ठल कुटे, लायन माधुरी शास्त्री, लायन एमजेएफ राजेंद्र गोयल, एमजेएफ लायन उमेश अगरवाल, लायन सतीश राजहंस, गुरुद्वारा युपी हॉटेल, येरवडा चे अध्यक्ष सरदार दर्शन सिंग धिल्लोन, एलएस नारंग, गिरीश गणात्रा, दिपक लोहिया यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्य संयोजक लायन रानी अहलूवालीया यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

#रा